


सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, १८ जून २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २२० । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



स्वामी विवेकानंदांच्या ध्यानी आले की भारताची अधोगती धर्मामुळे नव्हे, तर धर्मविषयक अज्ञानामुळे झाली आहे. वेदांमधील सत्ये जनसामान्यांपर्यंत नेण्याची गरज आहे. गुलामीमुळे भारतीयांनी आपला आत्मविश्वास गमावला होता. त्यामुळे त्यांनी जागतिक धर्मपरिषदेत जाऊन तेथे हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व करण्याचा निर्णय घेतला. जर पाश्चात्यांनी वेदांताचा स्वीकार केला तर भारतीयांचा आपल्या धर्मावरील विश्वास बळकट करता येईल. तेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते.

- **एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# कृषी क्षेत्राला हायटेक करणारे महाॲग्री-एआय धोरण मंजूर

## राज्य मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय

◆ **मुंबई, १७ जून**

राज्याच्या कृषी क्षेत्राला डिजिटल युगात अग्रेसर ठेवणाऱ्या महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय २०२५-२०२९ या धोरणास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. कृषी क्षेत्राला हायटेक करणाऱ्या या निर्णयामुळे शेतीमध्ये मोठी डिजिटल क्रांती घडून, शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवून आणणारा हा निर्णय ठरणार आहे.




कृत्रिम बुद्धिमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टिक्षमता, रोबोटिक्स आणि पूर्वानुमान विश्लेषणासारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या मदतीने शाश्वत व विस्तारयोग्य उपाययोजना राबविता येणार आहेत. राज्यातील ग्रीस्टॅक, महा-ग्रीस्टेक, महावेध, क्रॉपसॅप, गमार्केनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यासारखे प्रकल्प पुढे नेण्यास यामुळे मदत होणार आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी त्रिस्तरीय प्रशासकीय संरचना असेल. पहिल्या तीन वर्षांसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्र वेगाने बदलणारे आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षांत या धोरणामध्ये आवश्यक ते बदल व सुधारणा करण्यात येतील. त्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती, राज्यस्तरीय तांत्रिक समिती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रिटेक नाविन्यता केंद्र, कृषी विद्यापीठांतर्गत कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व नाविन्यता केंद्र काम करतील.

या धोरणाच्या माध्यमातून राज्यात कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता व नाविन्यतेसाठी एक अग्रगण्य केंद्र निर्माण होईल. या धोरणामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा शेतकरी-केंद्रित वापर, संशोधन, डेटा देवाण-घेवाण वाढेल, स्टार्ट-अप्सना पाठबळ मिळेल आणि यातून महाराष्ट्र डिजिटल कृषी नाविन्यतेमध्ये आघाडीवर राहील, अशी अपेक्षा आहे.

या धोरणाद्वारे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा शेतकरी-केंद्रित वापर करण्यास स्टार्टअप्स, खाजगी कंपन्या, तंत्रज्ञान कंपन्या, कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था, कृषी विज्ञान केंद्रे, खाजगी संस्था, शेतकरी व शेतकरी उत्पादक संस्था आदींना चालना मिळेल, असे उपक्रम हाती घेतले जातील. यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रिटेक नाविन्यता केंद्राची संस्थात्मक उभारणी केली जाईल. हे केंद्र या धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी स्वतंत्र, पूर्णवेळ कार्यान्वयन यंत्रणा म्हणून कार्य करेल. ही यंत्रणा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत भागीदारी, नवकल्पनांना प्रोत्साहन, प्रकल्पांची निवड, अंमलबजावणी व अर्थसहाय्य, समन्वय, क्षमता बांधणी आदी धोरणांतर्गत विविध बाबींवर काम करेल.

आयआयटी आणि आयआयएससीसारख्या संस्थांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता नावीन्यता आणि इनक्युबेशन केंद्र स्थापण्यात येतील. ◂(तभा वृत्तसेवा)

### मिसा बंदिवानांच्या मानधनात दुपटीने वाढ

१९७५ ते १९७७ मधील आणिबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देताना कारावास भोगावा लागलेल्या मिसा बंदिवानांना आता वाढीव मानधन मिळणार आहे तसेच बंदिवानांच्या हयात जोडीदारालाही मानधन देण्याचा आणि अन्य काही अटी शिथिल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. ■

### गावा-गावांत होणार हवामान केंद्रांची उभारणी



केंद्राच्या विंड्स (वेदर इन्फर्मेशन नेटवर्क डेटा सिस्टम) प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची (आटोमॅटिक वेदर स्टेशन) उभारणी करण्यात येणार आहे. यासाठी महावेध प्रकल्पास पाच वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. राज्यातील सर्व गावांमध्ये हवामानविषयक अचूक माहिती मिळावी यासाठी, तसेच शेतकऱ्यांना हवामानाधारित कृषिविषयक सल्ला व मार्गदर्शन मिळावे यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. ■

### डिजिटल पायाभूत सुविधा उभारणार



डेटा-आधारित शेती आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरासाठी उपयोगी ठरतील अशा डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारल्या जातील. या सुविधा राज्यव्यापी, सुरक्षित, सुसंगत व संमती आधारित डेटा देवाण-घेवाण सुलभ करतील. क्लाऊड आधारित कृषी डेटा एक्स्चेंज आणि सँडबॉक्सिंग सुविधा उपलब्ध केली जाईल, या डिजिटल प्लॅटफॉर्मशी केंद्र व राज्य शासनाचे शेती संबंधीत सर्व डेटाबेस जोडण्यात येतील. या एक्स्चेंजद्वारे शेतकरी, त्यांची जमीन, पीक माहिती, स्थानिक हवामान, मृदा आरोग्य आदीचा डेटा कृत्रिम बुद्धिमत्ता प्रकल्पांसाठी उपलब्ध करून दिला जाईल. ■



जी-७ शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी कॅनडात दाखल झालेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मंगळवारी कॅलगरी विमानतळावर असे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले

# स्वसंरक्षणाचा इस्रायलला अधिकार

## जी- ७ देशांनी जाहीर केला पाठिंबा

◆ **ओटावा, १७ जून**

पश्चिम आशियातील शांतता आणि स्थिरतेचे आम्ही समर्थन करतो. इस्रायलला स्वसंरक्षणाचा अधिकार असून, इराणविरोधात कारवाई करण्याला आमचा पाठिंबा आहे. इस्रायलच्या सुरक्षेचे आणि सामान्य नागरिकांच्या सुरक्षेचेदेखील समर्थन करतो, असे जी-७ देशांच्या नेत्यांनी म्हटले आहे.

कॅनडात जी-७ देशांची शिखर परिषद मंगळवारपासून सुरू झाला, यात सहभागी होण्यासाठी सदस्य देशांचे नेते पोहोचले आणि त्यांनी इराण-इस्रायलमधील संघर्षावर आपली भूमिका मांडली. जी-७ देशांच्या संयुक्त निवेदनात म्हटले की, इराणच्या आण्विक धोरणामुळे प्रादेशिक स्थिरतेचा धोका निर्माण झाला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### ट्रम्प तडकाफडकी परतले मायदेशी

कॅनडाच्या टोरंटो शहरात जी-७ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प मंगळवारी पोहोचले, परंतु काही तासांतच महत्त्वाचे काम असल्याचे कारण देत ते मायदेशी परतले. ट्रम्प यांनी म्हटले की, आम्ही इस्रायलच्या पाठिशी आहोत. शस्त्रविरामासाठी मी परतलो नाही. ■

## महत्त्वाचे

### चिनाब नदीचे पाणी ९२% ने घटले

**इस्लामाबाद** : पहलगाम हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे २४ एप्रिल रोजी भारताने पाकिस्तानसोबतचा ६५ वर्षे जुना सिंधू पाणी करार थांबवला होता. आता त्याचा परिणाम पाकिस्तानमध्ये दिसून येत आहे. पाकिस्तानातील चिनाब नदीचा प्रवाह ९२% ने कमी झाला आहे. २९ मे रोजी नदीतील पाण्याचा प्रवाह ९८ हजार २०० क्युसेक होता. आता तो फक्त ७२०० क्युसेक इतका कमी झाला आहे. पाण्याची पातळी ३000 क्युसेकच्या खाली जाऊ शकते म्हणजेच 'डेड लेव्हल'. पंजाब आणि सिंध प्रांतातील ६.५ कोटी शेतकरी सिंचनासाठी चिनाब नदीवर अवलंबून आहेत. पाण्याच्या कमतरतेमुळे येथील ४0% पेक्षा जास्त पिके नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. सिंधू नदीवर बांधलेल्या तारबेला धरणात आणि झेलम नदीवर बांधलेल्या मंगला धरणातही पाण्याची मोठी कमतरता आहे.

### आम्हाला आमचा पक्ष वाढवायचाय : महाजन

**मुंबई** : आम्हालाही पक्ष वाढवायचा आहे. महापालिकेच्या निवडणुका ताकतीने लढवायच्या अहेत. त्यामुळं आता काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांच्याकडे माणसं राहणार नाहीत असं वक्तव्य मंत्री गिरीश म हाजन यांनी केलं आहे. काही जेष्ठ आहेत. आपापसातले काही वाद असतील तर ते मिटतील असंही गिरीश महाजन म्हणाले. आमच्याकडे मंत्री असलेल्ले अनेकजण मागच्या काळामध्ये टीका करत होते. मात्र आता एकरूप झाले आहेत. आता कळत नाही ते दुसऱ्या पक्षात होते असेही महाजन म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर 'मनपरिवर्तन' होऊन ठाकरे गटात नाराज असल्याचा प्रबळ आंतरिक जाणीव झालेले सुधाकर बडगुजर यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. मुंबईच्या नरिमन पॉईंट येथील भाजप मुख्यालयात त्यांचा पक्षप्रवेश झाला. बडगुजर मंगळवारी सकाळी आपल्या हजारो कार्यकर्त्यांना घेऊन मुंबईच्या दिशेने रवाना झाले होते.

### विमान अपघातस्थळी सापडले ८०० ग्रॅम सोने

**अहमदाबाद** : अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या अख-१७१ (बोईंग ७८७-८ ड्रीमलायनर) विमानाचा ज्या ठिकाणी अपघात झाला, त्या ठिकाणाहून ८0 तोळे (८00 ग्रॅम) सोने, ८0,000 रोख, एक मोबाईल फोन, भगवद्गीतेची प्रत, ९ पासपोर्ट आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. घटनेदरम्यान घटनास्थळी पोहोचलेले राजेश पटेल यांच्या मते, जेव्हा ते घटनास्थळी पोहोचले तेव्हा अंधार होता. ढिगाऱ्यात एक मोबाईल फोन आणि एक लॅपटॉप सापडला. याशिवाय दागिने, रोख रक्कम आणि पासपोर्ट देखील सापडले. हे सर्व सरकारी अधिकाऱ्यांकडे जमा करण्यात आले आहे. ४-५ बॅगा देखील देण्यात आल्या आहेत. गृह राज्यमंत्री हर्ष संघवी यांनी १५ जून रोजी सांगितले होते की, घटनास्थळावरून जप्त केलेल्या वस्तूंचे कागदपत्रे तयार केली जात आहेत. त्यानंतर, मृतांचे सामान त्यांच्या कुटुंबियांना परत केले जाईल. १२ जून रोजी दुपारी विमान कोसळले.



# राष्ट्रवादी एकत्रीकरणाच्या चर्चेला शरद पवारांकडूनच ब्रेक



## संधिसाधूपणा करणाऱ्यांना सोबत नाही घेणार; अजित पवार : प्रत्येकाला मत मांडण्याचा अधिकार

**मुंबई, दि. १७ जून-**

गेल्या काही दिवसांपासून शरद पवार आणि अजित पवार हे एकत्र येणार असल्याची चर्चा राज्यात सुरू आहे. त्यामुळे शरद पवार आता भारतीय जनता पक्षासोबत महायुतीमध्ये सामील होणार का? याबाबत तर्क-वितर्क लावले जात होते. मात्र या सर्व चर्चांना शरद पवार यांनी ब्रेक लावला आहे. संधिसाधूपणा करणाऱ्यांना सोबत घेणार नसल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. कोणासोबतही युती करा, मात्र भारतीय जनता पक्षासोबत नाही, असा थेट इशाराच शरद पवार यांनी दिला आहे.

या संदर्भात शद पवारांच्या वक्तव्यामुळे गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांना ब्रेक लागला आहे. वास्तविक हा निर्णय सुप्रिया सुळे घेणार असल्याचे शरद पवार यांनी याआधी सांगितले होते. मात्र, सुळे यांनी अशा युतीला स्पष्ट शब्दात नकार दिला होता. आता थेट शरद पवार यांनी देखील भाजपवर निशाणा साधला आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेला ब्रेक लागला आहे. या संबंधी बोलताना शरद पवार म्हणाले की, गांधी, नेहरू, चव्हाण यांचे विचार, फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार जर सर्व म्हणत असतील तर ते मला मंजूर आहे. पण सत्तेसाठी भाजपसोबत जाऊन बरोबर बसायचे, ही भूमिका कोणी मांडत असेल तर हा विचार काँग्रेसचा विचार नाही. त्यामुळे कोणाशीही संबंध ठेवा मात्र भाजपशी संबंध हा काँग्रेसचा विचार असू शकत नाही. त्यामुळे अशा पद्धतीने संधिसाधूपणाचे राजकारण हे आपल्याला करायचे नाही. अशा स्पष्ट शब्दात शरद पवार यांनी आपली भूमिका मांडली आहे. या बाबत शरद पवारांनी मोठे विधान केले आहे. 'कुणाशीही संबंध ठेवा, पण भाजपशी संबंध ठेवू नका, संधिसाधूपणाचे राजकारण करु नका, सत्तेसाठी भाजप बरोबर जाणाऱ्यांची साथ नको, अशी स्पष्ट भूमिका पवारांनी मांडली आहे.

### प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार : अजित पवार

शरद पवार हे अजित पवार यांच्यासोबत महायुतीमध्ये सहभागी होणार असल्याच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होत्या. यामुळे अजित पवार यांच्या पक्षातील अनेक नेते मंडळींचा आनंद द्विगुणीत झाला होता. मात्र आता शरद पवार यांनी थेट भाजपसोबत जाणार नसल्याची भूमिका व्यक्त केली आहे. यावर अजित पवार यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. याव्यतिरिक्त इतर काही बोलणे मात्र अजित पवार यांनी प्रकर्षाने टाळले आहे.

# एअर इंडियाची दिवसभरात सात उड्डाणे रद्द



## कंपनीच्या अडचणी सुरूच

◆ **नवी दिल्ली, १७ जून**

अहमदाबाद येथे १२ जून रोजी एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाल्यानंतरही एअर इंडियाच्या अडचणी संपलेल्या नाहीत. मंगळवारी दिवसभरात विविध शहरांमधून आंतरराष्ट्रीय उड्डाण घेणाऱ्या तीन विमानांसह एकूण सात विमाने रद्द करण्यात आली.

मंगळवारी सकाळी अहमदाबादहून लंडनला जाणारे विमान रद्द झाले. त्यानंतर अमृतसरहून लंडनला जाणारे विमानही रद्द करण्यात आले. आता दिल्लीहून पॅरिसला जाणारे एअर इंडियाचे विमान रद्द करण्यात आले आहे. दिवसभरात एअर इंडियाची सात उड्डाणे रद्द झाली आहेत. त्यापैकी सहा विमाने ही बोईंग ड्रीमलाईनरशी संबंधित होती.

### रद्द झालेली उड्डाणे

- दिल्ली ते दुबई
- दिल्ली ते व्हिएन्ना
- दिल्ली ते पॅरिस
- अहमदाबाद ते लंडन
- लंडन ते अमृतसर
- बंगळुरू ते लंडन
- मुंबई ते सॅन फ्रान्सिस्को ■

एअर इंडियाच्या वतीने याबद्दल निवेदन प्रसिद्ध करण्यात आले आहे. यात म्हटले की, एअर इंडियाच्या एआय१४३ विमानाची पूर्वतपासणी करण्यात आल्यानंतर त्याचे उड्डाण रद्द करण्यात आले. एअर इंडियाच्या प्रवक्त्यांनी सांगितले, १७ जून रोजी दिल्लीहून पॅरिसला जाणारे एआय-१४३ हे विमान रद्द करण्यात येत आहे. ◂(वृत्तसंस्था)

### नागपूर विमानतळावर इमर्जन्सी लॅण्डिंग

◆ **नागपूर,१७ जून**

कोचीन येथून दिल्लीकडे जाणाऱ्या इंडिगो एअरलाईन्सच्या ६ ए-२७०६ विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाली. सुरक्षेचा उपाय म्हणून मंगळवारी सकाळी या विमानाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर इमर्जन्सी लॅण्डिंग करण्यात आले. कोचीन येथील एअर ट्रॅफिक कंट्रोलला बॉम्बच्या धमकीचा संदेश प्राप्त झाल्यानंतर हे विमान नागपूर विमानतळाकडे वळविण्यात आले. सकाळी ११.२३ वाजता नागपूर येथे ते सुरक्षितपणे उतरविण्यात आले. या विमानात १५७ प्रवासी आणि ६ क्रू मेंबर्स होते. ◂(तभा वृत्तसेवा)




# हेरगिरी, सायबर हल्ल्यांना बसणार आळा

## अभेद्य क्वांटम संवाद प्रणाली विकसित

### डीआरडीओच्या संशोधकांचे यश

◆ **नवी दिल्ली, १७ जून**

शत्रूंकडून होणारी हेरगिरी, सायबर हल्ले रोखणारी अभेद अशी अत्याधुनिक क्वांटम संवाद प्रणाली विकसित करण्यात संशोधकांना यश मिळाले आहे. डीआरडीओ आणि आयआयटी दिल्लीच्या संशोधकांनी लष्करासाठी उपयुक्त ठरणारी क्वांटम एन्टँगलमेंट फ्री स्पेस क्यूकेडी तंत्रज्ञानावर आधारित प्रणाली विकसित केली आहे. ही प्रणाली भविष्यातील युद्धात भारतीय सैनिकांच्या संवादासाठी गेमचेंजर ठरणार आहे.

संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी अत्याधुनिक प्रणाली विकसित केल्याबद्दल संशोधकांचे अभिनंदन केले. अभेद्य असलेली क्वांटम संवाद प्रणाली शत्रूला भेदणे अशक्य आहे. सैन्याची हेरगिरी करणे आणि सायबर हल्ला रोखण्यासाठी हे तंत्रज्ञान अतिशय उपयुक्त ठरणार आहे. क्वांटम एन्टँगलमेंट या प्रणालीचा वापरून एक किमीपेक्षा जास्त अंतरावर फ्री स्पेस क्वांटम सुरक्षित संप्रेषण स्थापित केले. हा प्रयोग डीआरडीओ संशोधकांच्या मार्गदर्शनात आयआयटी दिल्लीच्या परिसरात फ्री स्पेस ऑप्टिकल लिंकद्वारे करण्यात आला. या प्रयोगात, २४० बिट्स प्रति सेकंदात सुरक्षित क्यूकेडी साध्य करण्यात आला. लष्कराची गोपनीय माहिती हॅक करण्यासाठी विशिष्ट तंत्रज्ञानाने शत्रूंकडून करण्यात येणारी हेरगिरी, सायबर हल्ले रोखणे या प्रणालीद्वारे शक्य होणार आहे. यामुळे युद्धावेळी लष्कराकडून करण्यात येणारा संवाद अतिशय गोपनीय राहणार आहे.

**कसे कार्य करणार तंत्रज्ञान?**

क्वांटम एन्टँगलमेंट-आधारित क्यूकेडी तंत्रज्ञान पारंपरिक पद्धतींपेक्षा अधिक सुरक्षित आहे. एखादा हॅकर किंवा गुप्तहेर ही प्रणाली चोरण्याचा प्रयत्न केल्यास क्वांटम स्थिती बदलते. ◂(वृत्तसंस्था)

# सीईटी-पीसीबीचा निकाल जाहीर

**मुंबई** : महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (एमएचटी सीईटी) पीसीबी गटाचा निकाल मंगळवारी जाहीर करण्यात आला. यात एकूण ९३.९१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ही परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांसाठी घेण्यात आली होती. महाराष्ट्रातील विविध भागातून लाखो विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. एकूण २,८२,७३४ लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी ९३.९१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले.


# मोसादच्या मुख्यालयावर इराणचा क्षेपणास्त्र हल्ला

## ● इस्रायलच्या क्षेपणास्त्र ठिकाणांवर ड्रोन डागले, निवासी भागातील अनेक इमारती जमीनदोस्त

**तेल अवीव, १७ जून**

ऑपरेश रायजिंग लायन राबवत इस्रायलच्या हवाई दलाने प्रचंड प्रहार करीत इराणमधील अणुसुविधा केंद्र, बॅलेस्टिक क्षेपणास्त्र उत्पादन करणारे कारखाने, सैन्य ठिकाणे उद्ध्वस्त केली. इतकेच नव्हे तर या हल्ल्यात इराणचे दोन लष्कर प्रमुख आणि लष्करी कमांडर मारले गेले.

हल्ल्याला प्रत्युत्तर देत इराणने मंगळवारी इस्त्रायलची राजधानी तेल अवीव शहरांवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि ड्रोनने हल्ले केले. यात इस्त्रायलची गुप्तचर यंत्रणा मोसादचे मुख्यालय आणि क्षेपणास्त्र निर्मितीचे केंद्र उद्ध्वस्त झाले. इराणच्या लष्कराने त्यांच्या समाज माध्यम खात्यावर हल्ल्याची चित्रफीत प्रसारित केली. त्यात म्हटले की, इराणच्या



लष्कराने आज इस्रायलच्या अनेक शहरांवर हल्ले केले. यात मोसादचे मुख्यालय, क्षेपणास्त्र निर्मितीचे केंद्र, निवासी इमारती जमीनदोस्त झाल्या. इस्रायली लष्कराने इराणकडून करण्यात आलेल्या हल्ल्याची पुष्टी केली. त्यांनी म्हटले की, इराणचे बहुतांश ड्रोन हवेतच नष्ट करण्यात आले, परंतु बॅलेस्टिक क्षेपणास्त्राने निवासी इमारतींचे नुकसान झाले आहे. या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिले जाईल. इराणने जारी केलेल्या चित्रफीतमध्ये अनेक क्षेपणास्त्रांनी इस्रायलचे अभेद्य हवाई संरक्षण कवच भेदले आणि तेल अवीव, हायफासह इतर शहरांतील अनेक इमरती उद्ध्वस्त झाल्या. याशिवाय चार लढाऊ विमाने नष्ट केल्याचा दावा इराणने केला आहे. हल्ल्यानंतर उत्तर इस्रायलमध्ये सायरन वाजू लागले आणि लोकांना सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्याचा आदेश देण्यात आला. अमेरिकेच्या मंत्रालयाने विविध देशांच्या नागरिकांना तेहरान सोडण्याची इशारा दिला.त्यानंतर शहर सोडण्यासाठी नागरिकांची धावपळ उडाली.

महत्त्वाचे...



## सांगोला लिंगायत महासभा तालुकाध्यक्षपदी शेटे

**सांगोला,दि. १७ जून-**

लिंगायत धर्मातील सर्व पोट जातींना एकजूट करून समाज संघटना वाढविणे तसेच महात्मा बसवेश्वराचे तत्व व प्रचार प्रसार करण्यासाठी जागतिक लिंगायत महासभेच्या सांगोला तालुकाध्यक्षपदी रविराज शेटे यांची निवड करण्यात आली. जागतिक लिंगायत महासभेतर्फे मातोश्री सिद्धवा बाई हत्तुरे सांस्कृतिक भवन, सोलापूर येथे बसव प्रतिभा पुरस्कार प्रदान सोहळ्यात सदर निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शरण परमानंद अलगोंड पाटील हे होते. शिवानंद गोगाव, कोरणेश्वर महास्वामी, बसवलिंगेश्वर महास्वामी, महादेव कोगनुरे, अमर पाटील, विजयकुमार हत्तुरे, प्रभुलिंग महागावकर, राजशेखर तंबाके, शशिकांत बिराजदार, आर जी शटगार, विरभद्र यादवाड, रेवणसिद्ध बीजर्गी, वीरेंद्र हिंगमिरे, राजशेखर कापसे, काशिनाथ भतगुणकी, इंदुमती अलगोंड पाटील, प्रा.गुरुलिंग धबाले, दानया कवटमीमठ, यांच्याहस्ते रविराज शेटे यांचा सत्कार करण्यात आला. सदर प्रसंगी विजयकुमार भावे, राजश्री थंळगे, लक्ष्मण चलगिरी, राजेंद्र खसकी, नागेंद्र कोगनुरे, शिवराज कोटगी, चनबसप्पा गुरुभेटी, राजेंद्र हौदे, बसवराज नंदर्गी, कल्याणी पाकणी, शेखर पाटील, शिवशरण गोविंदे, अमोल म्हमाणे, धोंडप्पा तोरंगी, शिवानंद बैहिरमठ, मृत्युंजय कल्याणी, नामदेव फुलारी, विश्वजीत हेले, डॉ.भीमाशंकर सिद्धगी, बसवेश्वर पाटणे, राजकुमार रायचूरे, रमेश शिरदाळे, सिद्धेश्वर झाडबुके, अरविंद डोंबे, महेश वाघमारे उपस्थित होते.



## सुसंस्कारित नगरी म्हणूनच श्रीपूरची ओळख : डॉ. यशवंत कुलकर्णी

**श्रीपूर, दि. १७ जून-**

श्रीपूरमध्ये कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या कार्यकारी संचालक पदावर १२ वर्षाचा काळ लोटला. या कालावधीत येथील उद्योग व शैक्षणिक परंपरा पाहता जे अनुभवता आले त्यावरून श्रीपूर नगरी सुसंस्कारित असल्याचे प्रकर्षीने जाणवले. म्हणूनच सुस्कांरित नगरी म्हणून श्रीपूरची सर्वत्र ओळख आहे, असे उद्गार कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी काढले. श्रीपूर येथील विनय कुलकर्णी यांच्या ट्रॉबेरी प्रि-इंग्लिश स्कूलच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. संस्था प्रमुख विनय कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. शिक्षक प्रमुख अनुपमा पंडित, डॉ. सुधीर पोफळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास राज कोल्डस्टोरेजचे चेअरमन राजेंद्र घोगरे, पांडुरंगचे प्रोडक्शन मॅनेंजर एम.आर. कुलकर्णी, कंम्प्यटर इंचार्ज तानाजी भोसले, बांधकाम व्यावसायिक चंद्रशेखर मोकाशी, नाना पिसाळ, डॉ. घुमटकर, प्रा.अशोक पंडीत, शिक्षक प्रमुख अनुपमा पंडीत उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोनिया कुलकर्णी, वर्षा पाठक, श्रुती कुलकर्णी, मधुरा आगाशे, मनिषा पाठक, अनुप पाठक यांनी परिश्रम घेतले.



## उत्कर्ष विद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत

**सांगोला, दि. १७ जून-**

सांगोल्यातील उत्कर्ष प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात नवागतांचे स्वागत करण्यात आले. बालगीताच्या तालावर आनंदाने बागडत फुलांच्या पायघड्यांवरून येत असताना सर्व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. प्रवेशद्वारावर सर्व मुलांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुलांना पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष डॉ.संजीवनी केळकर, संस्थाध्यक्षा नीलिमा कुलकर्णी, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सुनील कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रशांत भोसले यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## सराईत गुन्हेगार धीरज जाधव स्थानबध्द

**सोलापूर, दि. १७ जून -**

तडीपार असतानादेखील शहरात येऊन गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार धीरज जाधव यास पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी एमपीडीएअंतर्गत कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. त्यानुसार सलगर वस्ती पोलिसांचे एक पथक जाधव यास घेऊन येरवडा कारागृहाकडे रवाना झाले आहे. अशितोष उर्फ धीरज अशोक जाधव (वय २५, रा. २ नंबर झोपडपट्टी, भैरू वस्ती, सोलापूर) असे स्थानबध्द करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. अशितोष जाधव याच्याविरुध्द सोलापूर शहरातील पोलिस ठाण्यांमधून गेल्या काही वर्षापासून घातक शस्त्राने दुखापत करणे, खूनाचा प्रयत्न करणे, जबरी चोरी, खंडणी मागणे, धाकदपटशा करणे, तडीपारीच्या आदेशाचा भंग करणे, दगडफेक करणे यासारखे गंभीर स्वरूपाचे ७ गुन्हे दाखल आहेत. जाधव यास त्याच्या गुन्हेगारी कारवायापासून परावृत्त करण्यासाठी सन २०२१ मध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर सन २०२४ मध्ये त्याच्यावर तडीपारीची कारवाई करण्यात आली होती. तडीपार असतानादेखील जाधव हा सोलापूर शहरात येऊन गुन्हे करीत होता. त्याच्या गुन्हेगारी कारवायामध्ये कमी येत नसल्यामुळे सदर बझार पोलिसांकडून त्याच्यावर एमपीडीएअंतर्गत कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव पोलिस आयुक्तांकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस आयुक्तांनी मंजुरी देत जाधव यास कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. ही कारवाई पोलिस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, विजय कबाडे, सहायक आयुक्त राजन माने, यशवंत गवारी, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, अजित लकडे, सहायक पोलिस निरीक्षक तुकाराम घाडगे, हवालदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.



# पंढरपुरातील रस्त्यांवर कचखडीच्या पायघड्या अन् खड्ड्यांच्या रांगोळ्या

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.१७ जून -**

आषाढी यात्रेसाठी प्रशासनाची सध्या पंढरपूर शहरात लगबग सुरु आहे. या मध्ये प्रशासनाच्या आणि ठेकेदाराच्या कृपेने जणू पंढरपूर शहरात वारकऱ्यांच्या स्वागतासाठी चक्क कचखडीच्या (पायाला टोचणारी बारीक खडी) पायघड्या घालण्यात आल्या की काय ? असे चित्र दिसत आहे. तसेच या मध्ये आणखीन भरीस भर म्हणून रस्त्यांवर मोठमोठ्या खड्यांच्या रांगोळ्यानीच जणू शहरातील प्रमुख रस्त्यांची प्रशासनाकडून सजावट करण्यात आली असल्याचे देखील उपरोधाने बोलले जात आहे. त्यामुळे जर प्रशासनाने आणि ठेकेदाराने आपल्या कामाच्या दर्जात बदल न केल्यास वारकऱ्यांचा कुंभमेळा समजल्या जाणाऱ्या आषाढी यात्रेच्या काळात देखील अशाच रस्त्यांवरुन भाविकांना यातना सहन करीत जा ये करावी लागणार आहे.

सध्या आषाढी यात्रेची पंढरपूर शहरात लगबग सुरू आहे. भाविकांना जास्तीत जास्त सोयीसुविधा पुरविण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे दोन्ही उपमुख्यमंत्री प्रयत्नशील दिसत आहेत. यात्रेसाठी निधीची कोणतीही कमतरा भासणार नाही असे राज्य शासनाकडून पालकमंत्र्यांसह इतर मंत्री देखील सांगत आहेत. यात्रेसाठी पंढरपूरात विविध प्रकारची विकास कामे देखील केली जात आहेत. मात्र एकीकडे हे सर्व







### निकृष्ट कामाची बिले अदा करु नयेत

सध्या शहरभर रस्त्यांच्या डागडुजीची कामे सुरु करण्यात आलेली आहेत. ऐन यात्रेच्या गर्दीत देखील कामाचा सपाटा असणार आहे. यात्रेच्या काळात घाईगडबडीत निकृष्ट कामे करुन अधिकाऱ्यांच्या मर्जीतले ठेकेदार मंडळीं यात्रेनंतर प्रशासनातील आधिकाऱ्यांच्या मानगुटीवर बसून आपली बिले पास करुन आपल्या तुंबड्या भरुन घेतात. त्यामुळे अशा प्रकारे निकृष्टपणे खड्डे बुजविणाऱ्या, रस्त्यांची व्यवस्थित डागडूजी न करणाऱ्या ठेकेदारांना जिल्हा प्रशासनाने ब्लॅंकलिस्ट मध्ये टाकून त्यांची बिले काढू नयेत अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.

यात्रेसाठी आलेले अनेक भाविक विनाचप्पल चालत असतात. यामुळे या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम चांगल्या पध्दतीचे करण्यात यावे. यात्रा कालवधीत भाविकांच्या पाऊलांना रस्त्यावरची खड्डी टोचणार नाही, याची दक्षता संबंधित विभागाने त्याच प्रमाणे प्रशासनाने घेणे आवश्यक आहे.

**- माऊली देशमुख**
**(दर्शनासाठी आलेले भाविक, लातूर)**

होत असले तरी पंढरपुरातील रस्त्यांवर खड्डे मात्र जैसे थे असल्याचे दिसून येत आहे. शहरात रस्त्यांची अतिशय दुरवस्था झाल्याचे समोर आले आहे. अनेक मुख्य रस्त्यांची अक्षरशः चाळण झाल्यानं वाहनचालकांसह वारकरी भाविकांनाही मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

पंढरपूर मध्ये दररोज लाखोंच्या संख्येने भाविक येत असतात. या मध्येच आषाढी यात्रा देखील तोंडावर आलेली आहे. संतांच्या पालख्यांचे प्रस्थान देखील समिप आलेले आहे. त्यामुळे येत्या काळात पंढरपुरात येणाऱ्या भाविकांची संख्या रोज वाढतच जाणार आहे.

दरम्यान मे महिन्यामध्येच पावसाने अचानक मोठ्या प्रमाणात हजेरी लावली आहे. यामुळे शहरातील अनेक रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. अनेक मुख्य रस्त्यांची खड्यांमुळे चाळणी झाल्यानं वाहनचालकांसह भाविकांना देखील कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. शहरामधील स्टेशन रोड, सरगम चौक, कॉलेज रस्ता, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या भक्त निवासाकडे जाणाऱ्या रस्त्यावर तसेच ज्या रस्त्यांवरुन भाविक अनवाणी पायाने नगरप्रदक्षिणा करतात तो नगरप्रदक्षिणा मार्गासह शहरातील बाजारपेठ, मंदिर परिसर, नगरपालिके समोरील रस्ता, छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रस्ता, स्टेशन रोड, भक्तीमार्ग आदींसह बसस्थानक, सावरकर चौक, या प्रमुख रस्त्यांसह शहराच्या विविध भागातील अंतर्गत रस्त्यांना देखील मोठाले खड्डे पडलेले आहेत. त्यामुळं वाहतुकीवर परिणाम होत आहे. या परिसरात धीम्या गतीनं वाहतूक सुरू आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार, खासदार, आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांचे पंढरपुरात सतत दौरे होत आहेत. असे असताना देखील शहरातील प्रमुख मार्गाची आवस्था बिकट झाली आहे. या मध्येच काही रस्त्यांच्या डागडुजीची कामे देखील सुरु असल्याचे दिसत आहे. ही डागडूजी करीत असताना संबंधित ठेकेदाराकडून खड्डे बुजविण्यात येत असल्याचे दिसत आहे. हे काम करीत असताना त्या मध्ये डांबराचे प्रमाण कोठेही दिसत नाही. मोठ्या खडीने चक्क खड्डे बजविण्यात येत आहेत आणि खड्डे बुजविल्यावर त्यावर बारीक कचखडी टाकुन सारवासारव केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने जणू भाविकांच्या स्वागतासाठी शहरभर कचखडीच्या पायघड्या आणि खड्ड्यांची रांगोळी घातली की काय ? असा उपरोधित सवाल शहरातील नागरिक तसेच बाहेरगावांहून विठ्ठल दर्शनासाठी आलेल्या वारकरी भाविकांमधून सध्या उपस्थित केला जात आहे.

# हैदराबाद रोडवर कंटेनर व टँकरची धडक

**अंबिका हॉटेल समोरील घटना**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ जून -**

सोलापूर ते हैदराबाद रोडवरील फोर्ड शोरूमजवळील अंबिका हॉटेलसमोर कंटेनरचालकाने समोरून येणाऱ्या टँकरला जोरदार धडक दिली. हा अपघात मंगळवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास झाला असून यामध्ये दोन जण जखमी झाले आहेत. यातील एकाची प्रकृती चिंताजनक आहे.



संतोष पाल (वय ४०, रा. वेस्ट बंगाल) आणि एक अनोळखी व्यक्ती (वय ३०, रा. माहिती नाही) अशी जखमींची नावे आहेत. मंगळवारी सायंकाळी चारच्या सुमारास संतोष पाल हे रासायनिक टँकर चालवित मार्केट यार्ड वरून हैदराबाद च्या दिशेने जात होते. त्यावेळी फोर्ड शोरूमजवळील अंबिका हॉटेलच्या समोर समोरून येणाऱ्या कंटेनरने समोरून कंटेनरला जोरदार धडक दिली. या अपघातात टँकर पलटी झाल्याने त्यात संतोष पाल याच्या चेहऱ्यास व सर्वांगास जखमा झाल्याने तसेच अनोळखी तरूणाच्या चेहऱ्यास व डोक्यास जबर मार लागल्याने मदतनीस रामरतन चव्हाण यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. संतोष पाल हे शुध्दीवर असून अनोळखी तरूण हा बेशुध्द असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

या अपघातामुळे सोलापूर ते हैदराबाद महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. या अपघाताची माहिती मिळताच सोलापूर तालुका पोलिस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातग्रस्त वाहने रस्त्यावरून बाजूला करून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करून दिला.



## कोळेगांव येथे बैलगाडीतून मिरवणूक काढून विद्यार्थ्यांचे स्वागत

**पिलीव, दि. १७ जून-**

नवनवीन उपक्रम व गुणवत्तेत अग्रेसर असणाऱ्या जि. प. प्रा. शाळा वाघडोहवस्ती, कोळेगांव (ता. माळशिरस) येथे इयत्ता पहिलीला दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. 'माझी शाळा, माझे झाड' हा उपक्रम शाळेत साजरा केल्याची माहिती मुख्याध्यापिका प्रिया तोरणे-धांडोरे यांनी दिली. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे घेण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना गोड शिरा व मसालेभात देण्यात आला. उपक्रमासाठी गटशिक्षण अधिकारी सुषमा महामुनी, विस्ताराधिकारी नकाते, प्रदीप करडे यांचे मार्गदर्शन लाभले.

## पोस्ट चौकात स्कूटीस्वार वृद्धास टिपरची धडक; जागीच मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि १७ जून -**

पोस्ट चौक, बार्शी येथे मंगळवारी (दि. १७ जून) सकाळच्या सुमारास एका भरधाव टिपरने स्कूटीला मागून जोरदार धडक दिल्याने एक ज्येष्ठ नागरिक जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना घडली. विलास मारुती ताटे (वय ६७, रा. पिंपळगाव (पान), ता. बार्शी) असे मृत व्यक्तीचे नाव असून, हा अपघात सकाळी १०.१० ते १०.२० च्या दरम्यान घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, ताटे हे आपली सून रतन ताटे यांना बार्शीतील अभिनव माध्यमिक विद्यालय येथे सोडून गावाकडे परतत असताना, पोस्ट चौकाजवळ त्यांच्या स्कूटी (क्र. एम.एच.१३ ई.एन. ४४३१) ला भरधाव वेगात आलेल्या टाटा कंपनीच्या टिपर (क्र. एम.एच.१७ बी.वाय. ९१५३) ने ओव्हरटेक करताना जोरदार धडक दिली. धडकेनंतर स्कुटीवरुन पडलेल्या ताटे यांच्या अंगावर टिपरचे चाके गेल्यामुळे डोक्याला, कमरेला आणि पायाला गंभीर दुखापत झाली. नागरिकांनी त्यांना तात्काळ उपचारासाठी जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी मयताच्या सून रतन ताटे यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात



फिर्याद दिली असून, या अपघातास जबाबदार ठरवून शुभम कैलास येळे (वय २९, रा. नागोबाचीवाडी, ता. बार्शी) या टिपर चालकावर निष्काळजी आणि हयगयीने वाहन चालवल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून, अपघातानंतर काही काळ वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. पुढील तपास बार्शी शहर पोलीस करत आहेत.

## करमाळा शहर विकास आघाडीतर्फे घंटानाद



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१७ जून -**

करमाळा शहरातील विविध समस्याबाबत करमाळा शहर विकास आघाडीच्या वतीने करमाळा नगरपरिषदेसमोर सुनील बापू सावंत यांच्या नेतृत्वाखाली घंटानाद आंदोलन करण्यात आले असून मुख्याधिकारी सचिन तपसे यांनी आज पासून कामास सुरुवात केली जाईल असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन संपले. यावेळी मुख्याधिकारी सचिन तपसे यांना निवेदन दिले.

श्री. सावंत म्हणाले की, करमाळा शहरात गेल्या अनेक दिवसांपासून पाणी पुरवठा विस्कळीत झाला असून नागरिकांना पाच पाच दिवस पाणी मिळत नाही, शहरातील मुख्य रस्त्यावर खड्डे पडले आहेत. आषाढी एकादशी येत आहेत. लाखो भाविक पंढरपूरला जातात खड्डयात पडुन कोणतीही इजा होऊ नये. त्यामुळे खड्डे बुजवण्यात यावेत. आंदोलनात माजी नगरसेवक फारुक जमादार, रवींद्र कांबळे, दिपक सुपेकर, भारिपचे नेते देवा लोंढे, हुमरान मुलाणी, गणेश अडसूळ , पांडुरंग सावंत, साजीद बेग, विलास क्षिरसागर, साबीर नजीर शेख, बापू मोरे जमीर सय्यद, राजेंद्र कसाब, बापू उबाळे आदी उपस्थित होते.

# पंढरपुरातील पोलिस अधिकाऱ्यांनीही घालून द्यावा आदर्श

**चौफाळ्यापासून चालत ये-जा करीत कर्तव्य निभवावे**

**परिसरातील व्यापारी आणि नागरिकांची अपेक्षा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ जून-**

येथील विठ्ठल मंदिर परिसर नो व्हेईकल झोन म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे. मंदिर समिती कर्मचारी, पोलिस तसेच अत्यावश्यक सेवांची वाहने यांनाच फक्त या परिसरात वाहन लावण्याची मुभा आहे. सध्या हा परिसर सर्वसामान्यांची वाहने नसल्यामुळे अगदी मोकळा श्वास घेत असल्याचे दिसत आहे. अशातच जरी पोलिसांना वाहन लावण्याची मुभा असली तरी मात्र मंदिर बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिस निरीक्षकांनी आपले चारचाकी वाहन अगदी मंदिरा जवळच न लावता तुकाराम भवन परिसरात लावले तरी चालू शकते किंवा चौफाळ्यापासून चालत ये-जा करीत आपले कर्तव्य निभावले तरी काही फरक पडत नाही, अशी भावना मंदिर परिसरातील नागरिकांतून तसेच व्यापारी वर्गातून व्यक्त होताना ऐकावयास मिळत आहे. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचने नुसार चौफाळा ते महाव्दार हा परिसर नो व्हेईकल झोन म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे. या संदर्भातील आदेश देखील नुकताच पारित करण्यात आलेला आहे. या आदेशा मध्ये मंदिर समिती कर्मचारी, मंदिराच्या बंदोबस्तासाठी असणारे पोलिस तसेच अत्यावश्यक सेवांची वाहने यांना या आदेशा मधून वगळण्यात आलेले किंवा सुट देण्यात आलेली आहे.



येथील विठ्ठल मंदिराच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र पोलिस बंदोबस्त आहे. मंदिराच्या व्हीआयपी गेट बाहेर पोलिस चौकी देखील सुरु करण्यात आलेली आहे. या मध्ये गृह विभागाकडून खास बाब म्हणून विठ्ठल मंदिर बंदोबस्तासाठी स्वतंत्र पोलिस निरीक्षक तसेच अन्य कर्मचाऱ्यांची खास नेमणूक देखील करण्यात आलेली आहे. दरम्यान नो व्हेईकेल झोन जाहीर झाल्या मुळे सध्या मंत्री महोदय देखील आपल्या वाहनांचा ताफा चौफाळ्यात लावून विठ्ठल मंदिराकडे चालत जा ये करता आहेत. की जेणे करुन आदेशाचा भंग होणार नाही. या बरोबरच वारकरी भाविकांना आपल्या वाहनांचा त्रास होणार नाही.मात्र दुसरीकडे जरी आदेशा मध्ये वाहन लावण्याची मुभा असली तरी मंदिर बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिस निरीक्षकांनी आपली चारगाडी सरकारी गाडी थेट मंदिरा पर्यंत आणून अगदी व्हीआयपीगेट जवळच लावू नये. कारण देवाच्या दारात कोणीही मोठा नाही किंवा कोणीही छोटा नाही. सर्वजण सारखेच असतात. माणूस हा पदाने मोठा होत नसतो तर तो विचाराने मोठा असावा लागतो.त्यामुळे मंदिर सुरक्षेसाठी असणाऱ्या पोलिस निरीक्षकसाहेबांनी देखील सर्वसामान्यांप्रमाणे आपले देखील वाहन व्हीआयपी गेट जवळ न लावता ते थेट तुकारामभवन जवळ उभे करावे. किंवा सर्वसामान्यां प्रमाणेच आपण एक या भावनेतून आपले कर्तव्य बजावित असताना किंवा ड्युटीवर जा ये करताना आपले वाहन चौफाळ्यांपर्यंत आणून तेथून मंदिरपर्यंत चालत ये जा केली तरी चालू शकते. यामध्ये त्यांचे कोणतेही नुकसान होत नाही, असा सूर मंदिर परिसरातील व्यापारी तसेच नागरिकांतून सध्या अळविला जात आहे. त्यामुळे आता मंदिर सुरक्षेसाठी तैनात असलेले पोलिस निरीक्षक आपली भूमिका बदलतात की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

आपण देखील सर्वसामान्यांप्रमाणेच एक आहोत. देवाच्या दारात सगळे सारखेच आहेत ही भावना आपली देखील आहे. आपण तुकाराम भवन जवळच ऐरव्ही गाडी लावतो आहे. वाहतुकीचे नियोजनासाठी वाहतूक पोलिसांना अत्यावश्यक असलेले जँमर आपल्या गाडीतून आज आणण्यात आले होते. ते उतरुन घेण्यासाठी गाडी थेट मंदिराच्या व्हीआयपी गेटपर्यंत आणली होती. आपणाला देखील चौफाळ्यापासून मंदिरा चालत ये-जा करण्यास काहीच अडचण नाही.

**-शंकर पटवारी,**
**वरिष्ठ पोलिस निरीक्षक मंदिर सुरक्षा पोलिस चौकी**

# आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुप्पटीने वाढ

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७ जून-**

आणीबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देताना कारावास भोगलेल्यांना आता वाढीव मानधन मिळणार आहे. तसेच मानधनधारकाच्या हयात जोडीदारालाही मानधन देण्याचा आणि अन्य काही अटी शिथिल करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने मंगळवारी घेतला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

देशात २५ जून, १९७५ ते ३१ मार्च, १९७७ या कालावधीत आणीबाणी लागू करण्यात आली होती. या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देणाऱ्यांना कारावास भोगावा लागला. अशा व्यक्तींच्या सन्मानार्थ, त्यांचा यथोचित गौरव करण्यासाठी २०१८ मध्ये दरमहा मानधन देण्याचे धोरण निश्चित केले . आता त्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला, त्यानुसार आणीबाणीच्या काळात एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्यांना दरमहा वीस हजार रूपये व त्यांच्या पश्चात पत्नीस किंवा पतीस दरमहा दहा हजार मानधन देण्यात येईल. एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना दरमहा दहा हजार रूपये तर त्यांच्या पश्चात पत्नीस किंवा पतीस पाच हजार रूपये मानधन आणि त्यांच्या हयात जोडीदारास मानधनासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती २ जानेवारी, २०१८ पूर्वी हयात नसल्यास त्याच्या पश्चात त्याच्या जोडीदारास शपथपत्र जोडून अर्ज करता येणार आहे. यासाठीची मुदत शासन निर्णय जाहीर झाल्यापासून ९० दिवसांचा राहणार आहे. या योजनेंतर्गत अर्ज करण्यासाठी यापूर्वी अटकेच्या वेळी किमान वय १८ असणे आवश्यक होते, ही अट रद्द करण्यात आली आहे.

# माजी मंत्री बबनराव घोलप, बडगुजर यांचा भाजपात प्रवेश

■ नाशिकात ठाकरे गटाला खिंडार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१७ जून-**

उद्धव ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री बबनराव घोलप, आणि नाशिकचे माजी जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांच्यासह नाशिक शहर व जिल्ह्यातील शेकडो कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी त्यांचे स्वागत केले. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या पुढाकाराने हे पक्षप्रवेश झाले. भाजपाच्या नाशिकच्या सीमा हिरे यांच्या बडगुजर यांच्या प्रवेशाला विरोध कायम असून त्याला न जुमानता पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या हाती कमळ दिले

यावेळी डॉ. राजेंद्र फडके, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, जिल्हाध्यक्ष सुनील केदार, बाळासाहेब सानप, विजय साने,



प्रशांत जाधव, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. माजी महापौर अशोक मुर्तडक, नयना घोलप यांनीही भाजपामध्ये प्रवेश केला. बावनकुळे म्हणाले की, भाजपामध्ये प्रत्येक प्रवेश हा विकासाकरिता होत असतो. कोणत्याही अपेक्षा न ठेवता केवळ नाशिकच्या विकासासाठी या सर्वांनी भाजपाला साथ दिली आहे. नाशिक जिल्हा परिवर्तनासाठी हे प्रवेश अत्यंत महत्वाचे आहेत. प्रवेश केलेल्या सर्वांच्या साथीने आगामी निवडणुकांमध्ये भाजपाला ५१ टक्क्यांच्यावर मते मिळवून देण्यासाठी झटून काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रवेश केलेल्या प्रत्येकाचा मानसन्मान राखला जाईल अशी ग्वाहीही त्यांनी दिली. उद्या किंवा परवा हा पक्षप्रवेश होणार होता मात्र आजचा मंगळवारचा दिवस शुभ असल्याने महाजन यांनी आज हा पक्षप्रवेश ठेवला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी चव्हाण म्हणाले की, प्रवेश केलेल्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. भाजपाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वांनी एक परिवाराप्रमाणे काम करायचे आहे. आपला पक्ष मोठा करणे त्याचा प्रसार करणे म्हणजे पक्षाप्रति प्रामाणिक असणे असते. आगामी नाशिक महापालिका निवडणुकीत अबकी बार १०० पार चे लक्ष्य असणार आहे. तसेच उत्तर महाराष्ट्रातील सर्व महापालिकांमध्ये भाजपाची सत्ता आणणे आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत जास्तीत जास्त संख्येने भाजपा उमेदवार निवडणून देणे हे उद्दिष्ट असणार आहे असे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

### महापालिका निवडणुकीत ताकद दाखवू : बडगुजर

यावेळी बडगुजर म्हणाले की १८ वर्ष काम करूनही ठाकरे गटात माझा अनादर झाल्याने मी भाजपामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. महापालिका निवडणुकीत त्यांना आपली ताकद दाखवून देऊ निवडणुकीत भाजपाची ताकद दाखवून देऊ असे घोलप यांनी सांगितले. आज प्रवेश केलेल्यांमध्ये नाशिकचे माजी नगरसेवक अशोक सातभाई, माजी नगरसेविका हर्षा बडगुजर, वंदना बिरारी, शीतल भामरे, माजी सभागृह नेते दिलीप दातीर तसेच यावल तालुक्यातील ( जिल्हा जळगाव ) प्रभाकर सोनावणे, विनोदकुमार पाटील, आर. जी. पाटील, अनील पाटील, आरती पाटील, लताबाई पाटील आदींनी प्रवेश केला. पुसद विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवलेल्या मनसेचे अश्वीन जयस्वाल, छत्रपती संभाजीनगरचे भगवान पवार, उद्योजक मनोज पवार आदींनीही प्रवेश केला.

# ग्राहकांना व्यावसायिक कॉल करण्यासाठी परवानगी

## केंद्रीय दूरसंचार मंत्रालयाचे परिपत्रक, फसवणुकीला बसणार चाप

**नवी दिल्ली, १७ जून**

कंपन्यांनी ग्राहकांना व्यावसायिक कॉल करण्यासाठी सरकारची परवानगी घेणे यापुढे अनिवार्य राहणार आहे. बनावट कॉल आणि संदेशांना रोखण्यासाठी केंद्रीय दूरसंचार मंत्रालयाने परिपत्रक जारी केले आहे.

भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण अर्थात् ट्रायकडे ग्राहकांच्या आलेल्या तक्रारीची दखल घेत कंपन्यांसाठी परिपत्रकातून दिशानिर्देश जारी केले आहे. ऑनलाईन वस्तू खरेदीनंतर किंवा सेवा घेतल्यानंतर संबंधित कंपन्यांविरुद्ध ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात तक्रारी केल्या जात आहेत, असे ट्रायच्या निदर्शनास आले. तक्रारींची तपासणी केल्यावर संबंधित कंपन्या अनेकदा असा दावा करतात की, त्यांच्याकडे व्यावसायिक कॉल आणि संदेश करण्यासाठी ग्राहकांची संमती आहे.

मात्र, अनेक प्रकरणांमध्ये अशी संमती ऑफलाईन किंवा पडताळणी न करता घेतल्याचे समोर आले. यामुळे त्यांची वैधता आणि सत्यता निश्चित करणे अत्यंत कठीण झाले. नव्या नियमांनुसार व्यावसायिक संभाषणासाठी कंपन्यांना सहमती घेणे अनिवार्य करण्यात आले. (वृत्तसंस्था)

### दोन टप्प्यांत अंमलबजावणी

१३ जूनला याबाबत सर्व दूरसंचार सेवा प्रदात्यांना निर्देश जारी केले असल्याचे दूरसंचार मंत्रालयाने म्हटले आहे. पहिल्या टप्प्यात बँकाना या नियमांचे पालन करण्यास सांगण्यात आले, तर दुसऱ्या टप्प्यात इतर कंपन्यांसाठी दिशानिर्देश लागू होणार आहे. बँकिंग व्यवहारांची संवेदनशीलता आणि स्पॅम कॉलद्वारे होणाऱ्या आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांना लक्षात घेता नव्या नियमांची सुरुवात करण्यात आली. अंमलबजावणीच्या पहिल्या टप्प्यात बँकिंग क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले आहे, असे दूरसंचार मंत्रालयाने म्हटले आहे.

# इराणमध्ये सत्तांतराची हीच संधी

## माजी राजाच्या मुलाची नागरिकांना साद ● संवैधानिक व्यवस्था स्थापन करण्याचे आवाहन

**तेहरान, १७ जून**

इस्रायल-इराण युद्धात सामान्य नागरिकांचे बळी जाणे आम्हाला मान्य नाही. निरंकुश सत्ताधाऱ्यांच्या चुकीची शिक्षा देशाला भोगावी लागत आहे. आता सत्तांतराची वेळ आली आहे, अली खामेनेनी यांना पदच्युत करण्याची हीच वेळ असल्याचे इराण येथील माजी राजाचा मुलगा अली रझा शाह पहलवी यांनी देशवासीयांना केले. रझा तत्कालीन राजा शाह मोहम्मद पहलवी यांचा मुलगा असून, सध्या ते अमेरिकेत आहे.



वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत रझा यांनी म्हटले की, इराणमध्ये संविधानिक व्यवस्था लागू करण्यासाठी आम्ही ४० वर्षांपासून सत्ताधाऱ्यांशी लढत आहोत आणि आता आमची वेळ आली आहे. हे अली खामेनेनींचे युद्ध आहे, इराणी जनतेचे नाही. निरंकुश सत्ताधाऱ्यांना लोकांचा पाठिंबा राहिलेला नाही. खामेनेनीला पाठिंबा देणारे बहुतांश कमांडर हल्ल्यात मारले गेले, पर्यायाने त्यांची सत्तेवरील पकड सैल झाली आहे.

इस्रायली हल्ल्याचा उद्देश इराणच्या सत्ताधाऱ्यांकडून निर्माण झालेला धोका निष्प्रभ करणे आहे. सामान्य नागरिकांवर हल्ला करण्याचा त्यांचा कोणताही हेतू नाही. इस्रायली हल्ल्यांमुळे इराणचे सध्याचे प्रशासन कमकुवत झाल्याने तेथील बदलाचा मार्ग मोकळा होणार आहे. इराणी जनतेसाठी स्वतःला मुक्त करण्याची ही एक संधी आहे. इराणी जनतेला लोकशाही आणि स्वातंत्र्याच्या दिशेने नेण्याची ही वेळ असून, जनतेने आता खामेनेनीच्या विरोधात रस्त्यावर उतरावे. (वृत्तसंस्था)

### कोण आहे अली रझा पहलवी ?

अली रझा पहलवी हे इराणच्या राष्ट्रीय परिषदेचे संस्थापक आणि नेते आहेत. हा एक निर्वासित विरोधी गट आहे. हा गट इराणमध्ये लोकशाही सुधारणा आणि इस्लामिक प्रजासत्ताकाच्या समाप्तीचा पुरस्कार करतो. रजा शाह पहलवी देशात लोकशाही आणण्यासाठी सुरू झालेल्या चळवळीचे नेतृत्व करीत आहेत. त्यांची राजकीय योजना इराणमध्ये संवैधानिक व्यवस्था स्थापन करण्यावर केंद्रित आहे. रझा पहलवी यांचे कुटुंब एकेकाळी इराणवर राज्य करीत होते. १९७९ पर्यंत, रझा शाह पहलवी यांचे वडील शाह मोहम्मद रझा पहलवी इराणचे राजा होते. आता त्यांचे कुटुंबीय अमेरिकेत शरणार्थी आहे.



### इराणच्या नव्या लष्कर प्रमुखाचा खात्मा

इस्रायलच्या हल्ल्यात मंगळवारी चार दिवसांपूर्वी नियुक्त केलेले इराणचे लष्करप्रमुख आणि सैन्य कमांडर अली शादमानी ठार झाले. शादमानी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचे सैन्य सल्लागार आणि सशस्त्र दलांच्या आपत्कालीन कमांड आणि खातम अल अंबिया मुख्यालयाचे कमांडर होते. इस्रायलच्या लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, मंगळवारी रात्री तेहरानवर हवाई हल्ले केले, त्यात शादमानी यांच्यासह सैन्याचे पाच कमांडर ठार झाले.

# कुंडमळा पूल दुरुस्तीला हेतुपुरस्सर दिरंगाई करणाऱ्यावर कारवाई

■ रविंद्र चव्हाण यांची ग्वाही

■ संजय राऊतांची टीका राजकारणापोटी

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १७ जून:**

इंद्रायणी नदीवरील कुंडमळा येथील पादचारी पूल वाहून गेल्याची दुर्घटना अत्यंत दुःखद आहे. मात्र अशावेळी संजय राऊत यांनी निव्वळ राजकारण करण्याच्या उद्देशाने केलेली टीका ही अत्यंत उथळ, अपरिपक्व विचारांचे प्रदर्शन करणारी आहे,अशी घणाघाती टीका भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मंगळवारी केली.या पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला हेतुपुरस्सर दिरंगाई झाली असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित कारवाई होईल, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

पत्रकारांशी बोलताना चव्हाण म्हणाले की, कुंडमळा नदीवरील जोडरस्त्यासह नवीन पूलाच्या बांधकामासाठी जुलै, २०२४ च्या पुरवणी अर्थसंकल्पामध्ये ८ कोटी रुपयांच्या तरतुदीला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर २०२४ विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू झाली. दरम्यानच्या काळात सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता व पूलाचे डिझाईन अंतिम करण्यात आले. मावळ तालुक्याचे भाजपाचे तालुकाध्यक्ष रविंद्र भेगडे यांनी पाठपुरावा केल्यानंतर शेतकरी व लोकहितासाठी आपण तात्काळ ८ कोटी रुपयांच्या रक्कमेच्या नवीन पूलास प्रशासकीय मंजूरी दिल्याचे पत्र ११ जुलै २०२४ रोजी दिले होते. बांधकाम विभागातर्फे या पुलाच्या दुरुस्तीचा कार्यारंभ आदेश देण्यात आले असून, एका वर्षात काम पूर्ण करण्याच्या सूचनाही दिल्या गेल्या होत्या. असे असताना पुढील प्रक्रियेला हेतुपूर्वक विलंब लावला गेला असेल तर त्याची चौकशी करून दोषींवर कारवाईही होईल, असे चव्हाण यांनी नमूद केले.

### 'अर्थसंकल्प कसा वाचावा' पुस्तक राऊतांना भेट देऊ

अर्थसंकल्प कसा वाचायचा याची ढोबळ माहितीही राज्यसभा खासदार असलेल्या संजय राऊत यांना नसल्याचे त्यांनी केलेल्या टीकेवरून दिसत आहे. या पुलाच्या कामासंदर्भात त्यांनी केलेल्या आरोपांची कीव येते. अर्थसंकल्पात आकडे हजारात असतात. त्या हिशोबानुसार या पुलाच्या दुरुस्तीसाठी ८ कोटींची तरतूद करण्यात आली होती. हे खासदार असलेल्या राऊत यांना कळत नसेल तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लिहीलेले 'अर्थसंकल्प - सोप्या भाषेत ' हे पुस्तक राऊत यांना भेट देऊ,अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

# खाजगी हेलिकॉप्टर कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल

◆ **डेहराडून, १७ जून**

केदारनाथजवळ रविवारी झालेल्या हेलिकॉप्टर अपघातात दोन वर्षांच्या मुलासह सात जणांचा मृत्यू झाल्याच्या आरोपाखाली हेलिकॉप्टर सेवा चालविणारी कंपनी आर्यन एव्हिएशन प्रायव्हेट लिमिटेडविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गौरीकुंड आणि त्रियुगीनारायण दरम्यान गौरी माई खार्कच्या जंगलात खराब हवामानामुळे कोसळलेले बेल ४०७ हेलिकॉप्टर आर्यन एव्हिएशन प्रायव्हेट लिमिटेडचे होते.

पोलिसांनी सांगितले की, आर्यन एव्हिएशनचे व्यवस्थापक कौशिक पाठक आणि व्यवस्थापक विकास तोमर यांच्याविरुद्ध सोनप्रयाग पोलिस ठाण्यात बीएनएस आणि विमान कायदा १९३४ च्या कलम १० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

# चीनच्या निर्णयाने ईव्ही क्षेत्र अडचणीत

## महिनाभरात बिघडू शकते भारतातील इलेक्ट्रिक वाहन उद्योगाचे गणित

◆ **नवी दिल्ली, १७ जून**

भारतातील इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) उत्पादनाला सध्या मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. कारण, चीनकडून दुर्मिळ चुंबक यांच्या निर्यातीवर कडक निर्बंध लावले गेले आहेत. भारतीय वाहन उद्योगाचे यावर मोठे अवलंबित्व असून, मागील आर्थिक वर्षात भारताने रेअर अर्थ मॅग्नेटची सुमारे ८० टक्के आयात चीनमधून केली होती.

ईव्ही आणि हायब्रीड वाहनांमध्ये 'परमनंट मॅग्नेट सिंक्रोनस मोटर्स' (पीएमएसएम) वापरल्या जातात, ज्यात हे चुंबक आवश्यक असतात. या मोटर्स कमी खर्चीक असून उच्च टॉर्क आणि ऊर्जा कार्यक्षमता देतात.



पारंपरिक इंजिन (आयसीई) असलेल्या वाहनांमध्येही, हे चुंबक इलेक्ट्रिक पॉवर स्टीयरिंगसारख्या यंत्रणांमध्ये वापरले जातात.

**चीनने लागू केलेले निर्बंध**

एप्रिल २०२५ मध्ये चीनने सात दुर्मिळ घटक व तयार चुंबकांच्या निर्यातीवर कडक अटी लागू केल्या. त्यानुसार, निर्यात करण्यापूर्वी स्पष्ट वापर तपशील देणे आवश्यक असून, संरक्षण क्षेत्र व अमेरिकेशी संबंधित व्यवहारांवर बंदी घातली आहे. परिणामी, चीनमध्ये आयात मंजुरी प्रक्रियेचा कालावधी ४५ दिवसांवर पोहोचला असून, यामुळे आयातीत मोठा अडथळा येत आहे. (वृत्तसंस्था)

### भारतीय वाहन कंपन्यांवर परिणाम

क्रिसिल रेटिंग्जच्या माहितीनुसार, ३० पेक्षा अधिक भारतीय कंपन्यांच्या आयात विनंती भारत सरकारकडून मंजूर झाल्या आहेत, पण चीनकडून अद्याप कोणतीही मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे जून २०२५ अखेरपर्यंत कोणतीही शिपमेंट भारतात पोहोचलेली नाही. देशातील अनेक कंपन्यांनी चार ते सहा आठवड्यांचा साठा करून ठेवला असला, तरी जुलै २०२५ पासून उत्पादन ठप्प होण्याचा धोका निर्माण झाला आहे. २०२५-२६ मध्ये पॅसेंजर वाहनांची वाढ २-४ टक्के राहण्याची शक्यता आहे. मात्र, विक्रीत ३५ ते ४० टक्के वाढ अपेक्षित होती. याशिवाय, इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांची वाढ २७ टक्क्यांच्या घरात अपेक्षित होती. परंतु, हे सारे अंदाज या पुरवठा अडथळ्यामुळे धोक्यात येऊ शकतात.

# रशियाचा कीव्हवर ड्रोन-क्षेपणास्त्र हल्ला

■ १४ जणांचा मृत्यू, ४४ जखमी

**कीव्ह, १७ जून**

रशियाने मंगळवारी पहाटे युक्रेनची राजधानी कीव्हवर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ला केला. यामध्ये १४ जणांचा मृत्यू झाला आणि ४४ जण जखमी झाले. युक्रेनच्या गृह मंत्रालयाने ही माहिती दिली.

रशिया-युक्रेन युद्धातील अलिकडच्या काही महिन्यांतील कीववर झालेल्या सर्वांत घातक हल्ल्यांपैकी हा हल्ला आहे. कीव्हच्या सोलोमियान्स्की जिल्ह्यातील एका नऊमजली निवासी इमारतीवर क्षेपणास्त्राचा मारा झाला आणि इमारतीचा एक भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला, असे युक्रेनचे गृहमंत्री इहोर क्लिमेन्को यांनी सांगितले. आपत्कालीन सेवा ढिगाऱ्यात अडकलेल्या संभाव्य वाचलेल्यांचा शोध घेण्यासाठी जलदगतीने काम करीत आहेत. हल्ल्यात निवासी इमारती, शैक्षणिक संस्था आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे नुकसान झाले आहे, असे क्लिमेन्को म्हणाले. स्थानिक अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कीव्ह व्यतिरिक्त देशाच्या इतर भागातही हल्ले झाले. यामध्ये राजधानीच्या बाहेरील भागात एक आणि दक्षिण ओडेसा प्रदेशात १३ जण जखमी झाले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींना सायप्रसचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान

◆ **निकोशिया, १७ जून**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सायप्रसमधील 'ग्रॅण्ड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकारिओस' हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला. सायप्रस प्रजासत्ताकाचे पहिले अध्यक्ष मकारिओस (तिसरे) यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार राष्ट्राच्या प्रशंसनीय सेवेसाठी राष्ट्रप्रमुख आणि इतर महत्त्वाच्या व्यक्तींना प्रदान केला जातो.

निकोशिया येथील राष्ट्रपती निवासस्थानी आज झालेल्या कार्यक्रमात सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टोडोलाइड्स यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुरस्कार प्रदान केला. या सन्मानाबद्दल पंतप्रधान मोदी यांनी क्रिस्टोडोलाइड्स यांच्यासह सायप्रसच्या जनतेचे आभार मानले.

**१४० कोटी भारतीयांचा सन्मान : पंतप्रधान मोदी**

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, सायप्रसमधील सर्वोच्च सन्मान ग्रॅण्ड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकारिओस या पुरस्काराने माझा सन्मान करण्यात आला याबद्दल मी सायप्रस सरकारचे आणि जनतेचे मनापासून आभार मानतो. हा सन्मान फक्त माझा नाही, तर १४० कोटी भारतीयांचा आहे. हा त्यांच्या क्षमता आणि आकांक्षांचा सन्मान आहे. हा आपल्या देशाच्या सांस्कृतिक बंधुत्वाचा आणि 'वसुधैव कुटुंबकम्' च्या विचारसरणीचा सन्मान आहे. मी हा सन्मान भारत आणि सायप्रसमधील मैत्रीपूर्ण संबंधांना आणि आपल्या सामायिक मूल्यांना आणि परस्पर समजसपणाला समर्पित करतो. सर्व भारतीयांच्या वतीने मी अत्यंत नम्रतेने आणि कृतज्ञतेने हा सन्मान स्वीकारतो. (वृत्तसंस्था)



# आता निश्चिंतपणे जेवा हॉटेलात!


## ● शाकाहारी, मांसाहारी अन्न वेगवेगळे शिजवणार

## ● एफडीएने जारी केली नियमावली

◆ **पुणे, १७ जून**

पुणे शहरातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांना यापुढे शाकाहारी जेवण बनवताना विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. यापुढे शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थ स्वतंत्रपणे तयार करणे, त्यांची प्रक्रिया करणे आणि शिजवणे बंधनकारक असणार आहे. या अन्न सुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्या व्यावसायिकांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा थेट इशारा अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) अन्न सुरक्षा आयुक्तांनी दिला आहे.

अन्न व औषध प्रशासनाने सूचना जारी करताना सांगितले की, अन्न सुरक्षा हे केवळ कायदेशीर मुद्दा नाही, तर ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित एक अत्यंत महत्त्वाची आणि संवेदनशील जबाबदारी आहे. अनेकदा एकाच ठिकाणी शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थ एकत्र हाताळल्यास किंवा शिजवल्यास भेसळीची शक्यता वाढते. त्यामुळे ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. विशेषतः धार्मिक आणि नैतिक कारणांमुळे शाकाहारी लोक मांसाहारी हॉटेलमध्ये जेवण करण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थ वेगवेगळे शिजवावेत, असा सूचना अन्न व सुरक्षा प्रशासनाने दिल्या आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांना तात्काळ नोटीस बजावून कायदेशीर कारवाई केली जात असल्याचे आयुक्तांनी सांगितले. त्यामुळे यापुढे हॉटेल व्यावसायिकांना शाकाहारी व मासांहारी जेवण तयार करताना विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. (वृत्तसंस्था)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# आनंदाची वारी : ज्ञानबा तुकाराम..!

'वारी' या शब्दाचा अर्थ नियमित फेरी, व्रत, येरझारा असा आहे. तर 'वारकरी' म्हणजे पंढरीची वारी करणारा, ठरलेल्या दिवशी यात्रा करणारा असा आहे. हे वारकरी आपसात जो आचारधर्म पाळतात तो 'वारकरी धर्म'. साधारणपणे जून, जुलै म्हणजेच ज्येष्ठ आषाढात शतकानुशतके नाचत, गात, चालत असलेली ही वारी आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरला विठू माउलीच्या दारी बरोब्बर पोहोचते. ज्ञानेश्वर, नामदेवांच्या काळात म्हणजे तेराव्या शतकात सर्व जातींची संतमंडळी पंढरपूरला नेहमीच एकत्र येत असत. 'वारकरी' हा जातिविरहित संप्रदाय मानला जातो.

'सकळांशी आहे येथे अधिकार' या उक्तीप्रमाणे ज्ञानदेव, नामदेव, चोखामेळा, सावता माळी, नरहरी सोनार, मुक्ताबाई, बहिणाबाई, एकनाथ, सेना न्हावी इत्यादींपासून तुकारामांपर्यंत सर्व या संत मांदियाळीत येतात. आदिनाथांपासून निवृत्तिनाथांपर्यंत 'एक गुरू व एक शिष्य' अशी नाथ परंपरा चालत आली. पण संत ज्ञानेश्वरांनी ही परंपरा खंडित करून ते ज्ञान सर्वांना खुले करून दिले. त्यातूनच सर्वांनाच मार्गदर्शक ठरणाऱ्या 'ज्ञानेश्वरी'ची निर्मिती झाली. यंदा १८ जूनला संत तुकारामांची पालखी देहू येथून आणि १९ जूनला संत ज्ञानेश्वरांची पालखी आळंदीहून निघणार आहे. ज्येष्ठ कृष्ण ७ व ८ या दोन तिथींमध्ये कधीही बदल झाला नाही, होत नाही आणि होणार नाही.

**पंढरीची वारी आहे माझे घरी । आणिक न करी तीर्थव्रत ॥**
**व्रत एकादशी करीन उपवासी । गाईन अहर्निशी मुखी नाम ॥**
**नाम विठोबाचे घेईन मी वाचे । बीज कल्पांतीचे तुका म्हणे ॥** असे संत तुकाराम म्हणतात. पंढरपूर म्हणजे अवघ्या तीर्थांचे माहेर. पंढरपूरची वारी केली की इतर कुठलीही तीर्थयात्रा करण्याची आवश्यकता राहत नाही. या अभंगात ते अतिशय गौरवाने सांगतात, 'माझ्या घराण्यात पंढरपूरच्या वारीची परंपरा अखंड सुरू आहे. त्यामुळे इतर कुठल्याही तीर्थाचे व्रत मी करीत नाही. पंढरीची वारी करताना एकादशीच्या उपवासाचे व्रत मात्र मी अगत्याने पाळतो. वारीची वाटचाल करताना आणि पंढरपूरच्या भूमीत गेल्यावर मुखी अहर्निश विठुरायाचा नामघोष सुरू असतो. विठुरायाचे नाम कल्पांतीचे बीज आहे, अवघ्या अस्तित्वाचे कारण आहे.' वारी ही पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या वारकरी संप्रदायाची एक महत्त्वाची आणि प्राचीन परंपरा आहे. तेराव्या शतकात या परंपरेचे उल्लेख सापडतात. संत ज्ञानदेव आणि संत तुकारामांच्याही कुटुंबात वारीची परंपरा होती. वारी ही ज्ञानदेवपूर्वकालीन प्रथा असून, 'वारकरी' हे नाव वारीमुळेच पडले आहे.

वारी हा एक आनंद सोहळा असून, यात अनेक जातींचे, उच्चशिक्षित-निरक्षर, श्रीमंत-गरिब सर्वजण एकोप्याने प्रवास करतात. वारीला कोणताही आयोजक किंवा प्रायोजक नसतो आणि त्यासाठी जाहिरातही केली जात नाही. ज्यामुळे तिचे नैसर्गिक आणि स्वयंभू स्वरूप दिसून येते. वारीची परंपरा शेकडो वर्षांची असून ती मानवी संस्कृतीचा एक स्थायीभाव आहे. पंढरपूर वारी हा परंपरा, परिपाठ आणि परिपूर्ण व्यवस्थापनाचा संगम आहे. ती केवळ एक धार्मिक पदयात्रा नाही, तर ती महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ही परंपरा ८०० वर्षांहून अधिक प्राचीन असून तिचे मूळ संत ज्ञानेश्वरांच्याही पूर्वीचे आहे. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे स्वतः वारी करत असल्याचा उल्लेख आढळतो, यावरून या परंपरेच्या ऐतिहासिकतेची साक्ष मिळते. वारी म्हणजे वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचे सजीव रूप. समता, बंधुता आणि मानवतेच्या मूल्यांवर आधारलेला हा संप्रदाय संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' या ग्रंथांमधून तात्त्विक अधिष्ठानासह समाजापर्यंत पोचवला. संत तुकाराम महाराजांनी आपल्या 'अभंगवाणी'तून भक्तिमार्ग अधिक सुलभ व लोकाभिमुख केला.

पालखीची आधुनिक संकल्पना संत तुकाराम महाराजांचे पुत्र नारायण बाबा यांनी १६८५ मध्ये सुरू केली. या उपक्रमामुळे वारीला संघटित, शिस्तबद्ध स्वरूप प्राप्त झाले. वारीचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची सर्वसमावेशकता.□जात, पंथ, लिंग किंवा सामाजिक स्तर यांचे बंधन येथे मानले जात नाही. सर्वजण एकमेकांना 'माउली' म्हणून संबोधतात आणि परस्पर सन्मानाने एकमेकांच्या पाया पडतात. ही केवळ एक पदयात्रा नाही, तर ती हिंदुत्वाच्या मूल्यांवर आधारित एक सामाजिक क्रांती आहे.

दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरमध्ये १० ते १५ लाख भाविक एकत्र येतात. ही संख्या सातत्याने वाढत आहे. कोविड-१९ महामारीनंतर वारकऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ दिसून आली आहे. वारीचे आकर्षण आता केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित राहिलेले नाही. कर्नाटक, आंध्र यासारख्या शेजारील राज्यांतूनही मोठ्या संख्येने भाविक येतात. वारीच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यवस्थापकीय पैलूंचा अभ्यास करण्यासाठी अनेक परदेशी नागरिक, संशोधक आणि अभ्यासकही या सोहळ्यात सहभागी होतात. वारीचे हे वाढते जागतिक आकर्षण केवळ तिच्या धार्मिक महत्त्वामुळेच नाही, तर तिच्या अद्वितीय व्यवस्थापन प्रणालीमुळे आहे. कोणत्याही एका केंद्रीय संस्थेच्या नियंत्रणाशिवाय, स्वयंशिस्त आणि परस्पर सहकार्यावर चालणारा लाखो लोकांचा हा सोहळा व्यवस्थापनशास्त्राच्या अभ्यासकांसाठी एक आदर्श 'केस स्टडी' बनला आहे. याच पृष्ठभूमीवर, महाराष्ट्र सरकारने या अनोख्या परंपरेला 'जागतिक वारसा' दर्जा मिळावा यासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

वारीच्या यशस्वी व्यवस्थापनाचा मूलाधार 'दिंडी' या संकल्पनेत आहे. दिंडी म्हणजे वारीच्या प्रवासात शिस्तबद्ध पद्धतीने चालणारा वारकऱ्यांचा एक संघटित गट. ही रचना वारीला एक विकेंद्रित पण अत्यंत प्रभावी व्यवस्थापन प्रणाली बांधली जाते. वारीला सध्याचे संघटित स्वरूप देण्याचे श्रेय १९ व्या शतकातील सरदार हैबतबाबा आरफळकर यांना दिले जाते. त्यांनीच दिंड्यांना क्रमांक देऊन आणि पालखीसोबत घोडे समाविष्ट करून वारीला लष्करी शिस्तीसारखे स्वरूप दिले. दिंडी म्हणजे साधारणपणे एकाच गावातील किंवा गुरुपरंपरेतील वारकऱ्यांचा समूह. प्रत्येक नोंदणीकृत दिंडीला एक विशिष्ट क्रमांक दिला जातो आणि पालखीच्या रथापुढे किंवा मागे चालण्याचे त्यांचे स्थान ठरलेले असते. हा क्रम संपूर्ण वारीदरम्यान काटेकोरपणे पाळला जातो, ज्यामुळे लाखो लोकांच्या गर्दीतही एक सुसूत्रता आणि शिस्त टिकून राहते. यंदा वारीत संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात २८० आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात ३७७ दिंड्या आहेत. वारीतील शिस्त ही स्वयं-प्रेरित आणि परंपरेवर आधारित आहे. वारकरी एकमेकांना 'माउली' म्हणून संबोधत असल्यामुळे आपोआपच जात, लिंग, वय आणि सामाजिक दर्जा यावर आधारित भेद गळून पडतात, समतेची भावना दृढ होते. संपूर्ण दिंडीत एकाच वेळी एकच अभंग एकाच तालात म्हटला जातो. एकीची आणि शिस्तीची भावना निर्माण होते. वारीचा सुमारे २१ दिवसांचा पायी प्रवास अक्षरशः एका 'चालत्या-फिरत्या शहरा'च्या व्यवस्थापनासारखा आहे. मार्गावरील 'यजमान' गावे वारकऱ्यांचे स्वागत आणि आदरातिथ्य करणे ही आपली सामाजिक जबाबदारी समजतात. या 'सेवा' परंपरेमुळेच लाखो वारकऱ्यांच्या निवास आणि भोजनाची सोय शक्य होते. अनेक गावकरी आपली घरे, वाडे वारकऱ्यांसाठी खुली करून त्यांची राहण्याची सोय करतात. अलिकडेच, राज्य सरकारने वारकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि वारीच्या व्यवस्थापनात सुसूत्रता आणण्यासाठी ५० कोटी रुपयांच्या प्रारंभिक निधीसह 'मुख्यमंत्री वारकरी महामंडळ' स्थापन केले आहे. या महामंडळामार्फत वारकऱ्यांसाठी पेन्शन, विमा आणि तीर्थक्षेत्र विकासकामे केली जाणार आहेत. शेवटी महत्त्वाचे हेच आहे,

**संत कृपा झाली । इमारत फळा आली ॥**
**ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ॥**
**नामा तयाचा किंकर । तेणे रचिलें तें आवार ॥**
**जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ॥**
**तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥**

## विशेष

# 'मास रॅपिड ट्रान्सपोर्ट सिस्टिम'ला चालना

**प्रा. सुखदेव बखळे**

भारतात पायाभूत क्षेत्राच्या विकासावर भर देण्यात आला आहे. त्यातही गतिमान वाहतूक आणि एकात्मिक वाहतूक सेवांवर भर दिला जात आहे. जगात आता 'मास रॅपिड ट्रान्सपोर्ट सिस्टिम्स' (एमआरटीएस)चा अंगीकार सुरू आहे. या बाबतीत भारताचे स्थान तिसरे आहे. 'एमआरटीएस' मध्ये मेट्रो रेल, रॅपिड रेल, मोनोरेल, निओ रेल आदींचा समावेश होतो. सध्या या सेवा एक हजार किलोमीटर क्षेत्रात आहेत. जगात या सेवांच्या विस्तारात भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. हाँगकाँग आणि जपान त्याबाबत आघाडीवर आहेत. २०३२ पर्यंत ही सेवा सुमारे तीन हजार किलोमीटरपर्यंत विस्तारेल, अशी अपेक्षा आहे. त्यानंतर भारत जगातील अशा सेवेबाबत दुसऱ्या क्रमांकाचा देश होईल. तथापि या प्रकल्पांची आर्थिक शाश्वतता हे एक आव्हान आहे. आर्थिक शाश्वतता साध्य करण्यासाठी, धोरण आणि नियोजन स्तरावर 'ट्रांझिट-ओरिएंटेड डेव्हलपमेंट'(टीओडी) बाबत मानसिकता बदलणे आवश्यक आहे. हाँगकाँग आणि जपान ही जगातील 'ट्रांझिट-ओरिएंटेड डेव्हलपमेंट' अंतर्गत शहरी वाहतूक प्रकल्पांची सर्वोत्तम उदाहरणे आहेत. तेथील अधिकारी त्यांच्या प्रकल्प संकल्पनेच्या टप्प्यातच 'टीओडी' समाविष्ट करतात. त्याशिवाय प्रकल्पांना मान्यताही मिळत नाही. ते पहिल्या दिवसापासून प्रकल्प आणि ऑपरेशनल व्यवहार्यता सुनिश्चित करतात. भारतात 'टीओडी'चा विचार नंतर केला जातो. बहुतेक प्रकरणांमध्ये प्रकल्प मंजूर झाल्यानंतर बांधकाम आणि ऑपरेशनल टप्प्यामधील एक सहायक महसूल स्रोत म्हणून त्याकडे पाहिले जाते.

सर्वोत्तम जागतिक यंत्रणांचा अवलंब करणे वाढीव बदलांद्वारे साध्य करता येत नाही. वाहतूक प्रकल्पाच्या एकूण संकल्पनेबाबत मानसिकतेमध्ये बदल आवश्यक आहे. उदाहरणार्थ, मेट्रो रेल्वेसारख्या शहरी वाहतूक प्रकल्पासाठी रिअल इस्टेट आणि व्यावसायिक महसुलात सहायक सेवांमधून उभा राहणारा महसूल मोठ्या प्रमाणात विभागला जातो. तिथे व्यावसायिकांमध्ये जाहिरात अधिकार, अन्न आणि पेय हक्क, दूरसंचार अधिकार इत्यादींचा समावेश असतो. ट्रांझिट लाईनचे काही भाग कार्यान्वित होताच जाहिरातींसाठी निविदा प्रकाशित केल्या जातात आणि विक्रेते गुंतवले जातात. तथापि, ट्रांझिट नेटवर्क वाढत असताना असे केले जाणे असमर्थनीय आहे. लहान मेट्रो रेल्वे करार असलेले अनेक परवानेधारक सर्व समान ब्रॅण्ड आणि मीडिया खरेदीदारांना आकर्षित करत आहेत. त्यामुळे ते एक कमॉडिटी बनत आहेत. यातून किमती कमी होऊन महसूल कमी होतो. ट्रांझिट अधिकाऱ्यांनी अशा करारांना एकाच प्लॅटफॉर्मअंतर्गत एकत्रित आणण्याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना जाहिरातींचे दर राखण्यास आणि एकूण जाहिरातींचे प्रमाण वाढवण्यास मदत होते. किरकोळ विक्री आणि अन्न आणि पेय हक्क, दूरसंचार हक्क, रिअल



इस्टेट मुद्रीकरण इत्यादींसाठीही हेच मुद्दे लागू होतात. देशाच्या प्रगतीसाठी पायाभूत सुविधा महत्त्वपूर्ण आहेत. आपल्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता येत असल्याने केंद्र सरकार देशातील पायाभूत सुविधा नियोजन आणि विकासाला गती देण्यासाठी पीएम गतिशक्ती प्लॅटफॉर्मसाठी 'एआय'च्या प्रगत आवृत्तीचा वापर करू शकते. गेल्या दोन वर्षांमध्ये देशात सुमारे २०० प्रकल्पांचे मूल्यांकन करण्यात आले आहे. त्याचे मूल्य सुमारे १३.५ लाख कोटी रुपये आहे.

भारतीय विमान वाहतूक उद्योग जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या उद्योगांपैकी एक आहे. वाढती हवाई वाहतूक, ग्राहकांची वाढती मागणी आणि पायाभूत सुविधा वाढवण्याच्या उद्देशाने सरकारी पातळीवर बऱ्याच सुधारणा होत आहेत. या क्षेत्रात केवळ पर्यटन आणि प्रवासाला चालना देण्याचीच नव्हे, तर रोजगाराच्या हजारो संधी निर्माण करण्याची आणि आर्थिक विकासाला चालना देण्याची क्षमता आहे. उद्योगाला नवीन आव्हाने आणि संधींचा सामना करावा लागत असल्याने भारतातील विमान वाहतुकीच्या भविष्यावर चर्चा करण्यासाठी उद्योगप्रमुख, भागधारक, धोरणकर्ते आणि नवोन्मेषकांना एकत्र आणणे महत्त्वाचे आहे. भारताचे पायाभूत सुविधा क्षेत्र परिवर्तनाच्या उंबरठ्यावर आहे. खाजगी भागधारकांना पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित करण्यासाठी जोखीम-लाभ वाटणी अधिक संतुलित करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, पायाभूत सुविधा बांधण्यासाठी सरकारला बहुपक्षीय एजन्सींकडून कर्ज घेणे सुरू ठेवावे लागेल. त्यामुळे कर्जाची मर्यादा संपून जाईल. मेट्रो रेल्वेसारख्या शहरी वाहतूक प्रकल्पांमध्ये प्रवासी संख्येचे प्रमाण प्रकल्प संकल्पनेच्या वेळी आणि सविस्तर प्रकल्प अहवालाच्या वेळी केलेल्या अंदाजांपेक्षा खूपच कमी आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकल्पाच्या डिझाईन, नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये प्रवासी संख्येचे उपक्रम एकत्रित करण्याची खरी गरज आहे. प्रवासाचा वेळ आणि खर्च कमी केला जातो, तेव्हाच खाजगी वाहतुकीतून सार्वजनिक वाहतुकीकडे ट्रांझिट मॉडेल स्थलांतर होऊ शकते.

बहुतेक ट्रांझिट अधिकाऱ्यांनी 'मल्टिमोडल इंटिग्रेशन आणि 'लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी'ची योजना आखली आहे; परंतु त्याचे परिणाम कमी झाले आहेत. सर्वांत प्रभावी उपक्रमांमध्ये 'ट्रांझिट स्टेशन्स'साठी फीडर बसमार्ग, स्टेशनच्या प्रवेशद्वारांवर/निर्गमनांवर ऑटो रिक्षा स्टॅण्ड सर्व वाहतूक डिझाईनमध्ये एकत्रित केले आहे; जेणेकरून प्रवाशांना गंतव्यस्थळी सहज पोहोचता येईल. ई-बाईक आणि ई-स्कूटरसारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचा विचार करण्यात आला आहे; परंतु त्याच्या अंमलबजावणीचे प्रमाण मर्यादित आहे. ते वाढवण्यावर भर द्यावा लागेल. अधिक पारंपरिक सार्वजनिक वाहतूक पद्धतींसह अखंड एकीकरण महत्त्वाचे आहे. इतर उपक्रमांमध्ये डिजिटल टिकिटिंगचाही समावेश आहे. तिथे व्हॉट्स ॲप, यूपीआय ॲप्स, वॉलेट ॲप्स इत्यादींद्वारे तिकिटे खरेदी करण्याचा पर्याय उपलब्ध असतो. त्यामुळे तिकिटांच्या रांगा टाळता येतात. त्यामुळे प्रवाशांचा प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होतो. यात एक 'लॉयल्टी प्रोग्राम' विकसित करण्याचे प्रयत्नदेखील केले जाऊ शकतात. त्याद्वारे प्रवाशांना सार्वजनिक वाहतुकीचा वापर करताना प्रत्येक किलोमीटर प्रवासासाठी कार्बन क्रेडिट मिळेल. परिणामी, कार्बन उत्सर्जन टळेल. ते भविष्यातील प्रवास आणि वाहतूक परिसंस्थेत सहभागी होणाऱ्या किरकोळ, अन्न आणि पेय ब्रॅण्डसाठी रिडीम केले जाऊ शकते. या पैलूंसाठी धोरणात्मक उपाययोजना सक्षम करणे आवश्यक आहे. तसे केल्यासच एकात्मिक शहर आणि वाहतूक नियोजन भारतातील शहरी वाहतूक पायाभूत सुविधांच्या पुढील दशकाला आकार देईल.

'मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेड' (एमएमओपीएल) ही 'रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर', 'व्हेओलिया ट्रान्सपोर्ट' आणि 'एमएमआरडीए' यांच्या मालकीची संयुक्त उद्यम कंपनी आहे. मुंबई मेट्रोच्या लाईन एक प्रकल्पाच्या (वर्सोवा-घाटकोपर) अंमलबजावणीसाठी ही कंपनी स्थापन करण्यात आली होती. हा मार्ग ११.४ किलोमीटर लांबीचा आहे. भारताची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईतील सर्वांत प्रतिष्ठित प्रकल्पासाठी 'एमएमओपीएल'ने 'डेल्टा'च्या लॅम्प आधारित व्हिडीओ वॉल सोल्यूशनमध्ये गुंतवणूक केली. 'डेल्टा'ने अनेक विभाग हाताळण्यास सक्षम कंट्रोलर आणि क्यूब कंट्रोल सॉफ्टवेअर सादर केले. 'एमएमओपीएल' लाईन १ पूर्व ते पश्चिम कनेक्टिव्हिटी प्रदान करते. नजीकच्या काळात ही मेट्रो दररोज सुमारे सहा लाख प्रवाशांना सेवा देईल. या लाईनमध्ये एक प्रगत सिग्नलिंग सिस्टिम आहे. त्यात 'ऑटोमॅटिक ट्रेन प्रोटेक्शन सिस्टिम' (एटीपीएस) आणि ट्रेन हालचाली नियंत्रित करण्यासाठी ऑटोमॅटिक सिग्नलिंग समाविष्ट आहे. सिग्नलिंग, सीसीटीव्ही मॉनिटरिंग, पॉवर मॉनिटरिंग आणि रिले पॉईंट मॉनिटरिंग हे सर्व 'डेल्टा'च्या व्हिडीओ वॉलवर प्रदर्शित केले आहेत. मेट्रो ट्रेन्स फक्त १८.५ तास चालणार असल्या तरी डेल्टा व्हिडीओ वॉलवर ऑपरेशन्सचे संपूर्ण काळ निरीक्षण केले जाईल. अन्य विभागातही अशाच सेवा सुरू कराव्या लागतील.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन

ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू हा आंदोलनातून स्वत:ची ओळख निर्माण करणारा नेता आहे. प्रहार जनशक्ती पक्षाच्या माध्यमातून समाजातल्या विविध घटकांतील वंचित, शोषित, पीडितांकडे शासनाचे आणि प्रशासनाचे कायम लक्ष वेधणारा हा नेता रुग्णसेवक म्हणून ओळखला जातो. अनेक वेगवेगळी अभिनव आंदोलने बच्चू कडू यांनी केली आहे. चारवेळा आमदार राहिलेल्या बच्चू कडू यांचे परिचय पत्र (बायोडाटा) लांबलचक आहे. आमदारकीच्या पहिल्या तीन खेपेमध्ये सत्ताधाऱ्यांपासून दूर राहून त्यांना कोंडीत पकडणाऱ्या बच्चू कडू यांना आमदारकीच्या चौथ्या खेपेत सत्तेत सहभागी होण्याचा मोह आवरता आला नाही. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडीच्या मंत्रिमंडळात ते राज्यमंत्री होते. जवळपास अडीच वर्षे ते मंत्री होते. सत्तेचा अनुभव चांगला होता की नाही, हे त्यांनी जाहीरपणे कधी सांगितले नाही. पण, एकनाथ शिंदे यांच्या बंडात सहभागी होऊन ते गुवाहाटीला गेल्याने अनेकांना त्यांच्या सत्तेतल्या अनुभवाचे अंदाज बांधणे शक्य झाले. पुढे शिंदेंच्या नेतृत्वातील मंत्रिमंडळात थेट सहभाग हा त्यांचा हक्क होता. पण, माशी कुठे शिंकली माहिती नाही. दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियान अध्यक्ष असे राज्यमंत्री दर्जा असलेले पद त्यांना देण्यात आले. दिव्यांगांना हक्काचे जे काही मिळाले, त्यात बच्चू कडू यांचा सिंहाचा वाटा मान्य करावा लागतो.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात त्यांना जे काम मिळाले होते, त्यात ते खूप समाधानी नव्हते. त्यांच्या अस्वस्थतेचे नेमके कारण त्यांनी कधी जाहीरपणे सांगितले नाही. पण, तेव्हा उघडपणे त्यांनी घेतलेल्या भूमिका फारच बोलक्या होत्या. पुढे विधानसभा निवडणुका लागल्या. महायुतीशी त्यांचा ताळमेळ बसला नाही. तिसरी आघाडी करून ते निवडणुकांना सामोरे गेले. अचलपूर मतदारसंघातून पाचव्यांदा आमदार होण्याचे त्यांचे स्वप्न भंगले. ते कसे आणि कोणत्या कारणांनी भंगले हे त्यांनाच चांगले माहीत आहे. अपयशाने खचून जाणारा हा नेता नाही. दिव्यांग, शेतकरी, शेतमजूर यांच्यासाठी कायम आवाज बुलंद करणे हीच त्यांची ऊर्जा आहे. प्रत्येकक्षणी ते आंदोलन व आक्रमक भूमिकेत असतात. वेगवेगळ्या कारणांतून विद्यमान सरकारवर त्यांचा रोष आहे. निवडणूक प्रचारात देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. ते त्यांनी पाळावे आणि दिव्यांगांच्या मागण्या मंजूर कराव्या यासाठी त्यांनी अन्नत्याग आंदोलनाचे हत्यार उपसले होते. राष्ट्रसंतांच्या गुरुकुंज मोझरीतल्या या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी भारतीय किसान युनियनचे नेते राकेश टिकैत यांनी सर्वप्रथम हजेरी लावली. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे, संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी, आ. रोहित पवार या प्रमुख नेत्यांसह विरोधी बाकावरचे काही आमदार व खासदार आले तर काहींनी समर्थनाचे पत्र पाठविले. येऊन भाषण ठोकून गेलेल्या या मंडळींनी आपल्या प्रभाव क्षेत्रात बच्चू कडू यांचे आंदोलन उभे केले नाही. काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार, उबाठा गट यांनी समर्थन दिले पण आंदोलनाला बळ दिले नाही. एखाद दुसरा अपवाद सोडला तर मोझरी वगळता जेथे कुठे आंदोलन झाले ते फक्त प्रहारच्या कार्यकर्त्यांनीच केले. काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांचा मोझरी बालेकिल्ला पण, त्यांनी प्रत्यक्ष न जाता जड अंत:करणाने पाठिंबापत्र काढले. या आंदोलना दरम्यान विरोधकांची एकजूट शक्ती बच्चू कडू यांच्या पाठीशी उभी राहिली नाही, हे वास्तव आहे. ती उभी असती तर चित्र वेगळे असते. ती का उभी राहिली नाही, त्याची कारणे वेगवेगळी आहेत. विरोधी नेते थकल्यानंतर सत्ताधारी पक्षाचे नेते आंदोलनात पोहोचले. त्यांनी बच्चू कडू यांना ठोस आश्वासन देऊन आंदोलन थांबविले. हा थांबा तात्पुरता आहे, असे उपोषण सोडताना कडू यांनी सरकारला बजावले आहे.

अन्नत्याग आंदोलनातून थेट काही हातात आले नाही. पण, ज्या मागण्या होत्या त्या ऐरणीवर आल्या. काहींवर काम सुरू झाले तर काही तत्त्वत: मान्य झाल्या आहेत. पुढे काय होते, हे दिसेलच. बच्चू कडू यांनी एकट्याच्या जीवावर कार्यकर्त्यांना सोबत घेऊन हे आंदोलन उभे केले. फक्त काही अदृश्य हात त्यांच्या मदतीला होते आणि त्यात काही गैर नाही. एकमेकांना मदत केलीच पाहिजे. कोण कधी कोणाच्या कामात येईल हे गुवाहाटीतून लक्षात आले. आता राहिला प्रश्न शेतकरी कर्जमाफीचा! यापूर्वी तीनदा झाली पुढेही होईल. पण, हा काही शाश्वत उपाय नाही. शेतकरी कर्जबारीच होऊ नये अशी व्यवस्था उभी करण्यावर आपल्या सर्वांचा भर असला पाहिजे. हा विषय खूप व्यापक असला तरी राजकीय फायदा व तोट्याचा विचार न करता समजून घेतला तरच काही शक्य आहे. अन्यथा एकमेकांची फसवणूक होतच राहील.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# पंचकोशातील प्राणमय कोश!

**प्रा. दिलीप जोशी**

मागील आठवड्यात अन्नमय कोश म्हणजे आपला स्थूलदेह किंवा आपले शरीर होय. याबाबत आपण चर्चा केली होती. अन्नमय कोशानंतर येणारा कोश म्हणजे प्राणमय कोश. 'प्राण' या शब्दावरूनच लक्षात येईल की, प्राणमय कोश किती महत्त्वाचा!

प्राण गेला म्हणजे तो मनुष्य गेला. प्राण नसेल तर आपला देह मृत घोषित होतो. देह मृत झाला याची खात्री श्वासोच्छ्श्वास पाहून करतात. अजून सोपे केले तर प्राण गेला की नाही हे पाहण्यासाठी ढोबळमानाने नाकाजवळ बोट ठेवून श्वास चालू आहे का पाहतात. यावरून हे तर लक्षात येते की, आपला श्वासोच्छ्श्वास सुरू असेल तरच प्राण आहे आणि तो बंद झाला की प्राण गेला समजण्यासाठी लक्षात घेऊ की प्राणपाखरू उडाले म्हणजे प्राणमय कोश उडून गेला. याचा अर्थ अन्नमय कोशाच्या आत असलेला प्राणमय कोश आहे. प्राण म्हणजे श्वास बंद झाला की ते शरीर मृत झाले. अर्थात प्राण गेला.

आपल्या अन्नमय कोशाच्या आतील कोशाला प्राणमय कोश म्हणतात. यालाच सूक्ष्मदेह म्हणतात किंवा यालाच ऊर्जा शरीर असेही म्हणतात. हे ऊर्जा शरीर स्थूल शरीराला जिवंत ठेवते. प्राणमय कोश हा अन्नमय कोशाचे ऊर्जा कवच आहे. आपल्या स्थूलदेहाचे वर्तन होण्यासाठी लागणारी ऊर्जा प्राणमय कोश म्हणजे सूक्ष्मदेह देतो. जसे आपल्या घरातील शीतकपाट म्हणजे फ्रिज सुचारू राहण्यासाठी त्याची पिन विद्युत प्लगला जोडावी लागते अन्यथा तो फ्रिज केवळ ढाचा असेल. विद्युतशिवाय फ्रिज व्यर्थ. त्याप्रमाणेच अन्नमय कोशाला प्राणमय कोशाला जोडणे आवश्यक. दोहोतला संबंध तुटला तर ते केवळ मृत कलेवर राहील. 'चाले हे शरीर कोणाचीये सत्ते' तर त्याचे सामान्य उत्तर म्हणजे प्राणमय कोश म्हणता येईल. प्राणमय कोश म्हणजे चेतनऊर्जा आहे.




प्राणमय कोश हा श्वासोच्छ्श्वासाने पुष्ट होतो, ज्याला आपण योगशास्त्रात प्राणायाम म्हणतो. प्राण म्हणजे वायू. असे १४ प्रकारांचे वायू आपल्या शरीरावर परिणाम करतात. यातील प्राणवायू, व्यान वायू, अपान वायू, उदान वायू आणि समान वायू हे पंचवायू महत्त्वाची भूमिका पंचकोश पुष्टीकरणात घेतात.

प्राणवायू श्वास क्रियेत असतो. तो शरीराला पुष्ट करतो. तो नाकापासून हृदयापर्यंत कार्यरत असतो. अपानवायू नि:श्वास क्रियेतून उत्सर्जन क्रिया अर्थात विषहरण करतात. तो नाभीपासून पायापर्यंत असतो. समान वायू आंतरिक गतिविधीमध्ये मानसिक विकासात मदत करतो. तो हृदयापासून नाभीपर्यंत असतो. उदान वायू स्वर उच्चारणात महत्त्वाची भूमिका घेतो. तो गळ्यापासून मस्तकापर्यंत असतो. व्यान वायू शरीर आकुंचन क्रियेत प्राण ऊर्जा शरीरात सर्वत्र पोहोचवतो आणि समन्वय साधतो. त्याचा संपूर्ण शरीरभर संचार असतो. प्राण म्हणजे हृदयाची धडकन होय. प्राणमय कोश अन्नमय कोशाची एका अर्थाने बॅटरी आहे. बॅटरी जर उतरली तर तो मोबाईल केवळ डब्बा तद्वतच प्राणमय कोशाशिवाय अन्नमय कोश म्हणजे प्रेत होय. खरं सांगायचं तर प्राणमय कोश हा अन्नमय कोश आणि मनोमय कोश यांना जोडणारा पूल आहे. कारण जेव्हा शारीरिक हालचाली वाढतात तेव्हाही प्राण वाढतो आणि मानसिक चढउतार झाला तरीही प्राण वाढतो. अन्नमय कोश तेव्हाच व्यक्त होतो किंवा वर्तन करतो जेव्हा आपला प्राणमय कोश सक्रिय असतो. आपले बोलणे म्हणजे श्वासच आहे. आपला स्थूल देह निरनिराळ्या क्रिया करते म्हणजे प्राणमय कोश त्या क्रिया ऊर्जा प्रदान करून करवून घेतो. 'जितनी चावी भरी रामने' ही कल्पना करा. यातील खिलौना म्हणजे अन्नमय कोश आणि चावीमुळे निर्माण झालेली ऊर्जा म्हणजे प्राणमय कोश.( गतिज आणि स्थितिज ऊर्जा) प्राणमय कोश म्हणजे सूक्ष्मदेह म्हणजे ऊर्जादेह.

ऊर्जेचे सहा प्रकार म्हणजे उष्णता, प्रकाश, विद्युत, चुंबकीय, ध्वनी आणि घर्षण होय. या सर्व ऊर्जा आपल्या शरीरात कार्यरत आहेत. हाच प्राणमय कोश होय. आपल्या शरीरात 'प्राण' आपल्या नेत्रात, हृदयात आणि मस्तिष्कात स्थित असतो. प्राचीन ऋषिमुनींनी यावर अनेक भाष्ये केलेली आहेत. तैत्तिरीय उपनिषदात महर्षी वरुण आणि भृगू संवादात प्राणच ब्रह्म म्हटले आहे.

**प्राणो ब्रह्मेति व्यजानात । प्राणाद् एव खल्विमानि**
**भूतानि जायन्ते । प्राणेन जातानि जीवन्ति।**
**प्राणं प्रयन्त्यभिसंविशंतीति ॥**

आपल्या शरीरात ७२ हजार नाड्या आहेत. ईडा, पिंगळा, सुषुम्ना याबाबत आपण अनेकदा ऐकतो. प्राणमय कोशाला पुष्ट करण्यासाठी भ्रामरी, अनुलोमविलोम, भस्त्रिका, कपालभाती, शितली, उज्जयी, उद्गीथ इत्यादी श्वासक्रिया सांगितल्या आहेत. आपले जिवंत असणे किंवा मृत होणे हे प्राणमय शरीराच्या हातात आहे. हा कोश आपले ऊर्जा आवरण आहे. आपली जीवनशक्ती प्रवाहित करणारा हा कोश आहे. अन्नमय कोशानंतर असणारा हा दुसरा कोश असून सर्वांगीण विकासाचा प्राण म्हणजे प्राणमय कोश होय. प्राणतत्त्वालाच पंचप्राण म्हटले आहे. प्राणमय कोश आपल्या जिवंतपणाचे प्रमुख केंद्र आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### सुरक्षित प्रवास करायचा कसा?

मानवी जीवन एक प्रवास आहे. सुख आणि दु:ख याचा अनुभव घेत आपला प्रवास सुरू असतो. हा प्रवास केव्हा, कुठे आणि कसा संपेल, काही सांगता येत नाही. याचा कटु आणि अत्यंत वाईट अनुभव नुकत्याच झालेल्या विमान प्रवास अपघाताने दिला. या विमानाने जे इंग्लंडकडे आनंदाने जाण्यास निघाले, त्यांची काही क्षणात राख झाली. जीवन किती क्षणभंगुर आहे याचा अत्यंत करुण अनुभव देऊन गेले. अलिकडे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. बस, रेल्वे, कार अपघात केव्हा, कसा होईल काही सांगता येत नाही. त्यामुळे आपण आपली काळजी, सुरक्षा राखणे गरजेचे आहे आणि ज्यांच्या विश्वासावर आपण प्रवास करतो त्यांनी सतत जागृत राहून प्रवास करणाऱ्यांची सुरक्षा कायम ठेवली पाहिजे. असेच जर अपघात होत राहिले तर लोकांनी प्रवास कसा करावा? त्याचा आनंद कसा घ्यावा? हा अतिशय मूलभूत प्रश्न आहे. अपघाताचे कारण कोणते याचा शोध लागेल परंतु या अपघाताने जी जीवितहानी झाली ती कशी भरून निघेल? ही हानी केवळ नुकसानभरपाई देऊन भरून निघेल काय? श्वास रोखून प्रवास कसा आणि किती करावयाचा? हे सारे प्रश्न लोकांच्या मनामध्ये निर्माण होऊ लागले आहे . या विमान अपघाताने केवळ अपघात संबंधित नातेवाईकांसमोरच नव्हे, तर सर्वांसमोर प्रश्नचिन्ह उभे केले आहे . आपला संपूर्ण जीवनप्रवास नेहमीच सुखद होणे केवळ आपल्याच हाती नाही तर, त्याचबरोबर सरकारवर देखील अवलंबून आहे. सरकार त्यासाठी प्रयत्न करीत आहे. शेवटी आपण आणि आपले नशीब, असे म्हणत जीवन जगणे हाच उपाय आपल्या हाती शिल्लक आहे.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

### अपघाताला दोषी कोण?

पुण्यापासून ३० कि. मी. आणि तळेगाव दाभाडेपासून २ कि.मी अंतरावर असलेल्या कुंडमळा येथे असलेल्या पुलावर क्षमतेपेक्षा जास्त पर्यटक उभे राहिल्याने तो कोसळला आणि काही पर्यटकांचा जीव गेला, काही जखमी झाले आणि काही नशीबवान बचावले. या दुर्दैवी घटनेमुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे ही घटना घडली असा थेट आरोप केला जात आहे. वस्तुतः या पुलाच्या दुरुस्तीची निविदा मंजूर झाली असून काही दिवसांत काम देखील सुरू होणार होते. पूल बांधकाम अंकेक्षण हे त्याच्या बांधकामाच्या उद्दिष्ट अंतर्गतच होईल. मुळात हा पूल शेतकऱ्यांना पायी जाण्यासाठी अरुंद तयार केला होता. त्यानुसार तो पूल भार सहन करीत होता. त्यावर जेवढा भार अपेक्षित आहे त्यानुसार त्या स्थितीत आहे.मात्र पावसाळ्यात पर्यटक निसर्ग सौंदर्याकडे आकर्षित होतात आणि आनंद लुटण्यासाठी गर्दी करतात. या पुलाच्या अपघातात असेच घडले. सर्व दुचाकी घेऊन एकाच जागेवर जमले आणि तब्बल २०० पर्यटक आणि त्यांच्या दुचाकींच्या वजनाने तो पूल कोसळला. यात दोषी कोणाला ठरविणार? जो मार्ग पादचारी नागरिकांसाठी आहे तेथे गर्दी झाली तर अपघात होणारच. अशा अनेक घटना या आधी देखील घडल्या आहेत. पण उत्साहात याकडे दुर्लक्ष होते आणि त्याची किंमत जन्मभर चुकवावी लागते, यापेक्षा दुर्दैव ते काय?

**संजय पाठक**/नागपूर

### स्त्रीसन्मान; संस्कृतीची खरी ओळख!

प्राचीन काळात स्त्रीला केवळ एक सामाजिक घटक नव्हे, तर 'हिंदू संस्कृतीचा कणा' या दृष्टीने सन्मानाने पाहिले जात होते. आजच्या आधुनिक समाजात स्त्रियांना कायदेशीर अधिकार, समानता, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळत आहेत. मात्र, प्राचीन भारतात स्त्रियांना मिळणारा मान आणि सन्मान आजच्या २१व्या शतकात हरवलेला दिसतो. याचे ताजे उदाहरण म्हणजे हुंडाबळी ठरलेली वैष्णवी हगवणे! केवळ हुंडाबळीच नव्हे, तर स्त्रियांवरील मानसिक व शारीरिक शोषण, बलात्काराच्या वाढत्या घटना या सर्वांवरून समाजाची स्त्रीकडे बघण्याची विकृत मानसिकता स्पष्ट होते. म्हणूनच, केवळ कायद्याच्या आधारे नव्हे, तर समाजाची मानसिकता बदलल्यावरच खऱ्या अर्थाने स्त्रीसन्मानाची परंपरा जोपासली जाऊ शकते. यासाठी प्रत्येक घरात साधनेचा संस्कार होणे आवश्यक आहे. ज्यामुळे प्राचीन हिंदू संस्कृतीतील स्त्री सन्मानाची मूल्ये जोपासण्यास मदत मिळेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

### शिक्षकांच्या पगारात तफावत नको

सोलापूर शहरात महानगरपालिका व खाजगी प्राथमिक शाळा बऱ्याच प्रमाणात आहे.येथे काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दर महिन्याला वेतन मिळते. यात खासगी शाळेतील शिक्षकांना शासनातर्फे अनुदान असल्यामुळे त्यांचा पगार एक ते पाच तारखेच्या दरम्यान दर महिन्याला होतेच, पण महानगरपालिकेत काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पगार दर महिन्याला कधी होईल हे सांगताच येत नाही. याचे परिणाम मनपात कार्यरत असलेल्या शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षक ,कर्मचारी यांच्या परिवारावर होत आहे. वेळेवर पगार न होत असल्यामुळे आजारावरील खर्च, किराणा खर्च, मुलांचे शैक्षणिक खर्च व इतर दैनंदिन खर्च हे करणे म्हणजे आजच्या युगात तारेवरची कसरत आहे. तरी कृपया शासनाने मनपात कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन निश्चित अशा एका तारखेला जाहीर करून त्याच तारखेच्या आत पगार अदा करावे. ही नम्र विनंती.

**फैय्याज शेख, सोलापूर.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# सम्राट चौक ते जुना कारंबा नाका रस्त्याच्या कामाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

शहरातील खड्डेमय असलेल्या सम्राट चौक ते जुना कारंबा नाका रस्त्याच्या कामास महापालिकेच्या वतीने आज अखेर सुरुवात करण्यात आली. आ. विजयकुमार देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे नागरिक व व्यापाऱ्यांनी आभार मानले.

या सोलापूर शहरातून बाहेर पडणारी संपूर्ण एसटीची वाहतूक या रस्त्यावरून होते. सोलापूर शहरामध्ये येणारा दुसरा मार्ग म्हणजे या रस्त्याचा वापर ग्रामीण भागातले व या भागांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये शाळा असल्यामुळे या रस्त्याचा वापर मोठ्या प्रमाणामध्ये होतो. या भागामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात व्यापारी वसाहत आहेत. झोपडपट्टी आहे. खड्डेमय रस्ता असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. हा रस्ता करण्याची नागरिकांची मागणी होती. आ. विजयकुमार देशमुख , राष्ट्रवादीचे आनंद चंदनशिवे यांनी या रस्त्यासाठी पाठपुरावा करून काही दिवसापूर्वी सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे व इतर अधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली होती. केंद्र शासन पुरस्कृत यांच्या अंतर्गत या रस्त्याचे काम करण्यात येत आहे. सुमारे ७७ लाख रुपये निधीतून हा रस्ता केला जाणार आहे. गायत्री कंस्ट्रक्शन या मक्तेदारास हे काम दिले असून ९० दिवस मुदतीत हे काम पूर्ण करावयाचे आहे. दरम्यान, या रस्ते कामाची सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे या भागातील मॉर्निंग योगा ग्रुप व नागरिकांनी समाधान व्यक्त केले.



# जागतिक रक्तदाता दिनी
## डॉ. शंकर नवलेंचे ५८वे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

नुकतेच १४ जून रोजी जागतिक रक्तदाता दिन जगभर साजरा केला. यानिमित्त केगाव येथील एन.बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी आपले ५८ वे रक्तदान करुन रक्तदाता दिन साजरा केला.

सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात वर्षभरात कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली दोनदा रक्तदान शिबीर घेतले जाते. यावेळेस प्राचार्य डॉ. शंकर नवले हे स्वतः ही रक्तदान करुन इतरांनाही रक्तदान करण्याचे आवाहन करतात. घरातूनही रक्तदान करण्याची चळवळ आपसूक चालू झाली आहे. प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या सृष्टी आणि श्रावणी या दोन्ही मुलीही वडिलांच्या प्रेरणेतून रक्तदान करतात. प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी रेल्वे लाईन्स येथील डॉ. हेडगेवार रक्तपेढी येथे रक्तदान केले. यावेळेस रक्तपेढीचे शाखा व्यवस्थापक रंगनाथ जोशी, तंत्रज्ञ विक्रम परांडे, सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी रामकृष्ण लांबतुरे, चालक राजेंद्र कारले यांची उपस्थिती होती.




## शाळांमधील प्रवेशोत्सव...



### इस्माईल उर्दू स्कूल

शहरातील इस्माईल उर्दू स्कूलमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका मेहजबीन शेख यांनी नवीन पुस्तके व गुलाब पुष्प देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी मुलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि आत्मविश्वास दिसून येत होता. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी मुख्य गेटला फुग्यांची कमान, रांगोळी काढून वर्ग खोल्या सजविण्यात आल्या होत्या, टाळ्यांच्या कडगडाटामध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.



### महानगरपालिका मुलींची उर्दू शाळा

शहरातील इस्माईल उर्दू स्कूलमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका मेहजबीन शेख यांनी नवीन पुस्तके व गुलाब पुष्प देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी मुलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि आत्मविश्वास दिसून येत होता. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी मुख्य गेटला फुग्यांची कमान, रांगोळी काढून वर्ग खोल्या सजविण्यात आल्या होत्या, टाळ्यांच्या कडगडाटामध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.



### एन. के. किड्स स्कूल

बाळेमधील राजेश्वरी नगर येथील एन. के. किड्स स्कूलमध्ये शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, फुगे व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. प्रवेशद्वाराजवळ स्वागताचे फलक, मुलांचे आवडते कार्टुन्स उभारण्यात आले होते. शाळा प्रवेशोत्सवाप्रसंगी संस्थेच्या मुख्याध्यापिका कस्तुरे, हेड शिक्षिका दिपाली कुलकर्णी, अश्विनी शिंगण, पुनम कळसाईत यांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत केले. यावेळी संस्थेचे संचालक विकास कस्तुरे, राजा आलूरे, अंजली गुरव, सेविका संगीता हेगडकर, दुर्गा बारडोळे आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा मालवण येथील नव्या पुतळ्याचा पाया खचला

- दोषींवर कायदेशीर कारवाईसाठी काँग्रेसने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून-**

मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याची जमीन खचली, चबुतऱ्याला भगदाड पडले. याची चौकशी करून दोषी असलेल्यांवर कारवाई करावी, या मागणीसाठी सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना निवेदन दिले.

निवेदनानंतर बोलताना श्री. नरोटे म्हणाले की, ऑगस्ट २०२४ मध्ये निकृष्ट दर्जाच्या साहित्यामुळे मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला होता. त्यानंतर वर्षभराच्या आत त्याच ठिकाणी मे महिन्यात नवीन पुतळा उभा करण्यात आला. अनावरणाला शंभर दिवस ही झाले नसताना या पुतळ्याच्या चबुतऱ्याची भराव आता खचला आहे. पुतळ्याच्या डाव्या बाजूला त्या ठिकाणी मोठं भगदाड पडल्याचं दिसून येत आहे. यामुळे चबुतऱ्याच्या आजूबाजूचे बांधकाम निकृष्ट दर्जाचं झाल्याचं स्पष्ट होत आहे. त्यामुळे दोषींवर कठोर कारवाई करावी.



यावेळी महिला अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, माजी नगरसेवक विनोद भोसले, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, प्रदेश सरचिटणीस नरसिंह आसादे, शकील मौलवी, ब्लॉक अध्यक्ष देवा गायकवाड, बाबुराव म्हेत्रे, कार्याध्यक्ष हणमंतू सायबोलू, प्रवक्ते नागनाथ कदम, भीमाशंकर टेकाळे, तिरुपती परकीपंडला, युवराज जाधव, अँड केशव इंगळे आदी उपस्थित होते.

**सोलापूर :** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया या नवीन अभियानांतर्गत २५० मे.टन क्षमतेचे गोदाम बांधकाम करण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा रुपये १२.५० लाख यापैकी जे कमी असेल त्याप्रमणे अनुदानाच्या अधिक माहितीसाठी कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

## बार्शी नगरपरिषद, बार्शी
(जि. सोलापूर)
### जाहिर लिलाव

**लिलाव :- बुधवार दिनांक : २५/०६/२०२५ रोजी वेळ : सकाळी ११ वाजता**
**लिलावाचे स्थळ :- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ऑक्सिजन पार्क (कासारवाडी रोड) बार्शी**

जाहीर लिलावाचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | नाव | लिलाव करावयाचे स्टॉल/दुकाने क्रमांक |
|---|---|---|
| १ | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ऑक्सिजन पार्क लगत असलेले पत्र्याचे स्टॉल/दुकाने (कासारवाडी रोड, बार्शी) | पत्र्याचे स्टॉल/दुकाने क्रमांक - ०१ ते १२ (साईज ८ x ८) |

- **टिप :-**
- सदरील पत्र्याचे स्टॉल/दुकाने हे ११ महिन्यांकरीता जाहिर लिलाव द्वारे भाडेतत्वावर देण्यात येणार आहेत.
- लिलावात भाग घ्यावयाच्या अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत मिळकत विभागामध्ये पाहवयास मिळतील.
- लिलावामध्ये भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रु. २५,०००/- रोख जागेवर भरावयाचे आहेत. त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
- जाहीर लिलाव ऍक्युपन्सी प्राईसचा (डिपॉझिटचा) आहे. निश्चित डिपॉझिटच्या रक्कमेपैकी २५% रक्कम जागेवर व उर्वरीत रक्कम ०७ दिवसात भरावयाची आहे. त्याशिवाय लिलाव कायम झाला असे समजण्यात येणार नाही.
- लिलाव मंजूर अथवा नामंजूर करणेचे सर्व अधिकार मुख्याधिकारी यांना राहतील.

**नगरपरिषद कार्यालय,**
**बार्शी, दि. १७/०६/२०२५**
शिक्का
**सही/-**
**(मुख्याधिकारी)**
**बार्शी नगरपरिषद, बार्शी**

## जाहीर नोटीस

ताडसोंदणे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., ताडसोंदणे ता. बार्शी, जि. सोलापूर या सहकारी संस्थेच्या सभासदांना / संचालकांना सूचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळामध्ये रिक्त झालेली जागा भरण्यासाठी अध्यासी अधिकारी, श्रीमती एम.एम. गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५/०६/२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता संस्थेच्या कार्यालयामध्ये संचालक मंडळाची सभा आयोजन करण्यात आलेले आहे. जो कोणी संचालक होण्यास इच्छुक आहे अशा संस्थेच्या सभासदांने / सर्व संचालकांना संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.
दि.१७/०६/२०२५

**सही/-**
**एम.एम. गुप्ता**
**अध्यासी अधिकारी**

**सही/-**
**सचिव**
**ताडसोंदणे वि.का. सेवा सह., संस्था मर्या.,**
**ताडसोंदणे, ता. बार्शी, जि. सोलापूर**

## करमाळा नगरपरिषद, करमाळा
### शुध्दीपत्रक

**करमाळा नगरपपरिषद जा.क्र.मिळकत/७०३/२०२५ दि. १७/०६/२०२५**

करमाळा नगरपरिषदेच्या मिळकत विभागाकडील दैनिक रस्ता फी, आठवडा बाजार फी व दैनंदिन भाजी मंडई वसुली करणेसाठी युापूर्वी दै. तरुण भारत दि. १२/०६/२०२५ रोजीच्या प्रसिध्दीकरणात देण्यात आली होती. त्यामध्ये सुधारणा करण्यात आलेल्या असुन ते खालीलप्रमाणे :-

**सदर लिलाव प्रक्रिया ही दि. २३/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नगरपरिषदेच्या श्री ज्ञानेश्वर वाचनालयामध्ये होईल.**

**सही/-**
**(सचिन तपसे)**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**

## करमाळा नगरपरिषद, करमाळा
### शुध्दीपत्रक

**करमाळा नगरपपरिषद जा.क्र.मिळकत/६९३/२०२५ दि. १७/०६/२०२५**

करमाळा नगरपरिषदेच्या मिळकत विभागाकडील दैनिक रस्ता फी, आठवडा बाजार फी व दैनंदिन भाजी मंडई वसुली करणेसाठी यापुर्वी दै. तरुण भारत दि. १२/०६/२०२५ रोजीच्या प्रसिध्दीकरणात देण्यात आली होती. त्यामध्ये सुधारणा करण्यात आलेली असून ते खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | तपशील | सरकारी किंमत (वार्षिक) | सुधारित सरकारी किंमत (वार्षिक) |
|---|---|---|---|
| १ | दैनिक रस्ता फी वसुली | ५,४४,५००/- | ४,९५,०००/- |
| २ | दैनिक भाजी मंडई वसुली | ३,९३,२५०/- | ३,५७,५००/- |
| ३ | आठवडा बाजार वसुली | ९,७४,०५०/- | ८,८५,५००/- |

**सही/-**
**(सचिन तपसे)**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**

## मध्य रेल्वे
### बांधकामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सेवा प्रदान करणे

**ई-निविदा सूचना क्रमांक LC/CSMT/CRP/PMS/2025/01/R, दिनांक 12/06/2025** उपमुख्य विद्युत अभियंता/Const./मुख्यालय मध्य रेल्वे, तिसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई-400 001 भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी प्रतिष्ठित कंत्राटदारांकडून वेबसाइटद्वारे ऑनलाइन खुल्या निविदा मागवत आहे. **कामाचे नाव:** प्रस्तावाची विनंती (RFP) मध्य रेल्वेच्या भुसावळ, नागपूर, पुणे, सोलापूर विभाग येथे नवीन 2 x 25 केव्ही टीएसएस/एसएसपी/एसपी बांधकामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सेवा प्रदान करण्यासाठी प्राधिकरण अभियंताची नियुक्ती. **अंदाजे निविदा किंमत:** रु. 23,38,00,969.08 (रुपये तेवीस कोटी, अठ्ठावीस लाख, नऊशे एकोणसत्तर आणि आठ पैसे फक्त) बक्षिसे ठेव (EMD): रु. 13,19,000/- (रुपये तेरा लाख, एकोणीस हजार फक्त) **बोलीचा प्रकार:** सामान्य **निविदा बोली प्रणाली:** दोन पॅकेट प्रणाली **बोली शैली:** प्रत्येक वेळापत्रकासाठी एकच दर **निविदा पुस्तिकेची किंमत:** पूर्णता शून्य: पावसाळ्यासह 36 (छत्तीस) महिने. **ऑफरची वैधता:** निविदा उघडल्याच्या तारखेपासून 120 (एकशे वीस) दिवस. **वेबसाइट पत्ता:** http://www.ireps.gov.in **निविदा कागदपत्रांची उपलब्धता:** निविदा सूचना आणि निविदा कागदपत्रे वरील वेबसाइटवर पाहता येतील. **बोलीपूर्व परिषदेची तारीख आणि वेळ:** 27/06/2025 रोजी 12.00 वाजता. **निविदा सादर करण्याची आणि उघडण्याची तारीख आणि वेळ.** आवश्यक कागदपत्रांसह सर्व बाबतीत योग्यरित्या पूर्ण केलेले ई-निविदा, 24/07/2025 पर्यंत. ही निविदा (तांत्रिक बोली) त्याच दिवशी दुपारी 3.00 वाजता उघडली जाईल. जर त्या तारखेला सुट्टी जाहीर झाली तर. वर नमूद केल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी त्याच वेळी निविदा उघडल्या जातील. **वर नमूद केलेल्या कामांसाठी निविदाधारकांसाठी महत्त्वाच्या सूचना: अ)** निविदा केवळ ई-निविदाद्वारेच भरली जाईल. सर्व इच्छुक निविदाधारकांनी प्रथम IREPS वेबसाइटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. **ब)** संभाव्य निविदाधारकांना सूचित केले जाते की त्यांनी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांची ऑफर सादर करण्यापूर्वी, त्यांनी अटी आणि शर्ती, पात्रता निकष इत्यादींबद्दल निविदा तपशीलांचा संदर्भ घ्यावा. **क)** वेळोवेळी जारी केलेले निविदा कागदपत्रे आणि शुद्धीपत्रक निविदा उघडण्याच्या किमान 15 दिवस आधी या वेबसाइटवर उपलब्ध आहेत आणि वेबसाइटवर पाहता येतील. **ड)** आर्थिक दर पृष्ठात प्रविष्ट केलेले आणि योग्यरित्या डिजिटल पद्धतीने स्वाक्षरी केलेले दरच विचारात घेतले जातील.) जोडलेल्या कागदपत्रांवर निविदाकर्त्यांनी त्यांच्या मुख्य भागावर स्वाक्षरी करावी.
तारीख : 12/06/2025 179
**तुमच्या प्राण्यांना रेल्वे ट्रॅकपासून दूर ठेवा.**

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली तारीख : २१/०७/२०२५
दि.कि.अ.नं. ५८/२०२५

### बार्शी येथील मे. अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश सो. यांचे कोर्टात

**साईराज सोमनाथ गायकवाड,**
वय - १६ वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. जावे, ता. मुळशी, जि. पुणे - अज्ञान
अर्जदार याचे अ.पा.क. आई सौ. रेश्मा सोमनाथ गायकवाड, वय ३८ वर्षे, धंदा - शेती, घरकाम, रा. सदर — **अर्जदार**
विरुध्द
**महाराष्ट्र सरकार** **- सामनेवाला**

ज्याअर्थी डि. सोलापूर सब डि. व ता. करमाळापैकी मौजे निंभोरे येथील शेतजमीन ग.नं. ३८७/१/क पैकी क्षेत्र १ हे. २१ आर आकार २ रु. ८५ पैसे यासी चतु:सिमा पुर्वेस - ग.नं.३८५/१ पैकी, दक्षिणेस - ग.नं.३८५/५ पैकी, पश्चिमेस - ग.नं.३८७/२ पैकी जमीन व उत्तरेस - सदर गटापैकी अविनाश वळेकर यांचे क्षेत्र येणेप्रमाणे शेतजमीन आतील तदंगभूत वस्तुसह अज्ञान अर्जदाराचे मालकीची व ७/१२ हक्कपत्रकी नोंदलेली आहे. सदर मिळकत अज्ञानाचे भविष्य, शिक्षण कायदेशीर अडचणीचे निवाणाकरीता अज्ञान अर्जदाराची आई सौ. रेश्मा सोमनाथ गायकवाड यांनी विक्री करणेचा व्यवहार ठरवलेला आहे तथापी, अर्जदार हे अज्ञान असलेने सदर व्यवहारास मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे, सदर मिळकत विक्री करण्याची कृती योग्य व अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अज्ञान अर्जदाराचे वतीने तिचे पालनकर्ते आईनी या मे. कोर्टात अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवानगी मागणेचा अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनां संबंधाने कोणाचे कांही हरकती, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे कांही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारीख २१/७/२०२५ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर करावयात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे कोर्टाच शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीख : १७/०६/२०२५

**सही/-**
**क. लिपीक**
**जिल्हा न्यायालय, बार्शी**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**अपर जिल्हा न्यायालय, बार्शी**

## IIFL HOME LOAN

आयआयएफएल होम फायनान्स लि.
आयआयएफएल हाऊस, सन इन्फोटेक पार्क,
रस्ता क्र. 16व्ही, प्लॉट क्र. बी-23, एमआयडीसी
ठाणे औद्योगिक क्षेत्र, वागळे इस्टेट,
ठाणे - 400604
CIN No.: U65993MH2006PLC166475

या सूचनेमार्फत, सर्वसाधारण जनतेला आणि आयआयएफएल होम फायनान्स लि.च्या ग्राहकांना याद्वारे कळविण्यात येते की 4075/14, संजीवनी कॉम्प्लेक्स, भोसले चौक, पंढरपुर - 413304, महाराष्ट्र येथील आयआयएफएल होम लोन शाखा **20 सप्टेंबर 2025** रोजीपासून मिलानी ब्लॉक क्र. 4, 1ला मजला, विश्राम नगर, ईएसआयसी हॉस्पिटल समोर, होतगी रोड, सोलापुर - 413003 या नवीन पत्त्यावर स्थलांतरित होत आहे.

सर्व ग्राहकांना आणि सर्वसाधारण जनतेला विनंती आहे की त्यांनी वरील माहितीची नोंद घ्यावी आणि तुमच्या जवळील इतर आयआयएफएल होम लोन शाखा शोधण्यासाठी iiflhomeloans.com/locate-us ला भेट द्यावी.

## MAHATRANSCO — SRM E-Tender Notice

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000036758 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 07/2025-2026, Particulars:** Work of initial weed control & regular recurring treatment at various EHV 220/132kV substations/ cogen consumers under EHV O&M Division Solapur. **Estimated cost:** Rs. 49,95,577/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 49,955/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 17.06.2025 to 02.07.2025 **Last Date of Submission:** 02.07.2025 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 03.07.2025 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer - 7447440608 For further details please visit to https://srmetender.mahatransco.in.

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur**

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
### महिला व बालकल्याण समिती विभाग

**फेर जाहिर प्रसिध्दीकरणाचा मसुदा**
**(अल्प कालावधीसाठी)**

सोलापूर महानगरपालिकेकडील महिला व बालकल्याण समिती विभागाच्यावतीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी म.न.पा. शाळेतील इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय दप्तर, पाणी बॉटल व टिफिन बॉक्ससह (मोफत) वाटप करणेसाठी स्थानिक पुरवठाधारकाकडून देणे या कामाचे ई-निविदा (दरपत्रक) मागविणेबाबत.

या कामाचे टेंडर सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावरून दिनांक १८/०६/२०२५ ते २०/०६/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**प्र. महिला व बालकल्याण अधिकारी**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आझादी का अमृत महोत्सव
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट - भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail : staff_sol@mahabank.co.in

### नियम - 8 (1)
### ताबा सूचना

जेथे, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, 2002 च्या कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीकार यांनी **31/08/2023 रोजी डिमांड नोटिस** जारी केल्या आहेत ज्यामध्ये खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन केले आहे.
कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरल्याने, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, **10/06/2025** रोजी सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** अधोरेखित व्यक्तीने घेतला आहे.
विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रकडून शुल्क आकारले जाईल.
कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (8) च्या तरतुदींकडे आकर्षित करण्यात येत आहे, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

| अ. क्र. | शाखेचे नाव, कर्जदार आणि जामीनदार | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सुचनेची तारीख आणि एकूण देणी |
|---|---|---|---|
| 1<br>2 | **कर्जदार:-**<br>**तुळजाभवानी एजन्सी**<br>**प्रोप्रा. जितेंद्र सुधाकर चालुक्य**<br>पत्ता : आरोग्य नगर उमरगा ता. उमरगा जि. उस्मानाबाद<br>**हमीदार :-**<br>**श्री. प्रदीप सुधाकर चालुक्य**<br>पत्ता : आरोग्य नगर उमरगा ता. उमरगा जि. उस्मानाबाद | **श्री. प्रदीप सुधाकर चालुक्य** यांच्या नावावर नोंदणीकृत मालमत्तेचे गहाणखत, प्लॉट क्रमांक 47 आणि 48 जुना सर्वे क्रमांक 194/1, नवीन सर्वे क्रमांक 206, उमरगा येथील एकूण क्षेत्रफळ 1600 चौरस फूट आहे.<br>**सीमा खालीलप्रमाणे : प्लॉट क्रमांक 47 :-**<br>उत्तर- प्लॉट क्रमांक 38<br>दक्षिण- प्लॉट क्रमांक 66<br>पूर्व - 20 फूट रस्ता<br>पश्चिम - प्लॉट क्रमांक 48<br>**सीमा खालीलप्रमाणे : प्लॉट क्रमांक 47 :-**<br>उत्तर- प्लॉट क्रमांक 37<br>दक्षिण- प्लॉट क्रमांक 65<br>पूर्व - प्लॉट क्रमांक 47<br>पश्चिम - 20 फूट रस्ता | **मागणी सूचना :**<br>**दिनांक ३१/०८/२०२३**<br>**रु. ५२,०४,६८९.००/-अधिक**<br>**३१/०८/२०२३** पासून कर्जाची वसुली होईपर्यंत लागू न केलेले व्याज<br>**प्रत्यक्ष ताबा तारीख :**<br>**१०/०६/२०२५** |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक** - 10/06/2025

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**अधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आझादी का अमृत महोत्सव
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट - भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail : staff_sol@mahabank.co.in

### नियम - 8 (1)
### ताबा सूचना

जेथे, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, 2002 च्या कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीकार यांनी **21/06/2024 रोजी डिमांड नोटिस** जारी केल्या आहेत ज्यामध्ये खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन केले आहे.
कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरल्याने, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, **12/06/2025** रोजी सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** अधोरेखित व्यक्तीने घेतला आहे.
विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रकडून शुल्क आकारले जाईल.
कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (8) च्या तरतुदींकडे आकर्षित करण्यात येत आहे, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

| अ. क्र. | शाखेचे नाव, कर्जदार आणि जामीनदार | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सुचनेची तारीख आणि एकूण देणी |
|---|---|---|---|
| 1<br>2 | **कर्जदार:-**<br>**श्री. कल्लेश्वर बाबुराव कोत्तरगे**<br>**२०, कोथळी, उमरगा, उस्मानाबाद**<br>**जि. महाराष्ट्र - ४१३६०५**<br>**हमीदार :-**<br>**श्री.अनिल हणमंतराव बिराजदार**<br>**बेळंब, उमरगा, उस्मानाबाद**<br>**जि. महाराष्ट्र - ४१३६०५** | **श्री. कल्लेश्वर बाबुराव कोत्तरगे** यांच्या नावावर मालमत्तेचे नोंदणीकृत गहाणखत घर क्रमांक ६२९ कोथळी, ६० फूट X ८० फूट क्षेत्रफळ, कोथळी, मुरुम उमरगा, उस्मानाबाद, महाराष्ट्र -४१३६०५<br>**सीमा खालीलप्रमाणे:-**<br>उत्तर- जी.पी. रोड<br>दक्षिण- जी.पी. रोड<br>पूर्व - जी.पी. रोड<br>पश्चिम - जी.पी. रोड | **मागणी सूचना :**<br>**दि. २१/०६/२०२३**<br>**रु. २९,३७,२५९.००/-अधिक**<br>**२१/०६/२०२३** पासून कर्जाची वसुली होईपर्यंत लागू न केलेले व्याज<br>**प्रत्यक्ष ताबा तारीख :**<br>**१२/०६/२०२५** |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक** - 12/06/2025

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**अधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# आता चार दिवसांची होणार कसोटी?

## भारत, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड खेळणार पाच दिवसांचे सामने

◆ **लंडन, १७ जून**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) २०२७-२९ जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेमध्ये लहान देशांसाठी चार दिवसांच्या कसोटी सामन्यांना मान्यता देण्यास सज्ज आहे. परंतु भारत, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड अजूनही पारंपरिक पाच दिवसांचे सामने खेळू शकतात. येथील एका अहवालात हा दावा करण्यात आला आहे.



सामन्यांची संख्या एका दिवसाने कमी करण्याचा निर्णय हा एक महत्त्वाचा बदल असेल आणि लहान देशांना अधिक कसोटी आणि दीर्घ कालावधीच्या मालिका खेळण्यास मदत करेल. गेल्या आठवड्यात लॉर्ड्स येथे झालेल्या डब्ल्यूटीसी फायनल दरम्यान झालेल्या चर्चेत, आयसीसी अध्यक्ष जय शाह यांनी २०२७-२९ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप सायकलसाठी चार दिवसांच्या कसोटी सामन्यांना पाठिंबा दर्शविला होता.

इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि भारत यांना ॲशेस, बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी आणि अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीसाठी पाच दिवसांच्या कसोटी मालिकेत खेळण्याची परवानगी असेल. अँडरसन तेंडुलकर ट्रॉफीची सुरुवात शुक्रवारी हेडिंग्ले येथे इंग्लंड आणि भारत यांच्यातील पहिल्या कसोटीने होईल, असे त्यात म्हटले आहे.

आयसीसीने २०१७ मध्ये पहिल्यांदा द्विपक्षीय सामन्यांसाठी चार दिवसांच्या कसोटी सामन्यांना मान्यता दिली. २०१९ आणि २०२३ मध्ये आयर्लंडविरुद्ध चार दिवसांच्या कसोटी सामन्यात खेळल्यानंतर इंग्लंडने गेल्या महिन्यात ट्रेंट ब्रिज येथे झिम्बाब्वेविरुद्ध चार दिवसांची कसोटी खेळली. अहवालानुसार, वेळ आणि खर्चामुळे अनेक लहान देशांना कसोटी सामन्यांचे आयोजन करण्यास रस नाही, परंतु चार दिवसांच्या कसोटी सामन्यांची सुरुवात झाल्यामुळे, तीन कसोटी सामन्यांची संपूर्ण मालिका तीन आठवड्यांपेक्षा कमी वेळात खेळता येईल. त्यात म्हटले आहे, वेळ वाया जाऊ नये म्हणून, चार दिवसांच्या कसोटी सामन्यांमध्ये खेळण्याचा वेळ ९० षटकांवरून कमीत कमी ९८ षटकांपर्यंत वाढवण्यात आला आहे.

अहवालात म्हटले आहे की, गेल्या आठवड्यात लॉर्ड्सवर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या रोमांचक अंतिम सामन्यात विवविजेता बनल्यानंतरही, दक्षिण आफ्रिकेच्या एकाकी वेळापत्रकामुळे हा मुद्दा आणखी अधोरेखित झाला आणि त्यानंतर बदलाची गरज भासू लागली. तथापि, २०२५-२७ जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा सध्याच्या पाच दिवसांच्या सामन्यांच्या स्वरूपात खेळवली जाईल. ◂(वृत्तसंस्था)

# स्मृती मंधाना एकदिवसीय सामन्यात अव्वल

## आयसीसीने जाहीर केली क्रमवारी

◆ **दुबई, १७ जून**



डाव्या हाताची सलामीवीर स्मृती मंधाना आयसीसी महिला एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर पोहोचली आहे. आयसीसी महिला एकदिवसीय खेळाडूंच्या क्रमवारीच्या ताज्या बदलानंतर भारताची स्टार खेळाडू स्मृती मंधानाने एकदिवसीय क्रिकेटमध्ये नंबर-१ फलंदाज म्हणून आपला मुकुट पुन्हा मिळवला आहे. मंगळवारी ही रँकिंग जाहीर झाली. त्यामध्ये मंधानाचे वर्चस्व दिसून आले.

मंगळवारी जाहीर केलेल्या आयसीसी क्रमवारीत भारतीय महिला क्रिकेट फलंदाज स्मृती मंधना हिला मोठा फायदा झाला आहे आणि तिने पुन्हा एकदा नंबर-१ एकदिवसीय फलंदाजाचा मुकुट आपल्या डोक्यावर चढवला आहे. यासाठी दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्वार्डने १९ रेटिंग गुण गमावल्यानंतर स्मृती अव्वल स्थानावर पोहोचली आहे. मंधाना ७२७ रेटिंग गुणांसह पहिल्या स्थानावर पोहोचली आहे.

स्मृती मंधाना सध्या उत्तम फॉर्ममध्ये आहे आणि तिने कोलंबो येथे श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिरंगी मालिकेत शानदार फलंदाजी केली आणि अंतिम सामन्यात शतक झळकावले.

**६ वर्षांनंतर पुन्हा अव्वल स्थानी**

स्मृती मंधाना अलिकडच्या काळात एकदिवसीय फलंदाजांच्या यादीत पहिल्या १० मध्ये आहे, परंतु २०१९ च्या सुरुवातीपासून ही डावखुरी फलंदाज अव्वल स्थानावर पोहोचू शकली नाही, परंतु आता ६ वर्षांनंतर तिने नंबर-१ वर आपला दावा सादर केला. तिने आतापर्यंत भारतासाठी १०२ एकदिवसीय सामने खेळले आहेत. या दरम्यान, तिने ४६.५९ च्या सरासरीने आणि ८७.७९ च्या स्ट्राईक रेटने ४४७३ धावा केल्या आहेत. ११ शतके आणि ३१ अर्धशतके झळकावली. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### भारताचे ज्युनियर कंपाऊंड तिरंदाज अंतिम फेरीत

**सिंगापूर** : भारताच्या ज्युनियर कंपाऊंड तिरंदाजांनी आशिया चषक स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात आपले वर्चस्व कायम राखत मंगळवारी येथे पुरुष आणि महिला गटाच्या वैयक्तिक स्पर्धांच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. अव्वल मानांकित कुशल दलालने उपांत्य फेरीत बांगलादेशच्या हिमू बछरवर १४७-१४३ असा विजय मिळवत पुरुष वैयक्तिक कंपाऊंड अंतिममध्ये स्थान निश्चित केले आणि किमान रौप्य पदक निश्चित केले. दलालने पात्रता फेरीत ७१४ गुणांसह अव्वल स्थान मिळवले होते. भारताचा १० वा मानांकित सचिन चेची उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाच्या जोशुआ माचोनकडून पराभूत झाला आणि कांस्यपदकासाठी बछरशी सामना करेल. महिला वैयक्तिक कंपाऊंड स्पर्धेत भारताचे सुवर्ण आणि रौप्य पदक निश्चित झाले आहे. कारण अव्वल मानांकित षण्मुखी नागा साई बुड्डे आणि द्वितीय मानांकित तेजल साळवे अंतिम फेरीत भारताशी भिडतील. षण्मुखीने पात्रता फेरीत ७०६ गुण मिळवले. तिने उपांत्य फेरीत इंडोनेशियाच्या युरिके नीना बोनिता परेराचा १४५-१३९ असा पराभव केला. पात्रता फेरीत ७०० गुण मिळवणाऱ्या तेजलने मलेशियाच्या फातिन नुरफतेह मॅट सालेहचा १४७-१४२ असा पराभव करून विजेतेपदाच्या सामन्यात स्थान मिळवले. स्पर्धेच्या सुरुवातीला भारतीय तिरंदाजांनी दोन विश्वविक्रम प्रस्थापित करून प्रसिद्धी मिळवली.

### विश्वचषकानंतर सोफी डेव्हाईनची निवृत्ती



**ऑकलंड** : न्यूझीलंड महिला संघाची कर्णधार आणि अष्टपैलू खेळाडू सोफी डेव्हाईन या वर्षाच्या अखेरीस भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेनंतर एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्त होणार आहे. ३५ वर्षीय खेळाडू महिला क्रिकेटमधील सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडूंपैकी एक मानली जाते. डेव्हाईनने एकदिवसीय आणि टी-२० मध्ये अनुक्रमे १०७ आणि ११९ गडी बाद केले आहेत. तिने एकही कसोटी सामना खेळलेला नाही. मंगळवारी न्यूझीलंड क्रिकेटने जारी केलेल्या निवेदनात डेव्हाईन म्हणाली, मला वाटते की हा निर्णय घेण्याची योग्य वेळ आहे. न्यूझीलंड क्रिकेटने मला या निर्णयापर्यंत पोहोचण्यास मदत केली याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजते. याचा अर्थ असा की मी अजूनही न्यूझीलंडसाठी खेळू शकते. डेव्हाईनचे हे मत न्यूझीलंड क्रिकेटने १७ केंद्रीय करारबद्ध खेळाडूंची घोषणा करण्यापूर्वी आले आहे. करारबद्ध खेळाडूंची घोषणा बुधवारी केली जाईल. डेव्हाईन टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खेळण्यासाठी उपलब्ध असेल, परंतु तिला केंद्रीय करार देण्यात येणार नाही. महिला एकदिवसीय विश्वचषक ३० सप्टेंबर ते २ नोव्हेंबर दरम्यान भारत आणि श्रीलंकेत खेळला जाणार आहे.

**सोफीची कामगिरी**

तिने १५२ एकदिवसीय सामन्यांमध्ये ३१.६६ च्या सरासरीने आणि आठ शतकांच्या मदतीने ३९९० धावा केल्या आहेत. तिने १४६ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एका शतकासह ३४३१ धावा केल्या आहेत.

### अननुभवी असूनही आम्ही जिंकलो : रबाडा

**लंडन** : वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) जिंकणे अधिक संस्मरणीय ठरले कारण आमचा संघ अगदी अननुभवी होता आणि तरीही आम्ही अनुभवी खेळाडूंचा भरणा असलेल्या ऑस्ट्रेलियन संघाविरुद्ध शानदार विजय मिळवला, असे दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाने सांगितले. कर्णधार टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखाली, दक्षिण आफ्रिकेने अलिकडेच लॉर्ड्स येथे झालेल्या डब्ल्यूटीसी अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाचा पराभव करून आयसीसी ट्रॉफीसाठी २७ वर्षांचा दुष्काळ संपवला.

### राज्य खो-खो पंच परीक्षा २९ जूनला

**सोलापूर, दि. १७ जून-**

महाराष्ट्र खोखो असोसिएशन यांच्या वतीने राज्य खो-खो पंच परीक्षा रविवार २९ जून रोजी घेण्यात येणार आहे. इच्छुकांनी आपली नोंदणी १९ जून रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत परीक्षा शुल्क रुपये एक हजार ९८८११३३१०३ या नंबरवर भरून करावी, असे सोलापूर ॲम्युचर खो खो असोसिएशनचे सरचिटणीस ए.बी. संगवे यांनी कळविले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त क्रीडाशिक्षक व खोखो प्रेमींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी केले आहे.

# वेगवान गोलंदाज सिद्धार्थ कौलची बिग बॅश लीगसाठी नोंदणी

### १५ भारतीय महिलांचाही समावेश

◆ **मेलबर्न, १७ जून**

माजी भारतीय वेगवान गोलंदाज सिद्धार्थ कौलने ऑस्ट्रेलियामध्ये खेळल्या जाणाऱ्या पुरुषांच्या बिग बॅश लीग ड्राफ्टसाठी स्वतःची नोंदणी केली आहे, तर भारतातील इतर १५ खेळाडूंनी महिला स्पर्धेसाठी नोंदणी केली आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने मंगळवारी ही माहिती दिली.



गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होण्यापूर्वी भारतासाठी तीन एकदिवसीय आणि तितकेच टी-२० सामने खेळणारा कौल हा गुरुवारी येथे होणाऱ्या बीबीएल ड्राफ्टसाठी स्वतःची नोंदणी करणारा एकमेव भारतीय पुरुष खेळाडू आहे.

इंग्लंडचा दिग्गज वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसन हा लीगसाठी नोंदणी केलेल्या जगभरातील ६०० हून अधिक खेळाडूंपैकी एक आहे. महिला स्पर्धेसाठी नोंदणी केलेल्या १५ भारतीय खेळाडूंमध्ये कनिका आहुजाचा समावेश आहे. ती महिला प्रीमियर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळते आणि या वर्षाच्या सुरुवातीला भारतासाठी तिने टी-२० आंतरराष्ट्रीय पदार्पण केले होते.

इतर भारतीय महिला खेळाडूंमध्ये जेमिमा रॉड्रिग्ज, शिखा पांडे, राधा यादव आणि यास्तिका भाटिया यांचा समावेश आहे, ज्या यापूर्वी महिला बीबीएलमध्ये खेळल्या आहेत.

यादीत एस मेघना, अरुंधती रेड्डी, प्रतीका रावल, अंडर-१९ टी-२० विश्वचषक विजेती कर्णधार निकी प्रसाद, उमा छेत्री, काश्वी गौतम, प्रिया मिश्रा इत्यादींचाही समावेश आहे. ◂(वृत्तसंस्था)

### नेदरलॅण्ड्सकडून ज्युनियर भारतीय महिलांचा पराभव

**उट्रेक्ट (नेदरलॅण्ड्स)** : भारतीय ज्युनियर महिला हॉकी संघाला नियमित वेळेत गोलशून्य बरोबरीनंतर यजमान नेदरलॅण्ड्सविरुद्ध शूटआऊटमध्ये २-३ असा पराभव पत्करावा लागला. या पराभवानंतरही भारतीय ज्युनियर संघासाठी हा दौरा यशस्वी ठरला. सलग चार विजयांसह (बेल्जियमविरुद्ध तीन आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध एक) या सामन्यात प्रवेश करणाऱ्या भारतीय संघाने मजबूत नेदरलॅण्ड्स संघाविरुद्ध संयम आणि उत्साह दाखवला. सामन्याच्या चारही क्वार्टरमध्ये दोन्ही संघांनी गोल करण्याच्या अनेक संधी निर्माण केल्या परंतु बचावफळी आणि गोलकीपरच्या उत्कृष्ट खेळामुळे कोणताही संघ असे करण्यात यशस्वी झाला नाही. शूटआऊटमध्ये, लालरिनपुई आणि प्रियांका यादव यांनी भारताकडून गोल केले तर इम डी लीउ, रुस अल्केमेड आणि लोटे रस्ट यांनी नेदरलॅण्ड्ससाठी मिळालेल्या संधींचा फायदा घेत गोल केले.

# अचूकतेमध्ये बुमराह मॅकग्रासारखाच : स्टुअर्ट ब्रॉड

◆ **मुंबई, १७ जून**

भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहची फलंदाजांना चमकवण्याची क्षमता आणि गोलंदाजीतील उत्कृष्ट संतुलन यामुळे तो ऑस्ट्रेलियन दिग्गज ग्लेन मॅकग्राच्या समोर आहे आणि इंग्लंडविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेत त्याच्या कामगिरीवर सर्वांचे लक्ष असेल, असा विश्वास इंग्लंडचा माजी वेगवान गोलंदाज स्टुअर्ट ब्रॉडने व्यक्त केला आहे.



जागतिक क्रिकेटमधील सर्वात संतुलित गोलंदाजीच्या बाबतीत ब्रॉडने बुमराहची तुलना ऑस्ट्रेलियन महान वेगवान गोलंदाज मॅकग्राशी केली.

ब्रॉड म्हणाला, जेव्हा बुमराह गोलंदाजी करण्यासाठी धावतो तेव्हा तुम्हाला वाटते की तो ताशी ७० किमी वेगाने असेल परंतु तो ताशी ९० किमी वेगाने गोलंदाजी करतो. त्यामुळे तुम्हाला योग्य अंदाज येत नाही. जोस बटलरसोबतच्या एका कार्यक्रमात ब्रॉड म्हणाला, जेव्हा मी शोएब अख्तरचा सामना केला तेव्हा तो ताशी शंभर मैल वेगाने धावत असे आणि ताशी शंभर मैल प्रति तास वेगाने गोलंदाजी करत असे. २०२३ मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये ६०४ बळी घेतल्यानंतर निवृत्ती जाहीर करणारा ब्रॉड म्हणाला, बुमराहचा रन-अप खूप संतुलित आहे आणि कधीही तो बिघडू देत नाही. मी पाहिलेल्या गोलंदाजांमध्ये ग्लेन मॅकग्राचा रन-अप खूप संतुलित होता. बुमराह देखील त्याच्यासारखाच आहे. बुमराह मालिकेतील सर्व पाच कसोटी सामन्यांमध्ये खेळण्याची अपेक्षा नाही, ज्याची पुष्टी भारतीय निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# शुभमनमध्ये रोहित, विराटचे मिश्रण

### जोस बटलरने केले कौतुक

**नवी दिल्ली, १७ जून-**

टी-२० मध्ये उत्कृष्ट कर्णधारपद भूषवणारा शुभमन गिल २० जूनपासून नवीन भूमिकेत दिसणार आहे. गिल कसोटीत क्रिकेटमध्ये कसा कर्णधारपद भूषवतो हे नंतर कळेल, परंतु त्याच्यासोबत खेळणारा माजी इंग्लंड कर्णधार शुभमनच्या कर्णधारपदात भारताच्या दोन मोठ्या कर्णधारांचे मिश्रण दिसत असे मानतो. गुजरात टायटन्सकडून खेळलेला इंग्लंडचा माजी कर्णधार जोस बटलरने शुभमन गिलबद्दल गौरवोद्गार काढले. जोसचा विश्वास आहे की भारताचा नवीन कसोटी कर्णधार शुभमन गिल हा कर्णधार म्हणून रोहित शर्मा आणि विराट कोहलीच मिश्रण आहे. शुभमन शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत राष्ट्रीय संघाचे नेतृत्व करणार आहे. इंग्लंडच्या मर्यादित षटकांच्या संघाचा माजी कर्णधार बटलर या वर्षी इंडियन प्रीमियर लीगमध्य गिलच्या नेतृत्वाखाली खेळला. ता म्हणाला की, गिलला कर्णधारपदाची भूमिका आणि त्याच्या फलंदाजीमध्ये संतुलन राखावे लागेल. आयपीएल १८ च्या हंगामात गुजरातसाठी गिलसोबत अनेक मोठ्या भागीदारी करणारा बटलर म्हणाला, शुभमन गिल खरोखरच एक प्रभावी खेळाडू आहे. जेव्हा ता बोलतो तेव्हा तो खूप शांत आणि संतुलित असतो. मला वाटते की ता मैदानावर स्वतःला आव्हान देतो. त्याच्यात खूप जोश आहे आणि म ला वाटते की तो कर्णधार म्हणून कोहली आणि रोहितचे मिश्रण असेल. कोहली खरोखरच खूप आक्रमक होता आणि त्यान भारतीय संघ पूर्णपणे बदलला. त्यान प्रत्येक प्रकारच्या सामन्यासाठी संघ तयार केला, तर रोहित थोडा वेगळा होता जो थोडा शांत आणि संयमी होता.



आपल्या कारकीर्दीचा शेवटचा क्रिकेट कसोटी सामना खेळणाऱ्या श्रीलंकेच्या अँजेलो मॅथ्यूजला मंगळवारी श्रीलंकेतील गॅले येथे श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यातील पहिल्या क्रिकेट कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी अनोख्या पद्धतीने सलामी देऊन त्याला शुभेच्छा दिल्या.



# ईगल्स संघाचे दोन विजय; लॉयन्स, पँथर्सची विजयी सलामी

### निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी आंतर क्लब क्रिकेट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ जून-**

सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांच्या मान्यतेने निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी आयोजित आंतर क्लब क्रिकेट स्पर्धेत लॉयन्स, ईगल्स व पँथर्स क्लबने विजयी सलामी दिली. ईगल्सने दोन विजय मिळवित घोडदौड केली आहे.

डोणगाव रोडवरील पुष्प जिमखाना येथे आयोजित केलेल्या या स्पर्धेमध्ये सहा एनजीसीए ईगल, टायटन्स, लॉन्स, वॉरियर्स, रायडर्स व पँथर्स असे सहा संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन विष्णू गायकवाड, रविकुमार वर्मा, राहुल मेत्रे, विनोद पाटील यांच्या उपस्थितीत झाले. सूत्रसंचालन निलेश गायकवाड यांनी केले.

सलामीच्या दिवशीच्या सामन्यात लॉयन्सने टायटन्सवर ११२ धावांनी विजय मिळविला. दुसऱ्या सामन्यात ईगल्सने टायटनवर ६ गडी राखून मात केली. मंगळवारी झालेल्या सामन्यात ईगल्सने लॉयन्सवर पाच गडी राखून पराभव केला. दुसऱ्या सामन्यात पँथर्सने वॉरियर्सवर १२२ धावांनी नमविले.

### संक्षिप्त धावफलक

**लॉयन्स :** ३० षटकात १ बाद २७१ (नारायण डोके १११, विहान येवणकर ५२, साहिल मिश्रा ५१, ऋग्वेद पाटील २७, अनुज वाल्मिकी १-५२) वि. वि. **टायटन्स :** २२.१ षटकात सर्व बाद १५९ ( वीरांश वर्मा ७७, अभिजीत सरवदे १६, रेहान पटेल १०, पृथ्वीराज मुंडे ३-११, गणेश पवार २-२५, जयवर्धन भोसले, नारायण डोके, साहिल मिश्रा, सुरज थोरात प्रत्येकी एक बळी)

**टायटन :** ३० षटकात ६ बाद २३३ (अभिजीत सरवदे १०३, श्रवण म्हेत्रे १६, गोविंद कणके ३५, संग्राम पवार नाबाद १०) पराभूत विरुद्ध **ईगल्स :** २९ षटकात ४ बाद २३४ ( सोहम कुलकर्णी ८८, आनंद शेंडे ३६, अभिनव शेळके ३२, विजय वटकर नाबाद २४, कबीर कीर्तीकर नाबाद ११).

**लॉयन्स :** २१ षटकात सर्व बाद ११४ ( सुजल गायकवाड २०, यशराज गायकवाड २७, साहिल मिश्रा, यशराज टेकाळे प्रत्येकी ११, अभिजीत कोरे ४-१५, सोहम कुलकर्णी, श्रवण माळी, सार्थक कन्ना प्रत्येकी एक बळी) पराभूत विरुद्ध **ईगल :** २५.५ षटकात ५ बाद ११५ (कबीर कीर्तीकर २७, आनंद शेंडे नाबाद ११, सोहम जाधव १५, जयवर्धन भोसले, गणेश पवार, विहान येवणकर प्रत्येकी एक बळी).

**पँथर्स :** २५ षटकात ९ बाद १९८ (कबीर कीर्तीकर ९०, आदित्य गाडे ३१, मयुरेश सुरवसे १६, अभिराज कापसे २-२९, स्वयम् पवार, श्रीकर चव्हाण, हारुन शेख, मुस्तफा शेख व वेदांत शिखरे प्रत्येकी एक बळी) वि. वि. **वॉरियर्स :** २१ षटकात सर्व बाद ७४ (अंशुल गवळी ९, सुजल गायकवाड ६ धावा, मुस्तफा शेख ३, अथर्व पाटील ४-०, अथर्व हलकुरकी ३-११, कबीर कीर्तीकर, अनमोल चौधरी प्रत्येकी १ बळी, सोहम हिरेमठ २-१३).

# राज्याच्या क्रीडा प्रबोधीनीत सरळ प्रवेश

### खेळनिहाय कौशल्य चाचणीद्वारे प्रवेश प्रक्रिया, २३ जूनपर्यंत नोंदणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दिनांक १७ जून-**

राज्यातील क्रीडा प्रबोधिनीमध्ये सरळ सेवा प्रवेश व खेळनिहाय कौशल्य प्रवेशाकरिता विभागस्तर व राज्य चाचण्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील पात्र खेळाडूंनी सहभागी होण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज २३ जूनपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे. विहीत नमुन्यातील अर्ज कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड (मोबाईल ७२१९१५५२५२) यांच्याशी संपर्क साधावा.

राज्यातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याकरिता प्रतिभावंत खेळाडूंची निवड करून शास्त्रोक्त प्रशिक्षण, अद्ययावत क्रीडा सुविधा, शिक्षण, भोजन, निवास इत्यादी सुविधा क्रीडा प्रबोधिनीच्या अंतर्गत खेळाडूंना देण्यात येत आहेत. राज्यातील क्रीडा प्रबोधिनीमध्ये सरळ सेवा प्रवेश व खेळनिहाय कौशल्य चाचण्यांमध्ये निवासी व अनिवासी खेळाडूंना प्रवेश देण्यात येणार आहे. यासाठी ज्युदो, जिम्नॅस्टिक, सायकलिंग, फुटबॉल, जलतरण, हॅन्डबॉल इत्यादी खेळांच्या खेळनिहाय चाचण्यांचे आयोजन करण्यात येत आहे.

क्रीडा प्रबोधिनीमध्ये सरळ सेवा प्रवेश प्रक्रिया व खेळनिहाय कौशल्य चाचणी याबाबत अर्हता अशी आहे. क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर पदक प्राप्त खेळाडू किंवा राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधीत्व केलेले खेळाडू ज्यांचे वय १९ वर्षांखालील खेळाडूंना चाचणी तज्ञ समिती प्रवेश निश्चित करेल. खेळनिहाय कौशल्य चाचणीमध्ये प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर सहभागी खेळाडूंना ज्यांचे वय १९ वर्ष आतील आहे अशा खेळाडूंना संबंधित खेळाच्या खेळनिहाय कौशल्य चाचणीचे आयोजन करून गुणानुक्रमे प्रवेश निश्चित केला जातो. वैद्यकीय चाचण्यांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंची वैद्यकीय पथकाद्वारे चाचणी घेऊन क्रीडा प्रबोधिनीमध्ये शारिरिक दृष्ट्या खेळाडूंची निवड अंतिम करण्यात येते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### बार्शी बसस्थानकातील गैरसोयीबाबत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार पक्ष) आक्रमक

**बार्शी, दि. १७ जून-**

बार्शी बस स्थानकातील विविध समस्या घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाच्यावतीने आक्रमक आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये बार्शी बस स्थानकावर झालेले प्रचंड मोठे खड्डे तात्काळ बुजून त्या ठिकाणी काँक्रिटीकरण करण्यात यावे. बार्शी बस स्थानकावरती नियमितपणे स्वच्छता करण्यात यावी तसेच ग्रामीण भागातून बार्शीला येणारे विद्यार्थी यांच्यासाठी बार्शी बस स्थानकापासून शिवाजी कॉलेज या ठिकाणापर्यंत जोडपास देण्यात यावा अशा प्रमुख मागण्यासहित इतर मागण्याबाबत आंदोलन करण्यात आले. यावेळी कृष्णराज बारबोले, जिल्हा उपाध्यक्ष इक्बाल पटेल, माजी नगरसेवक सुनील जावळी, नितीन भोसले, शिवशंकर ढवण, विजय अडसूळ, आदेश वाणी, मनोज मोरे, रवी थोरात, सुमित खुरंगुळे, हनुमंत साळुंखे, भास्कर बागडे, सूर्या मस्के, ऋषिकांत पाटील, ,बाळासाहेब गांजे, बंडू पिंगळे, प्रथमेश बोंडवे, प्रथमेश गवळी, भाऊ गोडगे, राजेंद्र मुळे उपस्थित होते.



### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्यपदी बागल

**पिलीव, दि. १७ जून-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्यपदी नुकतीच अशोक बागल यांची नियुक्ती झाली आहे. याबद्दल शिक्षक-पालक संघाचे उपाध्यक्ष संजय पाटील, पत्रकार दामोदर लोखंडे, अतुल नष्टे, गणेश देशमुख यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

### महिलांनी राजमाता जिजाबाईच्या कार्याचा आदर्श घ्यावा : कल्याणशेट्टी

**अक्कलकोट, दि. १७ जून-**

राजमाता जिजाबाई यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना कौशल्याधिष्ठित शिक्षण देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास केला. स्वराज्याची स्थापना करण्यास प्रेरणा दिली. महिलांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन आपल्या मुला मुलींना परिस्थितीनुसार घडविले पाहिजे. तरच उद्याच्या जगात ते सक्षमपणे वाटचाल करतील असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री मातोश्री गुरूबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास अभ्यास मंडळाने आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांनी राजमाता जिजाबाई यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. शितल झिंगाडे यांनी केले तर आभार प्रा. मनीषा शिंदे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. शितल गायकवाड, शिल्पा धूमशेट्टी, हर्षदा गायकवाड, भीम सोनकांबळे, जनाबाई चौधरी उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### अंबुबाई हिबारे

**सोलापूर, दि. १७ जून**

गांधीनगर अक्कलकोट येथील अंबुबाई नागनाथ हिबारे (वय ७०) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे ३ मुले, १ मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. सिद्धेश्वर पंचकट्टा परिसरातील शिलाई मेकर दिपक हिबारे यांच्या त्या आई होत.

### रमजान अत्तार

**सोलापूर, दि. १७ जून-**

सोलापूर येथील बॉम्बे पार्क येथे राहणारे रमजान आत्तार (वय ७०) यांचे मंगळवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी दोन मुले मुलगी सुना नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार सरदार अत्तार व रसूल अत्तार यांचे ते वडील होत.

### शकुंतला केवटे

सोलापूर, दि. १७ जून-

वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील शकुंतला भागवत केवटे वय ९० यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे. सिद्धेश्वर प्रशालेतील सहशिक्षक यशवंत केवटे यांच्या त्या आई होत्या.

### कृष्णाहरी मामडयाल

**सोलापूर, दि. १७ जून-**


येथील ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय व्हॉलीबाल खेळाडू आणि सुताचे व्यापारी कृष्णाहरी सिद्राम मामडयाल यांचे दीर्घ आजाराने ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथे दि.१७ रोजी पहाटे ४.४० वाजता निधन झाले. मृत्यूसमयी ८५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातू नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी ऑस्टेलिया मेलबर्न येथे होणार आहे.

# गुरूदेव रानडे यांच्या जीवनावरील छायाचित्रांच्या पुस्तकाचे अनावरण

## १९०१ ते १९५७ सालापर्यंतची माहिती; सर्वपल्ली राधाकृष्णन, तत्कालीन गृहराज्यमंत्री दातार यांच्याही आठवणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून-**

निंबाळचे थोर साक्षात्कारी संत रामचंद्र दत्तात्रय रानडे तथा गुरूदेव रानडे यांच्या जीवनकार्यावरील विविध १८० छायाचित्रांचे फोटो अल्बम पुस्तकाचे निंबाळातील श्री गुरुदेवांच्या घरी त्यांच्या पुण्यतिथी सप्ताहाच्या पहिल्या दिवशी अनावरण झाले. गुरूदेवांचे नातू दीपक आपटे (पुणे) यांनी संकलन करून हे फोटो पुस्तक साधकांसाठी उपलब्ध करून दिले आहे.




१९०१ ते १९५७ सालापर्यंतच्या विविध आठवणी फोटो स्वरूपात यात समावीष्ट आहेत. भारताचे माजी उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, तत्कालीन केंद्रीय गृहराज्य मंत्री बी. एन. दातार यांच्यासह विविध मान्यवरांचे छायाचित्र या पुस्तकात आहेत. (अ जर्नी कॅप्चुरर्ड थ्रु इयर्स- श्री गुरूदेव प्रो. आर. डी. रानडे दी सेंट ऑफ निंबाळ) या नावाने हे पुस्तक रूपी अल्बम फोटो आहे. दीपक आपटे यांनी या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहीली आहे.

पूज्य उमदीकर भाऊसाहेब महाराज यांच्याकडून गुरूदेव रानडे यांना वैकुंठ चतुर्थदशी दिवशी (१९०१ साली जमखंडी) येथे बसप्पा कटगी यांच्या घरी अनुग्रह झाला. मॅट्रीक परीक्षेत यश संपादन केल्यानंतर त्यांना नानासाहेब शंकर शेठ स्कॉलरशीप मिळाली. त्यानंतर ते पुण्यातील फग्यूर्सन कॉलेजात शिक्षणासाठी आले. तिथेच काही काळ तत्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून सेवा दिली. काही काळ सांगली विल्गंडन कॉलेजात नोकरी केली. नंतर अलाहबाद विश्व विदयालयात प्राध्यापक आणि नंतर कुलगुरू (व्हाईस चॉन्सलर) म्हणून सेवानिवृत्त झाले.

### या मान्यवरांसोबतच्या फोटोंमधून आठवणी

माजी उपराष्ट्रपती बी. डी. जत्ती हे निंबाळला आले होते. जमखंडीत गुरूदेवांच्या अमृत महोत्सवात आले होते. हभप सोनोपंत दांडेकर (मामा दांडेकर), न. चि. केळकर, सांगली, औंध, मिरज या तीनही संस्थानचे राजेसाहेब, प्रो. गंगानाथ झा, प्रो. बर्च, प्राध्यापक डी. मार्केट, गुरूदेवांच्या परमार्थ सोपान या पुस्तकाचे प्रकाशन सांगलीत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. तत्कालीन गृहराज्यमंत्री बी. एन. दातार, केंद्रीय नभोवाणी मंत्री आर. आर. दिवाकर यांनी निंबाळल्या भेटी दिल्याची छायाचित्रे. साधक परिवार, गुरूदेवांचा संपूर्ण परिवार, याशिवाय विविध आठणीतील फोटो यात संग्रहीत आहेत. एकूण १८० फोटो असून १६८ पानांचे पुस्तक आहे. फोटो अल्बम पुस्तक साधकांसाठी नक्कीच उपयोगी आणि गुरूदेवांच्या आठवणींना उजाळा देणारी आहे. भक्ती वाढण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल असे दीपक आपटे यांनी सांगितले.

## आरोही बियरबार येथे दीड लाखांची दारु चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १७ जून-**

दि. १६ जून २०२५ रोजी पहाटे तीन वाजून वीस मिनिटांनी सापटणे (ता. माढा )`थील टेंभुर्णी हद्दीत पुणे-सोलापूर हायवे रोड लगत असलेले हॉटेल आरोही बियरबार परमिट रूम येथे एक लाख ६२ हजार २५ रुपये किमतीच्या वेगवेगळ्या कंपनीच्या सीलबंद बाटल्या हॉटेलच्या स्टोर रूमची कडी कोंडा ऊचपासून अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. अशा प्रकारची तक्रार हॉटेल व्यवसाय अमोल साहेबराव ढवळे यांनी टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे दिले आहे.




आज्ञा चोरट्याने चोरून नेलेला दारु माल पुढील प्रमाणे ५९४० रू.ची ऑफिसर चॉईस कंपनीच्या १८० मिली ४४ सिलबंद काचेच्या बाटल्या, १०,२६० रू.ची रॉयल स्टॅक १८० मिली काचेच्या ५४ सिलबंद बाटल्या, ३००० रू.ची रॉयल स्टॅक कंपनीच्या ९० मिलीच्या काचेच्या ३० सिलबंद बाटल्या, ४५६० रू.ची रॉयल चॅलेंजर १८० मिली काचेच्या २४ सिलबंद बाटल्या, २२०० रू.ची रॉयल चॅलेंजर ९० मिली काचेच्या २२ सिलबंद बाटल्या, ६५७० रू.ची ब्लेन्डर प्राईड १८० मिली काचेच्या १८ बाटल्या, ३५७० रू.ची ब्लेन्डर प्राईड ९० मिली काचेच्या २१ बाटल्या, ४००० रू.ची रॉयलस्टॉक डबल डार्क १८० मिली काचेच्या २० बाटल्या, २६१० रू. ची ओल्ड मंक रम १८० मिली काचेच्या १८ बाटल्या, ३९५५ रू.च्या डॉ.श्रीपुर ब्रॅन्डी १८० मिली काचेच्या ३५ बाटल्या, २५२० रू.डियसबी स्पेशल बॅल्क १८० मिली काचेच्या १८ बाटल्या, ६४०० रू.ची कि.मॅजिक मुमेंट १८० मिली काचेच्या ३२ बाटल्या, प्रत्येकी किं. २०० रू. १८०० रू.मॅजिक मुमेंट ९० मिली काचेच्या १८ बाटल्या, २३८० रू.आय कॉनिव्हायट १८० मिली काचेच्या १४ बाटल्या, २७,६०० रू.चॉईस रिगल २०० मिली काचेच्या २४ बाटल्या,१६९०० रू.बॉलेस्टीन्स २०० मिली काचेच्या २६ बाटल्या, ७६०० रू.जिंमबिम ७५० मिली १० सिलबंद बाटल्या, २०,२४० रू.ग्रॉन्डमास्टर १८० मिली ९२ बाटल्या, ५७६०/ रू.इंमप्रियाल ब्लिव १८० मिली ३६ सिलबंद बाटल्या, ८५०० रू. इंमप्रियाल ब्लिव ९० मिलीच्या १०० बाटल्या, २९०० रू.सिग्निचेर फुल २ सिलबंद बाटल, ७३६० रू. ग्रॉन्डमास्टर फुल ०८ बाटल्या, ५४०० रू.विल्लीयम लॉसम २०० मिली १२ बाटल्या असे १,६२,०२५ रुपये किमतीच्या दारूची चोरी अज्ञात आणि चोरी झाल्याची तक्रार टेंभुर्णी पोलीस स्टेशनमध्ये देण्यात आली असून वरील तक्रारीवरून टेंभुर्णी पोलीस ठाण्यामध्ये आज्ञाविरुद्ध कलम ३३१ (४), ३०५ (अ) प्रमाणे करण्यात आले आहे. सदर घटनेचा तपास पोसई मोरे करीत आहे.

# भारतीय स्टेट बँकेने उभारले हायस्पिड ट्रान्जेक्शन एटीएम

## खरेदी-विक्री संघाचे चेअरमन आवताडे यांच्या हस्ते उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १६ जून-**



मंगळवेढयातील भारतीय स्टेट बँकेने ग्राहकांच्या सेवेसाठी अत्याधुनिक हायस्पिड ट्रान्जेक्शन एटीएम मशीन आणली असून या मशीनचे उदघाटन खरेदी विक्री संघाचे चेअरमन सिद्धेश्वर आवताडे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. दरम्यान या अत्याधुनिक मशीनमुळे खातेदारांना विनाविलंब पैसे काढता येणार आहेत.

मंगळवेढयातील सर्वात मोठी बँक म्हणून भारतीय स्टेट बँकेकडे पाहिले जाते. या बँकेने या पुर्वीही ग्राहकांच्या सेवेसाठी एटीएम सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मात्र नवीन व अत्याधुनिक असणारी एटीएम सेवा मशीन नव्याने आल्याने ती मशीन नुकतीच बँकेने कार्यान्वित केली आहे. ही मशीन कमीत कमी वेळेमध्ये आर्थिक व्यवहार पूर्ण करून देत आहे. तसेच २४ तास रात्रं दिवस ग्राहकांना जेव्हा गरज पडेल त्या वेळेस पैसे काढणे या मशीनमुळे सोयीचे बनले आहे. ही हायस्पिड ट्रान्जेक्शन करणारी एटीएम मशीन आहे. एटीएम पीन बदलणे, पैसे ट्रान्सफर करणे हे सर्व २४ तासाच्या आत सेवा देणारी मशीन असल्यामुळे ग्राहकांना रांगेत उभारण्याची गरज भासणार नाही. योनो कॅश (ॲप) हे अडचणीच्या काळात ग्राहकांना पैसे काढणे सोयीचे असल्याने सध्याच्या युगात या मशीनला अधिक महत्व आहे. भारतीय स्टेट बँकेचे मंगळवेढा शहरात आतपर्यंत एकूण चार एटीएम ग्राहकांच्या सेवेसाठी यापुर्वीच कार्यरत करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. या उदघाटन कार्यक्रमप्रसंगी स्टेट बँकेचे शाखाधिकारी सुनिल बिडगर, सेवा अधिकारी इंझमाम खान, क्षेत्र अधिकारी रामदास मेटकरी, रोकड अधिकारी उदय कुंभार, सुरज शिर्के, कॅशिअर पांडुरंग राऊत, प्राजक्ता जोशी, सुरज माळी, चंद्रकांत गायकवाड यांच्यासह अन्य बँकेतील कर्मचारी उपस्थित होते.



## न. प. वरिष्ठ शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**अक्कलकोट, दि. १७ जून-**

न. प. वरिष्ठ प्राथमिक शाळेत 'प्रवेशोत्सव कार्यक्रम' साजरा करण्यात आला असून या कार्यक्रम ास १०० शाळा भेटी अंतर्गत क्षेत्रीय अधिकारी म्हणून ए. आर. दोडमनी, विस्तार अधिकारी, पंचायत समिती अक्कलकोट यांची उपस्थिती होती. त्यांचे शाळा व्यवस्थापन समितीकडून गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक शाळेचे प्र.मुख्याध्यापक सिध्दाराम पुजारी यांनी केले. विद्यार्थ्यांना गणवेश, पाठ्यपुस्तक, बिस्किट वाटप करण्यात आले. कार्यक्रमास शिंदे, कलबुर्गे यांचेही योगदान लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक केंद्रे यानी केले तर आभार प्र. मुख्याध्यापक पुजारी यांनी मानले.

## पंढरपुरात भारत विकास परिषदेचा पदग्रहण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ जून-**

भारत विकास परिषद या सेवाभावी संस्थेच्या वतीने नुकताच दायित्व ग्रहण सोहळ्याचे (शपथविधी) आयोजन केबीपी चौक येथील राधेश सभागृहात करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध अभिनेते रवींद्र मंकणी, सुनेत्रा मंकणी, पश्चिम महाराष्ट्र प्रांत महासचिव शिरीष कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.



संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेंद्र काणे यांच्या मार्गदर्शनाखाली शपथविधी पदग्रहण सोहळा संपन्न झाला. नूतन अध्यक्ष म्हणून रोहिणी कोर्टीकर यांची निवड करण्यात आली तर नूतन सचिव मंदार केसकर, नूतन कोषाध्यक्ष सुनील परळीकर, उपाध्यक्ष महावीर गांधी, सहसचिव मोनिका गांधी, सहकोषाध्यक्ष रेखा टाक यांची निवड करण्यात आली. संघटक मिलिंद वाघ, सीमा कुलकर्णी, भारत गदगे, दत्तात्रय तरळगट्टी यांची गुरुवंदन प्रमुख म्हणुन निवड करण्यात आली. डॉ. अनिल पवार, अजित कुलकर्णी, अनुराधा हरिदास यांची नूतन सेवाप्रमुख म्हणून निवड करण्यात आली. महिला संघटकपदी भाग्यश्री लिहिणे यांची निवड करण्यात आली. अमित शिरगावकर, आर. डी. देशपांडे, स्वाती जोशी यांची भारत को जानो , स्पर्धाप्रमुख म्हणून निवड करण्यात आली. माधुरी जोशी, स्वानंदी काणे, शिल्पा चौंडावार यांची समूहगान स्पर्धा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली. पर्यावरण- विवेक परदेशी, राजेंद्र केसकर, नीलम माळी यांची निवड करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. मैत्रेयी केसकर यांनी केले.

माजी अध्यक्ष मंदार लोहोकरे यांनी माजी अध्यक्ष मनोगत व्यक्त केले. मागील वर्षी केलेल्या कार्याचा अहवाल माजी सचिव डॉ. अनिल पवार यांनी सादर केला. सदस्य म्हणून चैतन्य उत्पात, मनोज कुलकर्णी, ऐतवाडकर, सुरेखा कुलकर्णी, सुचिता भादुले, वैजयंती कुलकर्णी, मकरंद रत्नपारखी, प्रीती वाघ, बारसोडे मॅडम, अजीज भायाणि यांची निवड करण्यात आली. सीमा कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत व मोनिका शहा यांनी प्रास्ताविक केले.मान्यवर पाहुण्यांचा परिचय सौ.यादगिरी, माधुरी जोशी, डॉ. वर्षा काणे यांनी केला. यावेळी पंढरपूर येथील रोटरी क्लब, लायन्स क्लब, विद्या विकास मंडळ पदाधिकारी, कलासाधना सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत महाजन बडवे उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.


# अजित पवार राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षपदी उमेश पाटील

## जिल्हाध्यक्षपद होते रिक्त; स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका जिंकण्याचे आवाहन

- **उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिले नियुक्तीपत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या सोलापूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी उमेश पाटील यांची निवड झाली आहे. निवडीचे पत्र राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पाटील यांनी स्वीकारले. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका जिंकण्याचे आवाहन पाटलांना पेलावे लागणार आहे.



दरम्यान, दीपक साळुंखे हे शिवसेनेत गेल्याने जिल्हाध्यक्षपद रिक्त होते. त्यासाठी अनेकांनी फिल्डींग लावली होती. मात्र कट्टर अजित पवार समर्थक पाटील यांच्या गळ्यात जिल्हाध्यक्षपदाची माळ पडली आहे. विधानसभा निवडणुकी दरम्यान उमेश पाटील यांनी उघडणे पक्षावर नाराजी व्यक्त केली होती. पाटील हे शरदचंद्र पवार गटात जाण्याची शक्यता वर्तवली गेली होती. मात्र आपला नेता अजित पवार हेच माणून त्यांनी कोणत्याही पक्षात न जाता केवळ यशवंत माने यांचा पराभव करण्यासाठी दंड थोपटले होते. अजित पवारांना दिलेल्या शब्दानुसार त्यांनी मोहोळ मध्ये यशवंत माने यांचा पराभव केला. त्यानंतर ते पुन्हा अजित पवारांच्या जवळ गेले. अजित पवारांनी सुद्धा उमेश पाटलांचे दिलेल्या शब्दाला जागणारा कार्यकर्ता म्हणून कौतुक केले. उमेश पाटील हे सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष झाल्याने आता सोलापूर जिल्ह्याचे राजकीय समीकरणे निश्चित बदलतील अशी चर्चा सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात होत आहे.

### बळीराम साठे यांच्या भूमिकेकडे लागले लक्ष; शिंदेसेना हाच एमकेव पर्याय?

एकीकडे शरद पवार यांचे कट्टर समर्थक मानले जाणारे बळीराम काका साठे यांना जिल्हाध्यक्ष पदावरून काढल्यानंतर ते नाराज झाले आहेत. काका साठे यांनी वडाळा येथे आयोजित केलेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत भविष्यात धनुष्यबाण उचलण्याचा मानस बोलून दाखवला आहे. मात्र धनुष्यबाण टोचेल या भीतीने कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा घड्याळ हाती घेण्याचे विनंती केली आहे. अशा परिस्थिती अचानकपणे अजित पवार आणि सुनील तटकरे यांनी उमेश पाटील यांच्याकडे सोलापूर जिल्हा ग्रामीणची जबाबदारी दिल्याने, बळीराम काका साठे यांच्याकडे केवळ शिंदेसेना हाच एकमेव पर्याय उरलेला दिसत आहे. मात्र सदरची ही नवीन नियुक्ती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे पुन्हा एकदा सोलापूर जिल्ह्यावर वरचष्मा राहणार का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# पिलीव येथे स्टॅम्प पेपर मिळत नसल्याने नागरिकांची गैरसोय

**पिलीव, दि. १७ जून-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव ही मोठी बाजारपेठ असणारे गाव आहे. याठिकाणी दोन हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज तसेच आसपासच्या सुळेवाडी, शिंगोर्णी याठिकाणी हायस्कूल आहेत. या ठिकाणी विदयार्थना शैक्षणीक कामासाठी नागरिकांना बँक प्रकरणासाठी, सोने तारणं, नोटरीसाठी, बक्षीसपत्र, हमीपत्र व इतर अनेक कामासाठी स्टॉप पेपरची आवश्यकता आहे.

पिलीव व आसपासच्या दहा-बारा खेडेगावातील नागरिक ,विद्यार्थी कागदपत्रे काढण्यासाठी बँक प्रकरणे व इतर कामासाठी शंभर रुपये, पाचशे रूपयांच्या स्टॅम्प पेपर ची आवश्यकता असते. पण गेल्या दहा-पंधरा वर्षापासून पिलीव येथे स्टॅम्प पेपर मिळतच नाही.

यामुळे नागरिकांना, विद्यार्थ्यांना माळशिरस, अकलूज, वेळापूर याठिकाणी जाऊन स्टॅम्प पेपरसाठी जावे लागते. यासाठी वेळ तर वाया जातोच शिवाय सर्व सामान्य नागरिकांना, विदयार्थीना मोठा आर्थीक भुरदंड सोसावा लागत आहे. प्रशासनाने नागरिक तसेच विदयार्थी यांची होणारी गैरसोय टाळणयासाठी याठिकाणी नवीन स्टॅम्प होल्डरची नियुक्ती करणे आवश्यक आहे. खरेतर लोकप्रतिनिधी किंवा प्रशासनाने एवढया वर्ष याची दखल घेतली नाही. यामुळे नागरिकांना केवळ स्टम्प पेपरसाठी एवढया लांब हेलपाटे मारणे कितपत योग्य आहे. प्रशासनाने याची दखल घेत याठिकाणी स्टॅम्प परवाना देणे आवश्यक आहे.

> पिलीव येथे स्टॅम्प पेपर मिळत नसल्याने नागरिक ,विदयार्थनची प्रचंड गैरसोय होत आहे. प्रशासनाने याठिकाणी स्टॅम्प पेपर परवानाधारक नेमुन होणारी गैरसोय टाळावी.
> **- शिवराज पुकळे, भाजपा नेते.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

**रिक्षा चालकांच्या विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी**

# दोन ज्येष्ठ रिक्षा चालक सोलापूर ते मुंबई मंत्रालयाकडे पायी चालत जाणार





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ जून-**

महाराष्ट्रातील ३० लाख रिक्षा चालकांच्या विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित रिक्षा संघटनेच्या वतीने दोन ज्येष्ठ रिक्षा चालक गुरुवार दि. १९ जून २०२५ रोजी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय पुनम गेट ते मुंबई मंत्रालयाकडे पायी चालत रवाना होणार आहेत, अशी माहिती तानाजी मसलकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ज्येष्ठ रिक्षा चालक तानाजी मसलकर आणि चांदसाहेब मुजावर हे दोघेजण सोलापुरातून मंत्रालय मुंबईकडे पायी प्रवास करणार आहेत. रिक्षा चालक कल्याणकारी मंडळ ऑनलाईन अर्ज चालू करण्यात यावे. वाहतूक पोलिसांकडून होणारी ई चालान पद्धत त्वरित बंद करावी. रिक्षा उदंड झाल्या म्हणून खुले परवाने त्वरित बंद करण्यात यावेत. ई बाईक टॅक्सी अंमलबजावणी त्वरित रद्द करावी यासह विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हा पायी प्रवास करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस महीपती पवार, अतिश शिंदे, चांदसाहब मुजावर, गजानन लोणार आदी उपस्थित होते.



**राष्ट्रमाता जिजाऊ यांना अभिवादन :** सोलापूर : श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने राष्ट्रमाता राजमाता मासाहेब जिजाऊ यांना पुण्यतिथीनिमित्त शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महामंडळाच्या ट्रस्टचे अध्यक्ष पद्माकर काळे, राजन जाधव, विनोद भोसले, भाऊसाहेब रोडगे, बजरंग जाधव, अंबादास शेळके, प्रकाश ननवरे, प्रीतम परदेशी, जितू वाडेकर, विजय पुकाळे, कल्याण गव्हाणे, सुनंदा साळुंखे, नितीन मोहिते आदी उपस्थित होते.



**पुण्यातील लाल महलात जिजाऊंना अभिवादन**
पुणे : संभाजी ब्रिगेडच्या वतीने लाल महल मधील राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला जिल्हाध्यक्ष मीनलदास, शहर अध्यक्ष शिरीष जगदाळे, जिल्हा सचिव सिद्धाराम सवय, शहर उपाध्यक्ष मनीषा कोळी, शहर संघटक जयश्री जाधव आदी उपस्थित होते.

**डॉ.शिरिष वळसंगकर आत्महत्या प्रकरण**

# आरोपी मनिषा माने-मुसळेच्या जामीन अर्जावर २१ जूनला सुनावणी

● पोलिसांकडून मुदतीच्या आत तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात पाठविले



**▸ सरकार पक्ष सुनावणीसाठी तयार होते :** सरकार पक्ष सुनावणीसाठी तयार होते, मात्र आरोपीच्या वकिलांनी पुढील तारीख मिळण्यासाठी न्यायालयालात अर्ज दाखल केला होता. त्यानुसार त्यांना २१ जून ही तारीख कोर्टाकडून देण्यात आली आहे.
**- ॲड. प्रदीपसिंह राजपूत, सरकारी वकील**

**▸ पंचनामावेळी खिशात चिठ्ठी सापडली :** एफआयआरमध्ये पोलिसांना पोस्टमार्टम च्या वेळी त्यांच्या डाव्या खिशात चिठ्ठी सापडली होती. परंतु दोषारोप पत्रात पीएसआय साखरे यांनी घटने दिवशीच वळसंगकर हॉस्पिटल येथून संबंधित डॉक्टरांकडून डॉक्टरांचे कपडे ताब्यात घेतले होते. ते कपडे त्यांनी हेडकॉन्स्टेबल गायकवाड यांना दिले होते. नंतर दुसऱ्या दिवशी हेड कॉन्स्टेबल गायकवाड यांच्याकडून ते कपडे जप्ती पंचनाम्यानुसार जप्त दाखवण्यात आले. जप्ती पंचनामा वेळी खिशात चिठ्ठी सापडली असे नमूद आहे, त्यामुळे नेमकी चिठ्ठी पोस्टमार्टम करताना सापडली की जप्ती पंचनामा नुसार सापडली.
**- ॲड. प्रशांत नवगिरे, आरोपीचे वकील**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ जून -**

मेंदूविकारतज्ज्ञ डॉ.शिरिष वळसंगकर आत्महत्या प्रकरणातील आरोपी मनिषा माने-मुसळे हिच्या जामीन अर्जावरील सुनावणीवेळी आरोपीच्या वकिलांनी पोलिसांनी दाखल केलेल्या दोषारोपपत्राचा अभ्यास करण्यासाठी मुदत मागवून घेतली. त्यामुळे आता जामीन अर्जावर २१ जून रोजी सुनावणी होणार आहे.

डॉ शिरिष वळसंगकर (वय ७० रा. रेल्वे लाईन सोलापूर) यांनी हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या प्रशासकीय अधिकारी मनिषा माने-मुसळे (वय ४५, रा. बसवराज नेले नगर, जुळे सोलापूर) यांनी खोटारडे आणि घाणेरडे आरोप करून धमकावले, म्हणून जीवन संपवत आहे अशी चिठ्ठी लिहून पिस्टलद्वारे कानशीलामध्ये गोळी झाडून आत्महत्या १८ एप्रिल रोजी केली. डॉ. अश्विन वळसंगकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मनिषा माने-मुसळे यांच्यावर सदर बझार पोलिसांत १९ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी कोर्टाची विशेष परवानगी घेत मनिषा माने यांना अटक केली. सध्या संशयित आरोपी असलेल्या माने न्यायालयीन कोठडीत आहेत. माने हिने न्यायालयात जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला असून त्यावर सुनावणी सुरु आहे. दरम्यान, तपास अधिकारी अजित लकडे यांनी मुदतीच्या आत तपास पूर्ण करून सोमवारी न्यायालयात ७०९ पानाचे दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले आहे. माने यांच्या जामीन अर्जावर १७ जून रोजी सुनावणी झाली. यावेळी आरोपीचे वकील यांना चार्जशीट न मिळाल्याने त्यांनी सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची कोर्टाकडे विनंती केली, त्यानुसार न्यायालयाने २१ जून ही सुनावणीसाठी तारीख दिली आहे. याप्रकरणात सरकारतर्फे ॲड. प्रदीपसिंह राजपूत तर आरोपीतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे काम पहात आहेत.



# गुणवत्तापूर्ण पाणी उपलब्ध करून द्या : सीईओ जंगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून -**

पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची रासायनिक व जैविक पाणी गुणवत्ता तपासणी करण्यासाठी जिल्ह्यात क्षेत्रीय तपासणी संचद्वारे पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व ११२५ गावामध्ये ही मोहीम राबवून नागरिकांना स्वच्छ, शुध्द गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले आहे.

पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहीमेचा लोगोचे अनावरण सिईओ जंगम यांच्या हस्ते झाले. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, प्रशिक्षण समन्वयक शंकर बंडगर, दिपाली व्हटे, यशवंती धत्तुरे, अर्चना कणकी, प्रतिक्षा गोडसे, सचिन सोनवणे, महादेव शिंदे, प्रशांत दबडे आदी विविध सल्लागार उपस्थित होते.

> जिल्ह्यातील ११२५ गावामध्ये क्षेत्रीय तपासणी संचद्वारे प्रत्येक महिन्याला जैविक व रासायनिक पाणी गुणवत्ता तपासणी करावयाची आहे.यामध्ये सर्व शासकिय यंत्रणांनी सहभाग घेऊन पाणी गुणवत्ता तपासणी आणि व्यापक जनजागृती करावी.
> **- अमोल जाधव**
> उपमुख्य कार्यकारी अधिकारी

## शाळांतील प्रवेशोत्सव...



### सु.रा. मुलींची प्रशाला सेवासदन

सेवासदन प्रशालेत नवीन प्रवेशित पाचवीच्या विद्यार्थिनींचे औक्षण करून गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. पालखी मध्ये ज्ञानेश्वरी, भगवद्गीता, महाभारत या ग्रंथांचे संस्थेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, सचिवा वीणा पतकी, माध्यमिक विभाग शालेय समिती अध्यक्षा विद्या लिमये, कार्यकारिणी सदस्य डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या हस्ते पूजन करण्यात आले व ग्रंथ दिंडी काढण्यात आल. गुलाब पाकळ्यांच्या वर्षावात विद्यार्थिनींचे स्वागत करण्यात आले. इ ९वी तील गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. इयत्ता ५ वी ते८ वी च्या विद्यार्थिनींना मोफत पाठयपुस्तके वाटप करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली पवार यांनी केले. कार्यक्रमप्रसंगी मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार, शिक्षक प्रतिनिधी श्रीमती मीरा जमादार उपस्थित होते.



### एन.ए.बी. अंधकार्यशाळा

एन. ए. बी. निवासी अंधकार्यशाळा येथे शाळेचा पहिला दिवस साजरा करण्यात आला. शाळेच्या नव्या पर्वाची सुरुवात विद्यार्थ्यांवर गुलाब पुष्पाचा वर्षाव करून व अंधकार्यशाळेचे अधिक्षक रामचंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नॅब संस्थेचे सदस्य देवेंद्र भंडारे उपस्थित होते, तर अध्यक्षस्थान अंधकार्यशाळेचे अधीक्षक रामचंद्र कुलकर्णी यांनी भूषवले. सूत्रसंचालन रियाज मुल्ला यांनी केले, तर आभार आकांक्षा भंडारे यांनी मानले. स्वागतोत्सव कार्यक्रमासाठी संजय कलाल, श्रीनिवास समदूर्ले, शुभम वांजरे, संदेश कांबळे, भागीरथी नाईकवाडे व अर्चना अंजनाळकर आदी कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.



# सागर सिमेंट व एम.के फाऊंडेशनकडून एक लाख वह्या वाटपाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दिनांक १७ जून -**

सागर सिमेंट व एम के फाऊंडेशनच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी एक लाख वह्यांचे वाटप करण्याचा शुभारंभ करण्यात आला.

सागर सिमेंट कार्यालय विजापूर रोड येथे जिल्हा प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत प्रातिनिधीक स्वरूपात वह्या वाटप करण्यात आले. आनंद लोणावत, सोमनाथ हासाळे, शिवलाल हरळेकर, रमीज साबुनगर, प्रकाश करपे, मल्लेशी मंदोली, रमेश कलशेट्टी, मुख्याध्यपक गुरुनाथ वांगीकर, हणमंत मोतीबाने, काशिनाथ भातगुणकी, नागेश बिराजदार, मल्लिकार्जुन धारसंगे, कलप्पा हंगरगी, राजकुमार दिंडुरे, बसवराज बाके, सुरेश ढवले, प्रकाश राचेट्टी, अशोक बगले, आप्पाशा हंचनाळ आदींच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

> **गरजू विद्यार्थ्यांसाठी हे कार्य चालू राहणार**
> गरजू व गरीब विद्यार्थ्यांसाठी वह्या वाटपाचे हे कार्य माझ्या हातून कायम जमेल. त्याप्रमाणे अखंड कायमच चालू ठेवण्याचा प्रयत्न करेन. या कार्यात कंपनी मॅनेजमेंट व वरिष्ठांचा भक्कम पाठिंबा राहिला आहे.
> **- महादेव कोगनूरे,**
> संस्थापक अध्यक्ष, एमके फाउंडेशन

# जानकी नगर गार्डन येथे वृक्षारोपणासह हजार झाडांचे वाटप

● लोकमंगल फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमास महापालिकेचे सहकार्य राहील : डॉ. ओम्बासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दिनांक १७ जून -**

आमदार सुभाष देशमुख यांनी लोकमंगल फाउंडेशनच्या माध्यमातून राबवलेला वृक्षारोपणाचा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. जशी वृक्ष लावण्याची आपली जबाबदारी आहे तशीच त्याचे संवर्धन करणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे नागरिकांनी याची काळजी घ्यावी यापुढे लोकमंगलच्या सामाजिक उपक्रमास महापालिकेचे कायम सहकार्य राहील, असे प्रतिपादन आयुक्त डॉक्टर सचिन ओम्बासे यांनी केले.



जुळे सोलापुरातील जानकी नगर गार्डन येथे महापालिका आणि लोकमंगल फाउंडेशन, हेरिटेज ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण आणि संवर्धन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून आयुक्त डॉ. ओम्बासे बोलत होते. या कार्यक्रमास आमदार सुभाष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आयुक्त डॉ. ओंम्बासे आणि आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते परिसरातील नागरिकांना वृक्षांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास पालिकेचे उपयुक्त तैमूर मुलाणी, जेष्ठ पत्रकार अभय दिवाणजी व परिसरातील नागरिक आणि पर्यावरण प्रेमी, भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना आयुक्त डॉ. ओम्बासे पुढे म्हणाले की, जुळे सोलापूर परिसर हिरवागार आहे. याचे संपूर्ण श्रेय आमदार सुभाष देशमुख आणि येथील नागरिकांना जाते. आमदार सुभाष देशमुख लोकमंगल फाउंडेशनच्या माध्यमातून आणि लोकसभागातून चांगले उपक्रम राबवतात. त्यावरून आमदार देशमुख हे पर्यावरण प्रेमी आहेत हे जाणवते.

आ. सुभाष देशमुख म्हणाले की, जुळे सोलापूर भागातील नागरिकांनी चांगल्याप्रकारे वृक्षारोपण आणि संवर्धन केले आहे. या भागात पाण्यासह अनेक समस्या आहेत. जुळे सोलापूर परिसर हा मोठा असल्यामुळे येथे स्वतंत्र बस स्थानकाची आवश्यकता आहे. तसेच या भागात अनेक संस्कृतिक प्रेमी राहत असल्यामुळे येथे एक नाट्यगृह करणे आवश्यक आहे. याबाबत पालिकेकडे अनेकदा मागणीही केली आहे. सध्याचे आयुक्त धडाडीचे आहेत, ते निश्चितच याबाबत लक्ष देऊन या मागण्या पूर्ण करतील. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिपाली कोठारी यांनी केले.

### स्मिता देशपांडे पहिल्या म्युझिक थेरपिस्ट



**सोलापूर :** येथील स्मिता देशपांडे यांनी 'हेल्थ सेक्टर स्किल कौन्सिल दिल्ली' अंतर्गत घेण्यात आलेल्या संगीतोपचार परीक्षेत ९६% गुण प्राप्त करून प्राविण्य मिळिवले. त्यापूर्वी अनाहत म्युझिक थेरपी संस्थेमधून म्युझिक थेरेपी मध्ये मास्टर आणि ॲडव्हान्स हे कोर्स ही पूर्ण केले.

यासर्व म्युझिक थेरपी अभ्यासा करिता अनाहत म्युझिक थेरपी संस्थेचे संस्थापक व प्रसिद्ध म्युझिक थेरपिस्ट श्री संतोष घाटपांडे यांचे अनमोल असे मार्गदर्शन लाभले. स्मिता देशपांडे यांना जिल्ह्यातील पहिल्या म्युझिक थेरपिस्ट होण्याचा बहुमान प्राप्त झाला.

# महापालिकेच्या कारवाई सत्तरफुटवरील भाजी विक्रेत्यांवर संक्रांत

▸▸ नियम व अटी घालून विक्रेत्यांना परवानगी द्या; कॉ.आडम मास्तरांचे पालकमंत्री गोरेंना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १७ जून-**

७० फुट रोड येथे विक्रेत्यांना नियम व अटी लागू करून वाहतुकीस अडथळा न होता परवानगीने व्यवसाय करण्याची मान्यता द्यावी. अतिक्रमण विभागाची कारवाई तत्काळ थांबवून विक्रेते, आयुक्त व संबंधित विभाग यांची संयुक्त बैठक घेऊन स्थायी तोडगा काढावा या मागणीचे निवेदन माकपचे माजी आ. नरसय्या आडम यांच्या नेतृत्वाखाली पालकमंत्री जयकुमार गोरे यांना देण्यात आले.



सोलापूर महापालिका प्रशासनाच्या अतिक्रमण विभागाने ७० फुट भाजी मंडई परिसरात सुरू केलेल्या कारवाईमुळे गेल्या अनेक दिवसांपासून भाजीपाला, फळे, व अन्य जीवनावश्यक वस्तूंची विक्री ठप्प झाली आहे. महानगरपालिका नियमांचे उल्लंघन झाल्याचे कारण पुढे करत प्रशासनाने या भागातील चारचाकी फेरीवाले, फळ विक्रेते आणि हातगाडीधारकांविरुद्ध जप्ती केली. पोलिस बंदोबस्तात प्रतिबंधात्मक कारवाई सुरू ठेवली आहे. दरम्यान, प्रशासनाच्या कारवाईचा निषेध करत विक्रेत्यांनी आपल्या कुटुंबांसह मोर्चा काढून मनपा आयुक्त कार्यालयावर धडक दिली. शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे आयुक्तांना आपली कैफियत सांगितली, परंतु कोणताही ठोस निर्णय न घेतल्यामुळे विक्रेत्यांमध्ये संताप आहे. परिस्थिती गंभीर होत असल्याने विक्रेत्यांचे शिष्टमंडळने (दि.१६) जून रोजी रात्री १०:३० वाजता सोलापूर रेल्वे स्थानकावर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना सत्तर फूट येथे भाजी विक्री करण्याची मागणी माजी आमदार आडम मास्तर यांनी निवेदनाद्वारे केली. सदरचे निवेदन स्विकारल्यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या प्रकरणात सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही दिली असून, लवकरच संबंधित विभागांशी चर्चा करून तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासह खाजा करजगी, रुक्मिणी कवळे, गणेश वाघमारे, चांद शेख, जाफर शेख, सादिक बागवान, मल्लय्या खरात, रियाज पठाण, बबलू बागवान आदींसह भाजी विक्रेते उपस्थित होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्रीकाशी महापीठ राष्ट्रीय परीक्षेच्या पारितोषिकांचे शुक्रवारी वितरण

### वीरभद्रप्पा आण्णाराव कुर्ले श्रावणबाळ पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. १७ जून-**

श्रीकाशी जगद्गुरु विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्यावतीने एप्रिल २०२५ मध्ये घेतलेल्या वीरशैव सिद्धान्त परीक्षेचे पारितोषिक वितरण समारंभ श्री काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते शुक्रवार दि. २० जून रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे, अशी माहिती राजेंद्र बलसुरे आणि सिद्धय्या स्वामी हिरेमठ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्री ब्रहन्मठ होटगी, चन्नवीर नगर अक्कलकोट रोड येथील श्री वीरतपस्वी ध्यानमंदिर येथे हा कार्यक्रम होणार आहे. अध्यक्षस्थानी दहिवडकर मठाचे श्री ष. ब्र. गुरुसिद्ध मणिकंठ शिवाचार्य स्वामीजी आहेत. प्रमुख अतिथी म्हणून भारतीय माजी सैनिक संघाचे महाराष्ट्राचे वरिष्ठ उपाध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय स्तरावर घेतलेल्या वीरशैव सिद्धान्त प्रबोध आणि प्रवीण परीक्षेचे पारितोषिक वितरण होणार आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश या राज्यातील केंद्र संचालकांचा सन्मान सोहळा होणार आहे. या समारंभात वीरभद्रप्पा आण्णाराव कुर्ले श्रावणबाळ पुरस्काराचे वितरण होणार आहे. यावर्षीचा पुरस्कार राजेश्वर लिगाडे पंढरपूर यांना जाहीर झाला आहे. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. अनिल सर्जे, डॉ. शैलेश पाटील, रेवणसिद्ध वाडकर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस बाबूराव मैंदर्गीकर, गुरुशांत रामपुरे, प्राचार्य विद्यानंद स्वामी सिद्रामय्या हिरेमठ, चिदानंद मुस्तारे, सचिन विभुते, राजेंद्र व्हलसुरे आदी उपस्थित होते.



## शाळेचा पहिला दिवस...



### मेहता माध्यमिक शाळा

कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रवेशोत्सव उत्साहात पार पडला. यावेळी फुलांच्या पाकळ्यांची उधळण करण्यात आली. ढोल ताशाच्या गजरात फुलांच्या-पायघड्यांवरुन शाळेची घंटा वाजवत विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश केला. स्वागतासाठी रंगीबेरंगी कार्टून्स, फुलांची सजावट आणि स्वागत गीतांनी वातावरण आनंददायी झाले होते. माजी पालक अरविंद म्हेत्रे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक कापडी पिशव्या देऊन स्वागत केले. मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी व शिक्षिकांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत केले. कार्यक्रमाप्रसंगी पालिकांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या सेवाज्येष्ठ शिक्षिका मीनाक्षी भाटवडेकर, शिक्षक -शिक्षकेतर वृंद उपस्थित होते.



### नागेश करजगी ऑर्किड स्कूल

नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये 'विद्यारंभ दिन' उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा वर्षा विभूते, विश्वस्त नंदिनी करजगी, मोहिनी करजगी, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, कॉलेजच्या प्राचार्या स्मिता कुलकर्णी, धनेश कडते, गणेश पोतदार, कुंभार, चंद्रकांत निंगफोडे, महादेव मंगरुळे व महादेव पाटील उपस्थित होते. सर्वप्रथम विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबपुष्प देऊन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कै. नागेश करजगी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. पुष्पा ढवळे यांनी शाळेबद्दल माहिती दिली. सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका प्रज्ञा वट्टे व दिपाली नरगिडे यांनी केले.



### निर्मलाताई ठोकळ प्रशाला

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव कार्यक्रम मंगलमय वातावरणात झाला. विद्यार्थ्यांचे औक्षण करून, गुलाबपाकळ्यांची उधळण करत स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वारासमोर रंगीबेरंगी फुग्यांची आकर्षक कमान उभारण्यात आली होती. संस्थेच्या संचालिका शिल्पा ठोकळ अध्यक्षस्थानी होत्या. मुख्य अतिथी न्यायाधीश सुवर्णा कोकरे, शिक्षणाधिकारी योजना सुलभा वटारे, राष्ट्रवादी अजितदादा गट राज्य उपप्रदेशाध्यक्ष किसन जाधव, पोलीस निरीक्षक विजापूर नाका सुशांत वराळे, भिकाजी गाजरे, औदप्पा पुजारी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन चव्हाण पी. एच. यांनी तर आभार प्रदर्शन पवार यु. एस. यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्य डी.डी. गाजरे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल निर्मलाताई ठोकळ, अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे यांनी अभिनंदन केले.

# फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन अल्पवयीन मुलीवर अत्याचार



## ● तरूणास मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा तर मदत करणाऱ्यास तीन वर्षे सशक्त कारावासाची शिक्षा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ जून -**

सोशल मिडीयावरून अल्पवयीन मुलीशी ओळख वाढवून तिला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर वारंवार अत्याचार करणाऱ्या तरूणास अतिरिक्त सत्र न्यायाधीश सुरज केंद्रे यांनी मरेपर्यंत जन्मठेप आणि १७ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तसेच पिडीतेला पळवून नेण्यासाठी मदत करणाऱ्यालादेखील न्यायालयाने तीन वर्षे सशक्त कारावास व ४ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

रोहित उर्फ रोहन मारूती बनसोडे (वय २४, रा. बापूजी नगर, जय भारत शाळा, स्लॉटर हाऊस झोपडपट्टी, अलकुंटे चौक, सोलापूर) असे म रेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. तर रोहित याचा साथीदार सुमित शशिकांत काटकर (वय १९, रा. राजस्व नगर, विजापूर रोड, सोलापूर) यासदेखील न्यायालयाने तीन वर्षे सशक्त कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

यातील पिडीत अल्पवयीन मुलगी ही सन २०२० मध्ये कॉलेजमध्ये शिकत असताना एकाठिकाणी शिकवणीसाठी जात होती. त्यावेळी तिच्या एका मैत्रिणीने तिला मोबाईलवरील इंन्स्टाग्राम या सोशल मिडीया ॲपवर तिचे अकौंट काढून दिले. पिडीता ही इंन्स्टाग्राम ॲप वापरत असताना रोहित बनसोडे याने पिडीतेशी इंन्स्टाग्रामवर ओळख वाढवून तिला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर पिडीता व



रोहित बनसोडे



सुमित काटकर

रोहित हे दोघे एका ठिकाणी भेटल्यानंतर रोहितने पिडीतेला त्याच्या आईला भेटायला जाऊ असे सांगून त्याच्या दुचाकीवरून हैद्राबाद रोडवरील एका लॉजवर नेले. त्याठिकाणी पिडीतेवर जबरदस्तीने शरीरसंबंध केले. त्यानंतर रोहित याने पिडीतेला तिचे व्हिडीओ शुटींग व फोटो काढल्याचे सागूंन ते व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर वारंवार अत्याचार केला. त्यानंतरही रोहित याने पिडीतेला वारंवार वेगवेगळ्या प्रकारे त्रास देऊन तिचा छळ करून तिच्याकडील पैसे, सोन्याचे दागिने घेऊन गेला. त्यानंतर १६ मे २०२१ रोजी रोहित याने आपला मित्र सुमित काटकर याच्या मदतीने पिडीतेला दुचाकीवरून पळवून नेले होते. तसेच पिडीतेने दुचाकीवर बसण्यासाठी नकार दिल्याने तिला दोघांनी मारहाणही केली होती.

पिडीतेच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिस निरीक्षक वाय एस गायकवाड यांनी तपास करून पिडीतेला शोधून काढून रोहित बनसोडे, सुमित काटकर यास अटक केली. पोलिसांनी केलेल्या तपासामध्ये पिडीतेवर अत्याचार झाल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्ह्यांमध्ये पोक्सो, बलात्काराचे कलम वाढविण्यात आले. पोलिसांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र पाठवून दिले.

या खटल्याची सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश केंद्रे यांच्यासमोर झाली. या खटल्यात सरकार पक्षातर्फे १५ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये आरोपीने पिडीतेवर फक्त शारीरीक अत्याचार केले नाही तर अनेकवेळा मारहाण करून तिला भावनिक ब्लॅकमेल केल्याचे सरकारी पक्षाने सिध्द केले. साक्षीदारांच्या साक्षी, पिडीतेची साक्ष, पुरावा आणि सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायाधीश केंद्रे यांनी आरोपी रोहित बनसोडे यास मरेपर्यंत जन्मठेप व सुमिक काटकर यास ३ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

याप्रकरणी सरकारतर्फे ॲड. शितल डोके यांनी तर आरोपीतर्फे ॲड. ईस्माईल शेख, ॲड. पी जी देशमुख यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून महिला पोलिस कर्मचारी घाडगे आणि ए. एम. काळे यांनी मदत केली.

### ● रोहित बनसोडेला या कलमाखाली झाली शिक्षा...

- अल्पवयीन बालकास पळवून नेणे (आयपीसी ३६३) - ३ वर्ष, १ हजार रुपये दंड
- वारंवार बलात्कार (आयपीसी ३७६(२) - मरेपर्यंत जन्मठेप, १० हजार रुपये दंड.
- घरात घुसून मारहाण अत्याचार (आयपीसी ४५२) - ७ वर्ष, १ हजार रुपये दंड.
- अपमान करून शांतता भंग (आयपीसी ५०४) - २ वर्ष, १ हजार रुपये दंड.
- गुन्हेगारी धमकी (आयपीसी ५०६) - २ वर्ष, १ हजार रुपये दंड.
- मारहाण (आयपीसी ३२३) - १ वर्ष, १ हजार रुपये दंड
- पोक्सो - ७ वर्ष, १ हजार रुपये दंड.
- ११ आणि १२ - ३ वर्ष, १ हजार रुपये दंड.



### ● सुमित काटकरला या कलमाखाली झाली शिक्षा...

- अल्पवयीन बालकास पळवून नेणे (आयपीसी ३६३) - ३ वर्ष, १ हजार रुपये दंड.
- मारहाण (आयपीसी ३२३) - १ वर्ष, १ हजार रुपये दंड.
- अपमान करून शांतता भंग (आयपीसी ५०४) - २ वर्ष, १ हजार रुपये दंड.
- गुन्हेगारी धमकी (आयपीसी ५०६) - २ वर्ष, १ हजार रुपये दंड.

## सोलापुरात उड्डाणपुलांचे काम लवकरच सुरू होईल

● पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे स्पष्टीकरण
● दोन्ही रेल्वे पुलासंदर्भात कार्यवाहीचे आदेश देणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ जून-**

शहरातील वैभवात भर टाकणाऱ्या नियोजित उड्डाणपूलांचा मार्ग आता मोकळा झाला आहे. लवकरच प्रत्यक्षात या उड्डाणपूलांचे काम सुरू झाल्याचे सर्वांना दिसेल, असे स्पष्टीकरण पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पत्रकारांशी बोलताना दिले. एका कार्यक्रमानिमित्त सोलापुरात आल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना पालकमंत्री गोरे यांनी ही माहिती दिली.



सोलापूर शहरामध्ये विमानसेवा सुरू झाली आहे. तो प्रश्न आता मार्गी लागला आहे. सोलापूर शहरांमध्ये उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीचाही विषय मार्गी लागला आहे. आता शहरातील उड्डाणपुलाचा मार्ग मोकळा झाला आहे. लवकरच प्रत्यक्षात या उड्डाणपुलचे काम सुरू झाल्याचे सर्वांना दिसून येईल. या शहराच्या दृष्टीने ज्या गोष्टी आवश्यक आहेत, त्या सर्व केल्या जातील. त्यात कोणतीही अडचण नाही, असेही पालकमंत्री जयकुम ार गोरे यांनी सांगितले. सोलापूर शहरात मरीआई चौकानजीक रेल्वे पूल जुना झाला आहे. त्याचबरोबर कल्याण नगर येथीलही रेल्वे पुलाचे काम होणार आहे. या दोन्ही रेल्वे पुलासंदर्भात विचारले असता पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले, दोन्हीही रेल्वे पुलासंदर्भात माहिती घेऊन तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.




### सोलापूर शहरातून दोन दुचाकींची चोरी

**सोलापूर, दि. १७ जून-**

काजल श्रीमंत व्हनसुरे (वय ३२, रा. विराट नगर, जुळे सोलापूर) यांनी त्यांची एमएच १२ एचके ३४९४ क्रमांकाची दुचाकी ही १५ सप्टेंबर २०२४ रोजी ७० फुट रोडवर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिसात करण्यात आली आहे.

हवालदार गंगावणे तपास करीत आहेत. दुसऱ्या घटनेत राजकुमार सुरेश उळेकर (वय४०, रा. दोड्डी, ता. दक्षिण सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ डीके ६५४० क्रमांकाची २५ हजार रुपये किंमतीची दुचाकी ही ८ जून रोजी मल्लिकार्जुन नगर येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नों एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार उबाळे पुढील तपास करीत आहेत.

## अकरावी प्रवेशापासून वंचित विद्यार्थ्यांना मिळणार संधी

● संस्थांचा कोटा प्रवेश मुदत संपली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

अनेक तांत्रिक अडचणीनंतर अकरावी प्रवेशप्रक्रीया सुरू झाली असून पहिल्या टप्प्यात संस्था कोट्यातील प्रवेशप्रक्रिया मुदत सोमवार १६ जून रोजी संपली आहे. त्यामुळे आता मेरीटनुसार विद्यार्थ्यांची प्रवेशप्रक्रिया सूरू होणार आहे. शिवाय रिक्त जागांनुसार प्रवेशापासून वचित विद्यार्थ्यांना संधी मिळणार आहे.



दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी यंदा प्रथमच ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया राबविण्यात आली. सुरूवातीस प्रवेश अर्ज भरताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणी आल्या होत्या. त्यानंतर अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर १२ जून ते १६ जूनदरम्यान पहिल्या टप्प्यात संस्था अधिकारातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. त्यानंतर मेरीटनुसार कॅपमधील प्रवेश सुरू होणार आहे. संस्थाअंतर्गत प्रवेशाची मुदत संपल्यामुळे मेरीटच्या विद्यार्थ्यांना आवडीनुसार शाळा व महाविद्यालय मिळाल्यानंतर प्रवेश निश्चिती होणार आहे.

शिवाय १२ हजार विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेपासूस वंचित असल्याने त्यांनाही प्रवेशासाठी अर्ज करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. याशिवाय एटीकेटी विद्यार्थ्यांनाही प्रवेश मिळणार असल्याने त्या विद्यार्थ्यांचीही लगबग सुरू झाली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## ज्ञानामृत आनंदलहरी - ११५०

**म्हणऊनि सामान्य गा नोहे । हें सांगतां वडिल गोठी गा आहे ।**
**परी ते बोलों येईल पाहें । आतां प्रस्तुत ऐकें ।।**

योगी कोणाला म्हणावे, योगामार्ग कसा असतो, याचे सविस्तर मार्गदर्शन भगवंतांनी अर्जुनाला केले. योगी आपणाला किती प्रिय आहे व तो माझ्यापासून वेगळा कसा नाही हे सांगतांना भगवान म्हणाले की, अर्जुना योगी माझा देह आणि मी त्याचा आत्मा होय. हा सर्व संवाद संजय राजा धृतराष्ट्राला सांगत आहे. वरचेवर नविन विषय जाणून घेण्याची अर्जुनाची जिज्ञासा पाहून श्रीकृष्णांना आनंद वाटला. आता अर्जुनाला ज्ञान म्हणजे नेकमे काय ते जाणून घेण्याची इच्छा झाली आहे. म्हणून श्रीकृष्ण परमात्मा आता ज्ञान, विज्ञान, अज्ञानाचे स्पष्टीकरण करु लागले आहेत. जेथे बुध्दीचा प्रवेश होत नाही आणि विचार जेथून मागे फिरतो आणि ज्याच्या संबंधाने तर्काचे चातुर्य चालत नाही, त्याला ज्ञान हे नांव आहे. या पेक्षा वेगळा जो प्रपंच असतो ते विज्ञान होय. आणि अशा प्रपंचास खरे मानणे हे अज्ञान होय. अर्जुना, तुझे अज्ञान लोपून जावे, विज्ञान संपूर्णपणे करपून जावे आणि तू केवळ ज्ञानसंपन्न होऊन राहावे असे मला वाटते. तुला एकदा ज्ञान प्राप्त झाले की, हा लहान, हा मोठा असा भेद दिसणारच नाही. अर्जुनाने सर्वत्र सम पाहावे असे भगवंतांना वाटते. त्याला लहान, मोठा, गरीब, श्रीमंत, आपला, परका असे कांही न दिसता सर्व समान दिसावीत. त्याचबरोबर तो चालते बोलते समतेचे व्यासपीठच व्हावा, असेही भगवंतांना वाटते. सदगुरुला आपल्या शिष्याबद्यल किती आत्मीक कळवळा असतो हे श्रीकृष्ण परमात्म्याचे अर्जुनाबद्यलचे विचार जाणुन घेतल्या नंतर लक्षात येते. आज सर्वत्र विविध मुदयावरुन विषयमतेचे विष फोफावले जात असल्याचे आपण पाहातो. या विषावर समतेचे अमृत फवारण्याचे कार्य आपणा सर्वांना करावे लागणार आहे, हे या प्रसंगी आपणाला लक्षात ठेवावे लागेल.



ज्ञान हा अत्यंत आवश्यक असणारा भाग असला तरीही त्याचा ध्यास घेणा-यांची संख्या कमी असते. विशेष म्हणजे ध्यास घेणा-यामध्ये खरा जाणता हा विरळाच असतो. देशात कोटयावधी लोक आहेत. या कोटयावधी मधून निवडून मोजक्यांची सैन्यात भरती केली जाते. या मोजक्या सैन्यामध्ये रणांगणावर शत्रुंच्या शस्त्राने शरीराचा चेंदामेंदा झाला तरीही धैर्याने मरणाला सामोरा जाणारे मोजकेच धैर्यवान असतात. त्याप्रमाणे ब्रम्हज्ञानाच्या आस्थारुपी महापुरात कोटयावधी लोक प्रवेश करतात, परंतु ब्रम्हप्राप्तीच्या पैलतीराला पोहून निघणारा एखादाच असतो. अर्थात, ज्ञान प्राप्त करुन घेणे किती अवघड गोष्ट आहे हे सांगतांना भगवंत म्हणाले,

**म्हणऊनि सामान्य गा नोहे । हें सांगतां वडिल गोठी गा आहे ।**
**परी ते बोलों येईल पाहें । आतां प्रस्तुत ऐकें ।।**

अर्थात, ज्ञान प्राप्त होणे किंवा करुन घेणे ही साधी गोष्ट नाही. ज्ञान सांगणे सुध्दा गहन व कठिण काम आहे. तरी पण अर्जुना तुझी लालसा, जिज्ञासा, पाहून मी हे कठीण कार्य करणार आहे. आज सर्वांनी ज्ञानी होण्याची नितांत गरज आहे. ज्ञानवंत होऊन जगणे हे जीवनाचे धेय्यच असावे. जिथुन जेवढे ज्ञान मिळविता येईल तेवढे मिळविण्याचा प्रयत्न माणसाने करायला हवा. ज्ञान मिळविण्यासाठी काळ, वेळ, वय, लिंग याचा संबंध नसतो. म्हणून माझ्याकडे हे नाही, ते नाही किंवा मी हा नाही, तो नाही असे कांही कारण न दाखविता आपण आहे त्या परिस्थितीत सतत ज्ञान मिळविण्याचा सकारात्मक प्रयत्न करावा. अशी आजच्या ओवीच्या अनुषंगाने अपेक्षा.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. १८ जून २०२५ | संत तुकाराम महाराज पालखी |
| विक्रम संवत् २०८१ | प्रस्थान देहू जि. पुणे, कालाष्टमी |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - ज्येष्ठ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. सप्तमी (१३.३४) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पू.भाद्रपदा (२४.२२) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - प्रीति (०७.३९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (२४.४८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अंगिकृत कार्यात मनासारखी प्रगती साधता येईल. आर्थिक गुंतवणूक योग्य प्रकारे करावी. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे.

**वृषभ :** उत्साहवर्धक घटना घडतील. गृहसजावट, गृहबांधणी अशा व्यवसायात मनासारखी प्रगती होईल.

**मिथुन:** कितीही योजना करा, वेळेला जे हवे आहे तेच होत असते. धनस्थ मंगळा मुळे आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे.

**कर्क:** घाईने निर्णय नको रूप आणि रूपया यावर कधीच गर्व नाही करायचा. गरीबी, आजार कधीच सांगून येत नाही.

**सिंह :** नवीन योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. डोळ्याच्या तक्रारी संभवतात. काळजी घ्यावी.

**कन्या :** वैद्यकिय, कृषि क्षेत्रात मनासारखी प्रगती होत जाईल. कौटुंबिक जीवनातील समस्या विचाराने, सामंजस्याने सोडवाव्यात.

**तुळ :** आत्मविश्वास वाढविणाऱ्या घटना घडतील. कला-गुणांच्या प्रगतीसाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे. नव्या संधीचे स्वागत करावे.

**वृश्चिक :** कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या योजना विशेष लाभदायक ठरतील.

**धनु :** कार्यक्षेत्रात अधिक विचाराने रहावे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. स्थावर बाबतीत शुभ घटना घडतील.

**मकर :** नव्या योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात कला-गुणांचा विकास होत जाईल. जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहिल.

**कुंभ :** उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. अपेक्षित संधी लाभतील.

**मीन:** व्यवसायात विचाराने रहावे. सरकारी कामे करून घ्यावीत. यश मिळेल. नव्या विचारांना चालना मिळेल.

# राज्यात ‘वाचन साखळी’ कार्यान्वित

**आठ जिल्ह्यात पाचशे मुलांचा सहभाग**

**बालक-पालक फाउंडेशनचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा । श्याम जोशी**
**सोलापूर, दि.१७ जून-**

गेल्या चार वर्षापासून राबवण्यात येत असलेल्या पुणे येथील बालक-पालक फाऊंडेशनच्या वाचन साखळी उपक्रमाची यंदाची सुरवात १६ जून रोजी झाली. ऑनलाइन नावनोंदणी केलेल्या सोलापूरसह आठ जिल्ह्यांतील विविध तालुक्यातील चौथी ते सातवीतील निवडक लाभार्थ्यांना प्रत्येकी चार पुस्तकांचा संच पोस्टाद्वारे पाठवून झाली. या उपक्रमाचे यंदाचे हे चौथे वर्ष असल्याची माहिती फाऊंडेशनचे अध्यक्ष विनायक जोशी यांनी ‘दै. तरूण भारत’ ला दिली.

बालक-पालक फाउंडेशनच्या माध्यमातून ही योजना महाराष्ट्रातील ग्रामीण व निमशहरी भागांतील मुलांसाठी राबवण्यात येते. शैक्षणिक सत्र सुरू होण्याच्या निमित्ताने याची सुरुवात (१६ जून) आज झाली. ऑनलाइन नावनोंदणी केलेल्या




सोलापूर, सातारा, धाराशिव, पुणे, रत्नागिरी, नाशिक, अमरावती, अहिल्यानगर जिल्ह्यांतील विविध तालुक्यातील चौथी ते सातवीतील प्रातिनिधिक निवडक पंचवीस लाभार्थ्यांना चार पुस्तकांचा संच त्यांचे हाताने नाव, पत्ता लिहून पोस्टाने रवाना झाला. त्यांना ट्रॅकिंग आयडी ही पाठवण्यात आला. नवी कोरी ज्ञानवर्धक मराठी वाचनीय छोटी, चित्रमय पुस्तके, त्याचा तो सुगंध, स्पर्श, सहवास हळूहळू मुलांना वाचनाकडे नेईल. वर्षभर एकमेकांना ही पुस्तके देऊन त्याची ते आपली स्वतःची एक 'वाचन साखळी' बनवतील. महाराष्ट्रातील ग्रामीण भागांतील सुमारे पाचशे मुलांना या वर्षभरात लाभ देण्याचा संकल्प फाउंडेशनने सोडला असून, व्यक्तिगत व संस्थात्मक देणगीदारांच्या मदतीतून प्रकल्प सुरू आहे. हे चौथे वर्ष असून योजना पूर्णपणे विनामूल्य आहे. एखाद्या पुस्तकाचे वाचन, तेही पुस्तक स्वतः हातात घेऊन. वाचताना पानांवरून फिरणारी ती नजर. ओळींवरून पुढे सरकणारी बोटं. पान उलटतानाची ती हळुवारता, महत्त्वाचा किंवा थोडा अवघड किंवा खूप भावलेलला मजकूर, कधी शिस पेन्सिलीने चौकटबंद करणे. हा 'वाचनानंद' संस्कारक्षम वयात म्हणजे अगदी चौथीपासूनच मुलांना प्रयत्नपूर्वक दिला तर ! यात त्यांच्या पालकांनाही सहभागी करून घेतले तर !! नक्कीच सर्वांचा अनावश्यक स्क्रीन टाइम कमी होईल. 'वाचन साखळी' ही योजना याचसाठी आहे. अधिक माहितीसाठी : ८८५६८६२७११

> **यंदाची थीम**
>
> 'मस्तक घडवते पुस्तक' हा धागा पकडून मुलांना यंदा पुस्तकांची निवड केली जाणार आहे. विचार करायला प्रवृत्त करणारी, कल्पनाशक्तीला चालना देणारी पुस्तके संचात असतील. मागील वर्षी 'वाचतांना वेचू या.. वेचलेले वाटू या' ही थीम होती.

# यशस्वी उद्योगासाठी इच्छाशक्ती आणि मेहनतीची गरज : देशपांडे




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून -**

स्वावलंबी व्यक्तीला उद्योगाच्या संधी सहज उपलब्ध होतात, एखादा उद्योग यशस्वी करण्यासाठी इच्छाशक्ती, मेहनत, धाडसी वृत्ती, नवीन तंत्रज्ञान आणि विश्वासार्हता या पंचसूत्रीवर काम करणे गरजेचे आहे. तरच उद्योग यशस्वी होतो असे प्रतिपादन सेवाभारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सहसचिव प्रवीण देशपांडे यांनी केले.

सेवाभारती सोलापूर जिल्ह्याच्या वतीने स्वावलंबन आयामा अंतर्गत गरजू तिघांना रोजगारासाठी फळबाजी विक्री करण्यासाठी तीन चारचाकी गाड्यांचे वितरण करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक सतीश मालू हे होते. यावेळी व्यासपीठावर सेवाभारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सहसचिव अविनाश नाईक, प्रांताच्या स्वावलंबन आयाम प्रमुख पद्माताई कुबेर, सोलापूर सेवाभारतीचे अध्यक्ष राजेश पवार, सचिव बाबूलाल वर्मा उपस्थित होते. यावेळी उद्योजक सतीश मालू म्हणाले, 'रोजगार उपलब्ध झाल्याने व्यक्ती आर्थिक दृष्ट्या सक्षम होते, लोकांना स्वावलंबी बनवण्यासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. हे सामाजिक दायित्व सोलापूर सेवाभारतीने यशस्वीरित्या पार पाडले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सचिव बाबुलाल वर्मा यांनी तर सूत्रसंचालन आणि आभार जिल्हा सहसचिव रंगनाथ जोशी यांनी केले.

# बीबीदारफळ येथे औषध प्राशन केल्याने तरुण अत्यवस्थ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ येथे तरुणाने अज्ञात कारणातून कोणते तरी औषध प्राशन केले. यानंतर तरुणाला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले, परंतु तो अर्धशुध्दीवर असल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. संतोष हरीशचंद्र जाधव (वय ३८) असे तरुणाचे नाव आहे. संतोष हा कामानिमित्त पुणे येथे असतो. तो काही दिवसांपूर्वी कामानिमित्त उत्तर सोलापूर तालुक्यातील मुळे गावी म्हणजेच बीबीदारफळ येथे आला होता. दरम्यान सोमवारी दुपारी १२.१५ वाजता त्याने राहत्या घरी असताना, अज्ञात कारणातून कोणतेतरी औषध प्राशन केले. त्यात त्रास होऊ लागल्याने त्याला सासरा नानसाहेब अलकुंटे याने उपचारास दाखल केले. परंतु तो अर्धशुध्दीवर असल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# कंदलगावात गावडेवाडीच्या तरुणाला मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील गावडेवाडी येथील तरुणाला अज्ञात कारणातून कंदलगाव येथील पेट्रोल पंपाजवळ पाच जणांनी लाथाबुक्यांनी तसेच पट्याने मारहाण करून जखमी केले. अमोगसिध्द सुरेश गावडे (वय ३०, रा. गावडेवाडी ता. द. सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. शनिवारी दुपारी चारच्या सुमारास अमोगसिध्द हा कंदगाव येथील पेट्रोल पंप येथून जात होता. त्यावेळी त्याला संजू करपे व इतर तीन जणांनी



अज्ञात कारणातून लाथाबुक्यांनी तसेच पट्याने मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने मंद्रुप येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून सोमवार दुपारी १.३० वाजता तो स्वत; शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# अज्ञात दुचाकीच्या धडकेत तिघे जखमी

**सोलापूर, दि. १७ जून-**

सिव्हील हॉस्पीटल ते रंगभवनच्या दिशेने दुचाकीवरून जाताना सिव्हील चौकात पाठीमागून आलेल्या अज्ञात दुचाकी स्वाराने धडक दिली. यात तिघेजण जखमी झाले. हा अपघात रविवारी सायंकाळच्या सुमारास घडला. वसंत मच्छिद्र भगरे (वय ३५) प्रतिक्षा वसंत भगरे (वय १२) व गौरी सुनील भगरे (वय१४, तिघे रा. देशमुख पाटील वस्ती, देगाव सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. रविवारी सायंकाळच्या सुमारास वसंत व इतर दोघे असे दुचाकीवरून सिव्हील हॉस्पीटल येथून रंगभवनच्या दिशेने दुचाकीवरून जात होते. ते सिव्हील चौकात आल्यानंतर पाठीमागून आलेल्या अज्ञात दुचाकीस्वाराने धडक दिली. यात वसंतच्या डोक्याला तर प्रतिक्षा आणि गौरीच्या गुडघ्याला आणि हाताला मार लागला. तसेच तिघांना सर्वांगास मार लागल्याने रात्री ७.४५ वाजता आई यशोद यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# २४९ बदली, रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी सकारात्मक भूमिका घेणार

**गोविंद राज यांचे आश्वासन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून -**

महापालिकेतील २४९ बदली रोजंदारी कर्मचारी व १५ वाहन चालक यांना सेवेत कायम करण्यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे आश्वासन नगर विकास खात्याचे सचिव गोविंद राज यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्ती सुमित वजाळे यांच्यामार्फत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियन पदाधिकाऱ्यांनी नगर विकास खात्याचे सचिव गोविंदराज यांची भेट घेऊन चर्चा केली. सोम पा मधील २४९ बदली रोजंदारी कर्मचारी व १५ वाहन चालक यांना सेवेत कायम करण्यासंदर्भात मागणी केली. गेल्या २५ वर्षापासून प्रामाणिकपणे साफसफाई करणाऱ्या या कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे केली. यावेळी नगर विकास खात्याचे सचिव गोविंदराज यांनी या संदर्भात सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी ट्रेड युनियनचे अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले, खजिनदार अरुण मेत्रे, पिंटू जेटीथोर, लक्ष्मण मुरटे, नरेश कदम उपस्थित होते.

# ‘विद्यानिकेतन’मध्ये शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

विद्यानिकेतन हायस्कूलमध्ये शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थचे अध्यक्ष बापूसाहेब ढगे व सचिव विजय पुकाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना मिकी माऊसने हस्तांदोलन केले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. शिक्षिका राजगे यांनी देशभक्तीपर व स्वगात गीत गाऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी शशीकला नवले, शोभा कटारे यांनी विद्यार्थ्यांचे औक्षण केले. विज्ञानप्रमुख विद्याधर रंगदळ यांनी पर्यावरणाचे महत्त्व सांगितले. रुपादेवी राजगे, प्रतिभा पुजारी यांनी विद्यार्थ्यांचा परिपाठ घेतला. क्रीडा प्रमुख राजशेखर नाटीकर यांनी विद्यार्थ्यांना शिस्तीची शपथ दिली.




# भारतीय जैन संघटना महिला विभागातर्फे पितृदिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून -**

भारतीय जैन संघटनेच्या महिलांनी वृद्धाश्रमात जाऊन आगळ्या वेगळ्या पद्धतीने पितृदिन साजरा केला. भारतीय जैन संघटनेच्या पायाभरणी कार्यक्रम ंच्या मालिकेतील 'पितृ पर्व' हा सातवा पायाभरणी कार्यक्रम आहे.

याच शृंखलेत १५ जून रोजी आधार केअर सेंटर, भोगाव येथील वृद्धाश्रमात भारतीय जैन संघटना जिल्हा महिला विभाग सोलापूरच्या वतीने पितृ दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात नवकार महामंत्राने झाली. संघटनेच्या महिलांनी वृद्धाश्रमात जाऊन तिथे उपस्थित सर्व वडिलांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. प्राध्यापक धन्यकुमार बिराजदार यांनी वृद्धाश्रमात राहणाऱ्या वृद्धांशी भावनिक संवाद साधला. यावेळी महिला विभागाच्या वतीने खाऊ व दैनंदिन उपयुक्त वस्तू देऊन त्यांचा प्रती आदर व्यक्त करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष केतन शहा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास विभागीय अध्यक्षा माया पाटील, जिल्हाध्यक्षा प्रविणा सोळंकी, उपाध्यक्ष संतोष लुणावत, निर्मला मेहता, वैशाली शहा, वर्षा जैन, मृणाल जबडे व इतर कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाध्यक्षा प्रविणा सोळंकी यांनी केले. सूत्रसंचालन निर्मला मेहता आणि आभार प्रविणा सोलंकी यांनी मानले.

# विद्यापीठाचे विद्यार्थी राजभवनमध्ये सादर करणार सांस्कृतिक कार्यक्रम

**राज्यपालांच्या उपस्थित होणाऱ्या कार्यक्रमासाठी खास निमंत्रण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरला २० जून रोजी सकाळी ११ वा राजभवन, मुंबई येथे एक तासाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी खास निमंत्रित करण्यात आले आहे.

देशातील विविध राज्यांचे स्थापना दिवस राजभवनात साजरे केले जातात. त्यासाठी राज्यातील नामांकित विद्यापीठांच्या विद्यार्थी विकास विभागाच्या संघाला निमंत्रित केले जाते. सोलापूर विद्यापीठाला विद्यापीठ स्थापनेपासून पहिल्यांदाच निमंत्रित करण्यात आले आहे. मागील तीन वर्षात आंतरमहाविद्यालयीन ते राष्ट्रीय युवा महोत्सवात विद्यार्थी विकास विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाची दखल राजभवनाने घेतली आहे. गेल्या तीन वर्षात विविध कला स्पर्धेत विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी देदीप्यमान कामगिरी केली आहे. त्यामुळेच हा कार्यक्रम करण्याची संधी विद्यापीठाला मिळाली आहे.

राज्यपाल, विद्यापीठाचे कुलगुरू आणि राजभवनातील अधिकारी-कर्मचारी यांच्या उपस्थितीत हा एक तासाचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या दिवशी पश्चिम बंगालचा स्थापना दिवस आहे. त्याम ुळे एक तासाच्या कार्यक्रमातून पश्चिम बंगालची संस्कृती विविध कलाप्रकाराच्या माध्यमातून साजरी केली जाणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, डॉ. प्रभाकर कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तयारी सुरू आहे. विद्यार्थी कलावंत, साथीदार, प्रशिक्षक, शिक्षक, कर्मचारी असा ४५ लोकांचा संघ राजभवन येथे जाणार आहे. संघाचे सादरीकरण उत्तम व्हावे, यासाठी गेल्या दहा दिवसापासून कसून सराव सुरू आहे.



> **विद्यापीठाला पहिल्यांदाच हा मान**
>
> शुक्रवार २० जून २०२५ रोजी राजभवन मध्ये महामहिम राज्यपाल महोदयांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी विद्यापीठात खास निमंत्रण आले आहे. त्यानुसार विद्यापीठाचे विद्यार्थी कलावंत तयारी करीत आहेत. विद्यापीठाला पहिल्यांदाच हा मान मिळाला आहे. याचा निश्चितच मनस्वी आनंद झाला आहे. एक चांगल्या सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी आम्ही राजभवनला देऊ.
>
> **-डॉ. प्रकाश महानवर, कुलगुरू**

> **कार्यक्रमाची तयारी सुरू**
>
> राजभवन येथे आपले विद्यार्थी पहिल्यांदाच कलासादरीकरण करत आहेत, याचा मला प्रमुख म्हणून मनस्वी आनंद आहे. आपण इतर विद्यापीठाच्या तुलनेत कुठेही कमी नाही, हे गेल्या काही वर्षात युवा महोत्सवातून मुलांनी देश पातळीवर सिध्द केले आहे.२० तारखेला होणाऱ्या कार्यक्रमाची चांगली तयारी सुरू आहे. यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी मुलांना देण्याचा प्रयत्न केला आहे.त्यामुळे हा कार्यक्रम उत्तम होईल, याची खात्री आहे.
>
> **-डॉ. केदारनाथ काळवणे,**
> **संचालक, विद्यार्थी विकास**

# मध्यस्थीवरून तरूणास कोयत्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून -**

भांडणात मध्यस्थी केल्याच्या कारणावरून तरूणास कोयत्याने मारहाण करणाऱ्या ११ जणांविरुध्द तौफिक जावीद बागवान (वय ३३, रा. मुक्तेश्वर नगर, मित्र नगरजवळ, शेळगी) याच्या फिर्यादीवरुन जे-लरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. इम्रान शेख, समीर शेख, गुड्डू शेख (रा. रामवाडी), आरबाज (रा. मित्र नगर शेळगी), वसीम शेख (रा. घोंगडे वस्ती) आणि असे ११ जण आहेत. १६ जून रोजी रात्री ११.३०च्या सुमारास तौफिक हा भुलाभाई चौकातील बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यासम ोर असताना इम्रान शेख व त्याच्या साथीदारांनी येऊन शेख व मेहबूब म कानदार यांच्यात झालेल्या भांडणात तू मध्यस्थी का केली म्हणून तौफिक यास शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच इम्राननें रिक्षामधून कोयता आणून तौफिकच्या उजव्या पायावर दुखापत केली.पोलिस उपनिरीक्षक डेरे तपास करीत आहेत.

# जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये प्रवेशोत्सव; विद्यार्थी रमले पुस्तकात

**पाठ्यपुस्तकाचे वितरण, गुलाबपुष्प, औक्षण अन् मिरवणुकीने शाळेत पहिले पाऊल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून-**

**जिल्ह्यातील विविध जिल्हा परिषदसह अन्य शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा झाला. यावेळी अधिकारी, पदाधिकारी, राजकीय नेते, शिक्षणाधिकारी आदी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वितरण करण्यात आले. शाळेचा पहिला दिवस असल्याने औक्षण, गुलाबपुष्प अन् मिरवणुकीने विद्यार्थ्यांनी शाळेत पहिले पाऊल टाकले. शाळेचा पहिला दिवस असल्याने प्रवेशद्वार फुग्यांनी, फुलांनी सजवण्यात आले होते.**

## शाळा प्रवेशोत्सवाचे...



### जिल्हा परिषद शाळा सलगर

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी सलगर शाळेत नवागतांचा प्रवेशोत्सव उत्साहात पार पडला. मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांच्या प्रयत्नातून २५०० वह्यांचे वाटप करण्यात आले. प्रथमतः गावामध्ये प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. 'शाळेला चला शाळेला चला' या घोषवाक्याने सर्व परिसर दुमदुमला होता. गुलाबपुष्प, चॉकलेट, पुस्तक वाटप, स्कूल बॅग, शूज आणि सॉक्स यांचे वाटप तसेच पाठ्यपुस्तक देऊन प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. तसेच इयत्ता पहिली ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांना गोड जेवणाचे नियोजन करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत बिराजदार, उपाध्यक्षा रुपाली म्हेत्रे, सदस्य बसलिंगप्पा भासगी उपस्थित होते. सूत्रसंचालन शाळेचे पदवीधर शिक्षक दिनकर भारती यांनी केले.



### हराळवाडीत विद्यार्थ्यांची बैलगाडीतून मिरवणूक

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हराळवाडी येथे पहिलीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत पारंपरिक पद्धतीने बैलगाडीतून आणि आधुनिकतेची कास धरत चारचाकी वाहनातून करण्यात आले. विद्यार्थ्यांची बैलगाडीतून व कारमधून मिरवणूक काढण्यात आली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेकडून आलेल्या विद्यार्थ्यांना आकर्षक टोप्या व मुखवटे घालून त्यांचे स्वागत करण्यात आले. औक्षण करून त्यांचे पाऊलांचे ठसे घेण्यात आले व त्याची एक प्रत पालकांना देण्यात आली. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रंगनाथ गावडे, ग्रामपंचायत उपसरपंच लिंगराज व्हनमाने, सामाजिक कार्यकर्ते पै. माऊली हेगडे आदी उपस्थित होते. मोहोळ तालुक्यातील शिक्षण विस्तारधिकारी अतुलकुमार माने यांनी हराळवाडीतील जि.प.प्रा.शाळेला भेट दिली.




### स्वप्ने वस्ती शाळा, कंदलगाव

स्वप्नेवस्ती जिल्हा परिषद शाळेत नवागतांचे स्वागत वाजत गाजत आणि टॅक्टर मधून प्रभातपेरी काढून करण्यात आले. पहिली विद्यार्थ्यांचे औक्षण करून, गुलाबपुष्पव चॉकलेट देऊन,फुगे,टोप्या घालून स्वागत करण्यात आले. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष कैलास उडाणशिव, उपाध्यक्षा संध्याराणी माने ब्रम्हादेव माने, सदस्य-सखाराम आवताडे, विठ्ठल होडगे, आमसिद्ध कोळी, ग्रा पं. सदस्य लक्ष्मी उडाणशिव,रेवाप्पा घाटानुरे, पालक -आशा उडाणशिव चिमाबाई कोळी, खुबा राठोड. विठ्ठल अवताडे,, हभप भीम टिंगरे महाराज व पालकवर्ग उपस्थित होते. मुख्याध्यापक पंडीत साबा यांनी सर्वांचे स्वागत करून प्रवेशोत्सव बाबतीत माहिती दिले. सूत्रसंचालन शांता बोलदे यांनी केले.



### निर्मलाराजे कन्या प्रशाला, अक्कलकोट

श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशालेत प्रवेशोत्सव दिनी विद्यार्थीनींचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक शरद जंगाले यांच्या हस्ते विद्यार्थीनींचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक शरद जंगाले सहशिक्षिका प्रमिला नीळपाटील अर्चना जाधव स्मिता जगदाळे मनीषा मोरे रेखा चव्हाण एस.डी. सावंत संभाजीराजे गाटे प्रकाश सोनटक्के तेलगावकर शिक्षकेतर कर्मचारी विकास गोडसे, राजेद्र गोन्डाळ, एस. बी. साळुंखे उपस्थित होते.



### भेंड जि.प. शाळा, मोडनिंब

भेंड (ता. माढा) येथील जिल्हा परिषद शाळा भेंड गावठाण, अंगणवाडी बरडे वस्ती, अंगणवाडी दळवी, जिल्हा परिषद शाळा बरडे वस्ती आणि आदर्शनगर अंगणवाडी येथे शाळेचा पहिला दिवस प्रवेशोत्सव पार पडला. कार्यक्रमात चिमुकल्यांचे गुलाबपुष्प व खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच डॉ. संतोष दळवी, उपसरपंच प्रवीण गायकवाड, महादेव दळवी, महेश मते, बाळासाहेब भोगे, विष्णू मते, तुषार दळवी, महेंद्र शिंदे, गणेश मुटकुळे, अशोक साळुंखे, बाळू परबत, सुदर्शन भूईटे, समाधान बरडे, बिभीषण दळवी, कुमार जाणराव, महादेव बनसोडे, कांतीलाल दळवी उपस्थित होते. तसेच अंगणवाडी सेविका मोरे, भोगे, मते, शिंदे, गाडे, पाटोळे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

### मोहोळ तालुक्यात गुलाबपुष्प देवून स्वागत

लोटस स्कूल मोहोळ या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प आणि खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेमध्ये रांगोळी काढून सजावट करण्यात आली होती.

यावेळी पूर्व प्राथमिक प्रशालेच्या मुख्याध्यापिका केतकी अमोल देशपांडे व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निकिता आनंद देशपांडे उपस्थित होते.




शाळेच्या पहिल्या दिवसाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. नंदकिशोर देशपांडे संस्थेचे सचिव ॲड. अमोल देशपांडे उपस्थित होते.

### फिनिक्स इंग्लिश मिडीयम स्कूल

फिनिक्स इंग्लिश मिडीयम स्कूल, मोहोळ मध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षातील शाळेचा पहिला दिवस मुलांच्या उपस्थितीमध्ये त्यांचे औक्षण करून पुष्पगुच्छ, चॉकलेट व स्माईली फेस देऊन स्वागत करण्यात आले.मुख्याध्यापक प्रशांत मदने यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यशोदा मदने, सारिका नाईकनवरे, शितल मेटकरी, सुवर्णा भोसले, अश्विनी कोकरे, सुजाता घोडके, रेश्मा पवार यांच्या हस्ते मुलांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच पालकांमधून योगिता शिंदे, राऊत, काकडे, चंदनशिवे यांचेही पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

### मोहोळ जि.प. शाळा नंबर चार

लहान मुलांना मोबाईलच्या विळख्यातून दूर ठेवून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्याची शैक्षणिक उन्नती साध्य करावी, असे प्रतिपादन मोहोळच्या कवयित्री तथा साहित्यिक डॉ. स्मिता पाटील यांनी केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर चार मोहोळ येथे शैक्षणिक सत्राचा पहिला दिवस निमित्त इयत्ता पहिलीतील वर्गातील नवागतांना प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी डॉ. स्मिता पाटील बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रीती घाडगे, मुख्याध्यापक संजय महामुनी, हजरत शेख, अर्चना बदर, घनशाम गलांडे, बसवणा कोळी, किरण खंदारे, राजू अष्टूळ, शकीला चौगुले, महेश काटकर, नागनाथ खवळे. सुरेंद्र काळे, यशवंत वाघामारे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी सावित्रीबाईच्या प्रतिमेचे पूजन डॉ. स्मिता पाटील व प्रीती घाडगे यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन हजरत शेख तर शेवटी कार्यक्रमाचे आभार अर्चना बदल यांनी मांडले.



### जि.प. कन्नड शाळा, मेत्रीवस्ती

वळसंग येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळा मेत्री वस्ती अंकलगी शाळेत नवागतांचे धूमधडक्यात स्वागत करण्यात आले. कर्नाटक महाराष्ट्र सीमावरती भागात पालकांचा सहकार्याने बैलगाडीत मुलांना बसवून आनंद दायी, गुणवत्ता पूर्ण, तणावमुक्त शिक्षणासाठी शाळेत प्रवेशोत्सव साजरा करण्यात आले. बदललेला शिक्षण धोरणनुसार या वर्षांपासून CBSE अभ्यासक्रम लागू झालेने मुलांना पुस्तक वाटप करण्यात आले. शिक्षण ज्योती सावित्रीबाई फुले यांचे भावचित्र मिरवणूक काढून पूजा करण्यात आले. मुलांना मिठाई वाटप करण्यात आले. शाळेतील मुख्याध्यापक शिवानंद स्वामी,पालकांचे सक्रिय सहभाग, शाळा व्यवस्थापन समिती सर्व सदस्य उपस्थित होते. धरेप्पा कट्टीमनी यांचे मार्गदर्शन लाभले. धरेप्पा अडवेप्पा बिराजदार यांचे बैलगाडी सजवून दिले तर पालक संतोष बिरादार यांचे योगदान लाभले.



### जि.प. प्राथमिक शाळा बागलवस्ती, बारलोणी

कुर्डुवाडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश सुळे यांनी बारलोणीतील जिल्हा परिषद प्राथमिक बागलवस्ती शाळेतील विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प, पाठ्यपुस्तके देऊन शाळेच्या पहिल्या दिवशी अत्यंत उत्साहात स्वागत केले. सर्व विद्यार्थ्यांना गटविकास अधिकारी महेश सुळे यांच्या हस्ते नवीन पाठ्यपुस्तके, गणवेश, शुज, पायमोजे, देऊन त्यांचे उत्साहात स्वागत केले. यावेळी फुग्यांची सजावट करण्यात आली होती. दुपारच्या जेवणात गोड मिठाई विद्यार्थ्यांना वाटण्यात आली. यावेळी माजी उपसभापती सुरेश बागल, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रभाकर बागल, मुख्याध्यापक निलेश देशमुख, सुजाता वाघ, शशिकांत गोरे, आदेश बागल, शिवराज बागल, अंगणवाडी सेविका सुनीता बागल, उमा बागल आदी उपस्थित होते.



### पोदार जम्बो किड्स, बार्शी

पोदार जम्बो किड्स, बार्शी येथे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंदाने झाली. लहान मुले उज्वल हास्य, रंगीबेरंगी बॅग्ज आणि उत्साह आणि कुतूहलाच्या मिश्रणासह शाळेत आली. शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी गेटवर मुलांचे आणि पालकांचे स्वागत केले, संगीत आणि शुभेच्छांसह उत्सवाचे वातावरण निर्माण केले. यावेळी उपस्थित संस्थेच्या अध्यक्षा वैशाली कबाडे, सचिव संदीप बरडे, प्राचार्य रविराज बेलुरे, संचालिका प्रियांका बरडे, सेंटर हेड किशोरी भोसले, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.



### श्री शंकरलिंग प्रशाला, वळसंग

वळसंग (ता.द.सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत प्रवेशोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वळसंग पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक सागर पाटील, संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, सदस्य विश्वनाथ थळंगे,प्रकाश दुधगी, मल्लिनाथ थळंगे, रमेश दुधगी, प्राचार्य वीरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांच्यासह पालक उपस्थित होते. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वाद्यांच्या गजरात व मिकी माऊसच्या सानिध्यात गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. इयत्ता पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना शासनाचे मोफत पाठ्यपुस्तके व संस्थेच्या वतीने पाचवी ते बारावी वर्गातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, निलप्पा कवटगी, प्राध्यापक संतोष शिंदे,सिध्दारुढ हिरेमठ, बसवराज दुधगी, विरेश थळंगे,गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, विजय प्याटी, मल्लिनाथ गौडगांव, शिवराज अष्टगी, अजय माणकोजी, प्रा. शरणय्या मसुती, प्राध्यापिका प्रतिभा तांडुरे,विजयालक्ष्मी थळंगे,शैला निंबाळ,गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, ग्रंथपाल निलकंठ चनशेट्टी, सेवक कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीमंत भोसले तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी मानले.



### वखारिया विद्यालय, बार्शी

उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात पार पडला. मान्यवरांच्या हस्ते मोफत शैक्षणिक साहित्य, गुलाबपुष्प देवून स्वागत करण्यात आले. कार्यक्रमासाठी उपसरपंच नितीन बुरगुटे, किरण महानवर, तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष रामेश्वर शिरगिरे, ताटे तसेच बोरगांव (झाडी) चे पालक ॲड. हर्षवर्धन बोधले, महादेव लंगोटे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज आणि कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांनी उपस्थित प्रमुख पाहुण्याचे शाल, पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख तवले यांनी केले तर सूत्रसंचालन समृद्धी ठोंगे या विद्याथिनीने केले.



### शिशु संस्कार केंद्र, बार्शी

शिशु संस्कार केंद्र प्राथमिक विद्यालयात इयत्ता पहिलीतील मुलांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी २ री ते ४ थीच्या मुलांनी लेझीम, डंबेल्स, देवा मला शाळेत जायचे आहे या गीतावर नृत्य सादर करुन मुलांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे खजिनदार बापूसाहेब शितोळे, सदस्य मोहिते, भारत विद्यालयाचे माजी शिक्षक व्ही.जी. पवार, संघवी तसेच निवेदिका नीता देव उपस्थित होत्या.

सर्व मान्यवरांच्या हस्ते मुलांना हातरुमाल, पुष्पगुच्छ आणि खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक पवार आर.एम. यांनी केले. सूत्रसंचालन वसेकर पी.बी. यांनी केले. स्वागतगीत जगदाळे, काशीद व मेहेर यांनी सादर केले.



### जि.प. शाळा, पुजारवाडी

सांगोला येथील जि. प. प्राथमिक शाळा, पुजारवाडी येथे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवाती निमित्त वृक्षारोपण, मनोरंजनात्मक खेळ, शैक्षणिक साहित्याचे वाटप असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

यावेळी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, गट शिक्षणाधिकारी नवले, विस्तार अधिकारी कुमठेकर, सुत गिरणीचे चेअरमन डॉ.प्रभाकर माळी, ड.विशालदिप बाबर, केंद्र प्रमुख अस्लम इनामदार, शिक्षक उपस्थित होते. जिल्हा परीषद शाळेत प्रवेशोत्सव साजरा करताना अत्यंत आनंद होत आहे.



### मातोश्री ईश्वराम्मा विद्यालय, पंढरपूर

शालेय प्रवेशोत्सवानिमित्त ईश्वराम्मा विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, पंढरपूर प्रशालेत रांगोळी काढून, वर्गात फुगे लावून, आंब्याच्या पानांचे तोरण बांधून व पुष्प पाकळ्यांच्या गालिचा वरून संस्थापक सचिवा सुनेत्रा यांनी गुलाब पाकळ्यांची उधळण करत औक्षणाने सर्व मुलांचे स्वागत करण्यात आले. तसेच या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सुनेत्रा पवार संस्थापक, सचिवा यांचे हस्ते वह्या, पुस्तके व शालेय साहित्य वाटप केले. प्रास्ताविक प्राचार्या नंदिनी गायकवाड यांनी केले. कार्यक्रमासाठी दरकासा सय्यद, अनुष्का ऐवळे उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. गणेश डुबलयांनी केले. तर माधुरी बोडके यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कुमुदीनी सरदार, विभावरी डुबल, फरहाणा कादरी, अभिजीत कोष्टी, पुंजाजी ढोले. कल्याण कांबळे, इरफान शेख, विजय भंडारे यांनी परिश्रम घेतले.

### कल्याणशेट्टी शिक्षण संकुल, अक्कलकोट

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयात शाळेचा पहिला दिवस म्हणून संस्थेचे संस्थापक कै. पंचप्पा कल्याणशेट्टी व शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक मराठी, कन्नड व सेमी इंग्रजी माध्यमाच्या सर्व मुलांना संचालिका शांभवी कल्याणशेट्टी व विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी यांनी औक्षण केले. त्यानंतर गुलाबपुष्प व चिक्की, चॉकलेट देऊन सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, शिक्षण विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप उपस्थित होते.



### जि.प. शाळा शेळकेवस्ती, दहिगाव

जि प प्राथमिक शाळा शेळकेवस्ती दहिगाव (ता.करमाळा) येथे पहिलीच्या विद्यार्थ्यांची उत्साहात स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन गावातील प्रतिष्ठीत नागरिक दहिगाव सोसायटी चेअरमन हरिश्चंद्र शेळके व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्योतीराम पाडुळे यांच्या हस्ते झाले. यावेळी हालगीच्या तालात भव्य प्रभातफेरी घोषणा व मिरवणूक काढली. सर्व विद्यार्थ्यांना फेटे बांधून गोड पदार्थ भरवून स्वागत केले. सर्व मुलांचे कृती कार्यक्रम घेण्यात आले सर्व विद्यार्थांना मोफत पाठ्यपुस्तक व गणवेश वाटप करण्यात आले. मेळाव्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष बापूसाहेब कोंडलकर, समाधान जाधव, सिध्देश्वर पाटील, योगेश वाघमोडे, समाधान जाधव , धनाजी कोंडलकर उपस्थित होते. सूत्रसंचालन विजय राऊत यांनी केले तर आभार शाळेचे मुख्याध्यापक दस्तगीर शेख यांनी मानले.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जिय शिवराय प्रतिष्ठानतर्फे राष्ट्रमाता जिजाऊंना मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ जून-**

राष्ट्रमाता राजमाता माँसाहेब जिजाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवभक्तांच्या व जय शिवराय प्रतिष्ठानच्यावतीने माँसाहेब जिजाऊंना मानवंदना देऊन अभिवादन करण्यात आले.

सर्वोच्च स्त्री व्यक्ती माँ जिजाऊंचा विचार समाजात रुजवत असताना स्त्रीचा आदर व मानसन्मान करणे हेच खरे माँसाहेब जिजाऊंना अभिवादन असेल, अशी भावना व्यक्त



करण्यात आली. यावेळी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले महाराज, स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना देखील अभिवादन करण्यात आले. यावेळी सर्वश्री किरण कोकाटे, महेश देशमुख, अजय पाटील, गणेश हांडे, युवराज ढगे, राणा देशमुख व जय शिवराय प्रतिष्ठान सदस्य उपस्थित होते.



## महत्वाचे...



### शासकीय महापूजेचे मुख्यमंत्र्यांना मंदिर समितीकडून निमंत्रण

**पंढरपूर,दि.१७ जून -**

आषाढी शुध्द एकादशी रविवारी दि.६ जुलै रोजी आहे. या दिवशी पहाटे २.२० वाजता मुख्यमंत्री महोदय व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेची शासकीय महापूजा करण्यात येणार असून, महापूजेचे निमंत्रण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मंगळवारी (दि.१७) वर्षा निवासस्थान, मुंबई येथे मंदिर समितीकडून देण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, हभप ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), ॲड. माधवी निगडे, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, हभप प्रकाश जवंजाळ, हभप शिवाजीराव मोरे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मंदिर समितीच्यावतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते विणा, वारकरी पटका, श्रींची मूर्ती, उपरणे, चिपळ्या देऊन सन्मान करण्यात आला.



### डिजिटल मीडियाला राजमान्यता मिळाल्याबद्दल राजा मानेंचा सन्मान

**बार्शी, दि. १७ जून-**

बऱ्याच वर्षांपासून राज्यातील अनेक संपादक व पत्रकार डिजिटल मीडिया क्षेत्रामध्ये अविरतपणे पत्रकारिता करत आहे. डिजिटल मीडियाला आतापर्यंत कोणत्याही प्रकारची अधिकृत राजमान्यता नव्हती. डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी शासन दरबारी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे व प्रयत्नामुळे डिजिटल मीडियाला अखेर ३ जून रोजी अधिकृत घोषणा होऊन राजमान्यता प्राप्त झाली. डिजिटल मीडियाला मिळालेल्या यशाबद्दल डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांचा सन्मान बार्शी तालुका कार्यकारिणीच्यावतीने करण्यात आला. याप्रसंगी डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे राज्य संघटक मुरलीधर चव्हाण, राज्य कार्यकारिणी सदस्य संतोष सूर्यवंशी, राज्य प्रसिद्धी प्रमुख धिरज शेळके, जिल्हा उपाध्यक्ष दिनेश मेटकरी, जिल्हा उपाध्यक्षा वैशाली ढगे, तालुकाध्यक्ष गणेश शिंदे, सचिव किरण माने, खजिनदार सिद्धार्थ बसवंत, कार्यकारिणी सदस्य अक्षय बारंगुळे, पत्रकार विजय निलाखे, मल्लिकार्जुन धारुरकर उपस्थित होते.



### कोर्टी येथील महाराजस्व शिबिरात ४६७ लाभार्थ्यांनी घेतला लाभ

**पंढरपूर, दि. १७ जून-**

शासनाच्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मौजे कोर्टी, ता. पंढरपूर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४६७ लाभार्थ्यांनी विविध योजनांचा लाभ घेतला असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली. महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांची निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकालात काढणे. तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी कोर्टी (ता. पंढरपूर) येथे शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. आमदार समाधान आवताडे, प्रांताधिकारी सचिन इथापे व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रतिनिधिक लाभांचे वाटप करण्यात आले. शिबीरात महसूल विभागाच्या ३०६ लाभार्थ्यांनी उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले, नॉनक्रिमिलेयर दाखले, वय व अधिवास दाखले तसेच चार इतर दाखले आदी योजनांचा लाभ घेतला त्याचबरोबर पुरवठा विभागाकडून ५१ शिधापत्रिका ,त्याचबरोबर कृषी विभागाकडून १७ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. कोर्टी ग्रामपंचायतीकडून १४ घरकुले व १० जॉबकार्डचा लाभ देण्यात आला. आरोग्य विभागाच्या माध्यमातून ६४ तर लेक लाडकी योजनेतून ५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. शिबीरास गटविकास अधिकारी सुशील संसारे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, महिला व बालकल्याण विकास अधिकारी समाधान नागणे, तालुका कृषी अधिकारी मोरे उपस्थित होते.

## संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी बलराज अश्वाचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १७ जून-**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यासाठी सालाबाद प्रमाणे याही वर्षी 'बलराज' या अश्वाचे विधिवत पूजन करुण रवाना करण्यात आले.

'प्रतापगड' या मोहिते-पाटील यांच्या निवासस्थानी आश्वाचे पूजन धवलसिंह मोहिते-पाटील आणि पद्मजादेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माणिक मिसाळ, अण्णासाहेब इनामदार, सतीश पालकर, अण्णासाहेब शिंदे, मयूर माने नवनाथ साठे, प्रा. चंद्रकांत कोळेकर, घोडेस्वार वैभव गायकवाड यांच्यासह जनसेवेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोहिते-पाटील कुटुंबांकडून जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यासाठी मानाचा अश्व देण्याची परंपरा (स्व.) प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी सुरवात केली. ही प्रथा गेली सुमारे ४० वर्षांपासून अखंडित चालू असून (स्व.)



**अकलूज : प्रतापगड अकलूज येथून संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या बलराज या अश्वाचे विधीवत पूजा करून देहूकडे प्रस्थान करण्यात आले.** (छायाचित्र : संजय लोहकरे अकलूज.)

प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या पश्चात डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्याकडून दरवर्षी पालखी सोहळ्यासाठी अश्वसेवा दिली जाते.

सालाबाद प्रमाणे याही वर्षी उच्च कुळातील, मारवाडी जातीचा, सर्व शुभ लक्षणे असलेला 'बलराज' हा अश्व पालखी सोहळ्यासाठी रवाना करण्यात आला. या अश्वास वर्षभर विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते तसेच भाविकांच्या गर्दीमुळे बुजू नये यासाठी त्याची तयारी करून घेतली जाते.

## वारकऱ्यांना २३४ टँकरने पाणीपुरवठा

### पालखी मार्गावर स्वच्छ पाणीपुरवठ्यास प्राधान्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

आषाढी वारीदरम्यान पालखी मार्गावर स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून २३४ टँकरची व्यवस्था केली आहे. पालखी मार्गावर बोर, विहिरचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

पालखी मार्गावरील १०७ पाण्याच्या स्रोतांची तीनवेळा तपासणी होणार आहे. आषाढी वारानिमित्त जिल्ह्यात दहा पालख्याबरोबर लाखो वारकरी येतात. त्याना ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून पिण्याच्या पाण्याची व्यवस्थेसाठी २३४ टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे.

> **वारकऱ्यांना पाणीपुरवठा** करण्यासाठी पालखी मार्गावरील १०७ बोर, विहीर अधिग्रहण केले आहे. तसेच २३४ टँकरद्वारे वारकऱ्यांना पाणीपुरवठा केले जाणार आहे. त्यासाठी १४२ कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. वारकऱ्यांना शुद्ध पाणी मिळावे, यासाठी टीसीएल पावडर आणि मेडिक्लोर औषध पाण्यात मिक्स करण्यात येणार आहे.
>
> **- संजय धनशेट्टी,**
> कार्यकारी अभियंता

तसेच पाणी शुद्धीकरणासाठी टीसीएल, मेडीक्लोर औषध टँकरमध्ये टाकले जाणार आहे. त्यामुळे वारकऱ्यांना शुद्ध पाणी मिळणार आहे. यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून १४२ अधिकारी व, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## डॉ.देशमुख यांच्या नातीचा शासकीय अंगणवाडीत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ जून-**

स्व.डॉ.गणपतराव देशमुख यांची नात व आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आपली कन्या अमूल्या हिला जि.प.सोलापूर अंतर्गत येणाऱ्या पेनुर येथील अंगणवाडी केंद्रात दाखल करून समाजामध्ये एक सकारात्मक आणि अनुकरणीय संदेश दिला आहे.



आ.डॉ.बाबासाहेब देशमुख हे स्वतः उच्च शिक्षण घेतलेले असून त्यांनी आपली मुलगी खाजगी शाळेऐवजी सरकारी अंगणवाडीत प्रवेशित करून शासकीय शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास अधोरेखित केला आहे. अनेकदा सामान्य जनतेमध्ये शासकीय अंगणवाड्यांबाबत शंका अथवा अनास्था आढळून येते. मात्र, लोकप्रतिनिधींनी स्वतः पुढाकार घेऊन या व्यवस्थेवर विश्वास दाखवणे हे शासकीय यंत्रणेतील कार्यकर्त्यांसाठी ऊर्जा देणारे ठरत आहे.

## वारकऱ्यांसाठी प्रत्येक पाच किमीवर आपला दवाखाना

- १ हजार १५५ डॉक्टर, कर्मचारी तैनात
- आषाढीसाठी आरोग्य विभाग सज्ज

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ जून-**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाणारी वारकऱ्यांची वारी सुरू झाली असून या वारीच्या मार्गावर वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पाच किलोमीटर अंतरावर तात्पुरत्या स्वरूपात २०३ आपला दवाखान्याच्या माध्यमातून मोफत सेवा पुरविण्यात येणार असून यासाठी राज्याच्या आरोग्य विभागाकडून १ हजार १५५ डॉक्टर आणि कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.



राज्यासह देशाच्या विविध भागांतून विठू माऊली च्या दर्शनासाठी सुमारे १२ लाखांपेक्षा जास्त वारकरी सहभागी होणार असल्याचा अंदाज आहे. आरोग्याची काळजी घेत आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी उपक्रमांतर्गत आरोग्य विभागाने

| अशी असेल सुविधा... | |
|---|---|
| आपला दवाखाना | २०३ |
| आयसीयू केंद्र | ४६ |
| रुग्णवाहिका | ३३१ |
| आरोग्यदूत | २९० |
| औषधी किट वितरक | ३५०० |
| स्त्रीरोगतज्ज्ञ | १५ |
| हिरकणी कक्ष | ३७ |

आराखडा तयार केला आहे. सलग तिसऱ्या वर्षी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. पालखी सोहळ्याचे नियोजन झाले आहे. वारकऱ्यांचे हाल होणार नाहीत, त्यांना आरोग्यसेवा तत्पर मिळावी, यासाठीच आरोग्य विभागाकडून आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी हा उपक्रम हाती घेतला असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.



### गेल्यावर्षी १५.१२ लाख वारकऱ्यांवर उपचार

- ५ हजार ४६७ जणांना ॲडमिट करावे लागले
- ४ हजार ९५० जणांना मोठ्या रुग्णालयात पाठवले
- ६६ जणांना हृदयविकाराचा झटका
- ४२६ जणांना कुत्रा चावला
- ११ जणांना सर्पदंश

### ४६ ठिकाणी तात्पुरते आयसीयू

वारकऱ्यांना मार्गात वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी यासाठी २०३ आपला दवाखान्यांची रचना दर पाच किलोमीटर अंतरावर केली असून तिथे वैद्यकीय सेवा तत्पर असतील. याशिवाय, ४६ ठिकाणी १० खाटांचे तात्पुरते आयसीयू कक्ष उभारण्यात आले आहेत.

### खासगीत १० खाटा राखीव...

खासगी रुग्णालयांनाही वारकऱ्यांच्या सेवेसाठी सहभागी करून घेण्यात आले आहे. प्रत्येक खासगी रुग्णालयात १० खाटा आरक्षित ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## समर्थ ज्येष्ठ नागरिक संघातर्फे रविवारी गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

शेळगी येथील समर्थ ज्येष्ठ नागरिक संघातर्फे दहावी व बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा व जून महिन्यात वाढदिवस असलेल्या ६० ज्येष्ठ सभासदांचे सत्कार आयोजित करण्यात आल्याची माहिती संघाचे अध्यक्ष बाबुराव नरूणे यांनी दिली. आ. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते व फेसकॉम पुणे विभागाचे अध्यक्ष हनुमंत कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख वक्ते डॉ. रामचंद्र धर्मसाले यांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा संपन्न होणार आहे. सदर कार्यक्रम रविवार दिनांक २२ जून रोजी सकाळी १० वाजता शेळगी येथील मातोश्री हॉल येथे संपन्न होणार आहे. तरी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संघाच्या वतीने केले आहे.

## दोन वर्षांत वारी काळात २४ वारकऱ्यांचा मृत्यू

### मुख्यमंत्री सहायता निधीची रक्कम अद्याप जमा नाही

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ जून-**

आषाढी वारी काळात गेल्या दोन वर्षात संतांच्या पालखी सोहळ्यात चालणाऱ्या सुमारे २४ वारकऱ्यांचा मृत्यू झाला परंतु शासनाच्या मुख्यमंत्री सहायता निधीतून एक रुपयाही मयत वारकऱ्यांच्या वारसाच्या खात्यात जमा झाला नाही त्यामुळे वारकरी वर्गात नाराजीचा सूर दिसत आहे.

सन २०२३ मध्ये राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आषाढी वारी काळात संतांच्या पालख्यांसोबत चालणाऱ्या वारकऱ्यांचा अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसास प्रत्येकी पाच लाख रुपये मदत देण्याची घोषणा केली होती. गेल्या दोन वर्षात संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात ११, संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात ४ , संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यात ७, संत मुक्ताबाई महाराज पालखी सोहळ्यात २ अशा जवळपास २४ वारकऱ्यांचा मृत्यू झाला होता . या मृत वारकऱ्यांची नावे या पालखी सोहळा प्रमुखांनी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे दिली होती. परंतु गेल्या दोन वर्षात एक रुपयाही मयत वारकऱ्यांच्या वारसाला मिळाला नाही. त्यामुळे वारकरी वर्गात नाराजीचा सूर दिसून येत आहे. शासनाने हा निधी तातडीने मयत वारकऱ्यांच्या वारसाच्या खात्यात जमा करावा, अशी मागणी पालखी सोहळा प्रमुखांनी केली आहे.

## प्रवीण काकडे यांची शिवसेना तालुका प्रमुखपदी निवड

**बार्शी, दि. १७ जून-**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या बार्शी तालुका प्रमुखपदी प्रवीण उर्फ अमोल काकडे यांची दुसऱ्यांदा निवड करण्यात आली आहे. काकडे गेल्या आठ वर्षांपासून तालुका प्रमुखपदाची जबाबदारी पार पाडत आहेत.



नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत बार्शी तालुक्यातून शिवसेनेला भरघोस मताधिक्य मिळाल्यामुळे काकडे यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास दाखवत त्यांची या पदावर कायम नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचे खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार दिलीप सोपल, तसेच जिल्हा प्रमुख गणेश वानकर यांनी अभिनंदन करुन स्वागत केले.



## विजयदादांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १७ जून-**

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्कूल बॅग, वह्या, पाटी, कंपास, चित्रकला वह्या, रंगपेटी, वॉटर बॅग, टिफिन बॉक्स इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

धैर्यशील मोहिते-पाटील मित्र परिवार, मनशक्ती सेवा विज्ञान केंद्र, हिंदू खाटीक सामाजिक केंद्र, जय भवानी प्रेस, भानुदास खडके फटाका मार्ट, स्वामी विवेकानंद मंडळाचे शिवगर्जना ग्रुप, स्वामी समर्थ ग्रुप, साहिल स्पोर्ट्स अकलूज यांच्यावतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रावबहादूर गट (बिजवडी) या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बिजवडी गावच्या वतीने तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मनोज तात्या शिंदे तसेच महेश खडके, गणेश खडके यांच्या हस्ते विजयदादांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी अकलूज केंद्राचे केंद्रप्रमुख प्रभाकर ननवरे, अक्षय मोहिते, उपसरपंच दत्तू जाधव, पिंटू मदने, गणेश नागरगोजे, श्रावण खडके, प्रतीक खडके, धनराज पाटसकर, पवारवस्ती शाळेचे नितीन बनकर रावबहादूर गट शाळेचे श्रीकांत राऊत, अजमिर फकीर शिक्षक उपस्थित होते.

## शंकरराव मोहिते-पाटील कारखान्याचे ऊस लागवड धोरण जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १७ जून-**

सहकार महर्षी सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर-अकलुज या कारखान्याने २०२५-२६ करीता मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगाव व वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे यांच्या मार्गदर्शनाने खालीलप्रमाणे हंगाम व जातवार ऊस लागवडीचे धोरण जाहीर केले आहे.

ऊस लागण कालावधी : ऊसाच्या जाती : आडसाली : १/७/२०२५ ते ३१/८/२०२५, कोसी-६७१, को-८६०३२, कोएम-०२६५, पूर्व हंगाम १/९/२०२५ ते ३०/११/२०२५, कोसी-६७१, को-८६०३२, कोएम-०२६५, एमएस-१०००१, व्हीएसआय ०८००५, फुले-१५०१२ सुरु १/१२/२०२५ ते ३०/४/२०२६ कोसी-६७१, को-८६०३२, एमएस-१०००१, व्हीएसआय ०८००५, फुले-१५०१२ १/१२/२०२५ ते ३१/१/२०२६ कोएम-०२६५ खोडवा बेणे खोडवा व गत सिझनमध्ये तुटलेल्या ऊसाचा खोडवा. वरील सर्व ऊस जातींचा खोडवा ऊस रोपे पद्धतीने लागवड केलेल्या क्षेत्राची लागण तारीख रोपे शेतात लावलेल्या



> नव्याने आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करुन एकरी ऊस उत्पादन वाढीसाठी कारखाना प्रयत्नशील असून सभासदांनी या तंत्रज्ञानाचा वापर करावा तसेच येणा-या काळात ऊस तोडणी मजुरांची कमतरता भासणार असल्याने यंत्राच्या सहाय्याने ऊस तोडणी करावी लागणार आहे, त्याकरीता सर्व सभासदांनी ५ फूट अंतर सरीने ऊस लागवड करावी.
>
> **- जयसिंह मोहिते-पाटील, चेअरमन**

तारखेच्या १५ दिवस अगोदरची घेण्यात येईल. अशाच पद्धतीने संपूर्ण लागण हंगामामध्ये ऊस रोपे लागवडीची तारीख घेण्याचा कार्यक्रम राबविला जाईल. सहकार महर्षी कारखान्याच्या सर्व सभासदांनी ऊसाची लागवड ५ फूट अंतर सरी पद्धतीने करावी. यामुळे प्रती एकरी ऊस उत्पादनात वाढ होईल. सदर सरी पद्धतीने लागवड केल्यामुळे ऊसावरील रोग व कीड नियंत्रित करणे सोपे जाते. कारखान्यामार्फत सालाबादप्रमाणे लागण हंगाम २०२५-२६ (गळीत हंगाम २०२६-२७) साठी ऊस विकास योजना राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये कारखान्याकडून सभासदांना दर्जेदार सेंद्रिय व जिवाणू खते तयार करुन विभागीय शेती कार्यालय येथे उपलब्ध करुन देत आहेत.

कारखाना ऊस विकास योजनांमध्ये सभासदांनी सहभागी होवून एकरी ऊस उत्पादन वाढवून चांगल्या प्रतीचा ऊस कारखान्यास उपलब्ध करुन देऊन सहकार्य करावे, असे कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी यावेळी म्हणाले.